प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय बोळींज येथील तळमजला व पहिल्या मजल्यावर पॉईंट वायरिंग व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामी येणाऱ्या रक्कम 4,94,881/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ।/६४ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०३/०३/2022

प्रस्तावाचा विषय :- "कोरोना विषाणु (कोविड-19)आपत्तकालीन व्यवस्था"
महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील बोळींज रुग्णालय मधील संतुलीत वीज भाराकरीता व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रात महिला व बाल रुग्णांच्या उपचाराकरिता रुग्णालय उभारणेंत आले आहे.

शहरात महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करणेंत येतो. महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीमार्फत होणारा वीज पुरवठा तांत्रिक कारणामुळे असंतुलित (Unbalance) झाल्यास रुग्णालयातील उपकरणांमध्ये तांत्रिक बिघाड होऊन उपकरणे नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव रुग्णालयातील उपकरणे सुस्थितीत कार्यान्वित ठेवणेंकरीता योग्य क्षमतेचे व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे आवश्यक आहे.

सन 2021-22 या वित्तीय वर्षातील सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुचीमध्ये महानगरपालिकेस आवश्यक 250 के.व्ही.ए क्षमतेचे व्होल्टेज स्टॅबिलाझर साहित्यांचा समाविष्ठ नसल्याने कामाचे अंदाजपत्रक तयार करणे शक्य होत नाही. याकरीता मुख्यालय, विदयुत विभागामार्फत महानगरपालिकेस आवश्यक तपशिलानुसार (Specification) 250 के.व्ही.ए क्षमतेचे व्होल्टेज स्टॅबिलायझरचे दर विश्लेषण (Rate Analysis) करुन दर मागविले आहे.

प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील महिला व बाल रुग्णालय मधील संतुलीत वीज भाराकरीता 250 के.व्ही.ए क्षमतेचा व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे कामाकरिता रक्कम 4;98,040/- रुपये खर्च अपेक्षित राहील. सदरचा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील इतर दिवाबत्ती व्यवस्था या लेखशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- रुपये तरतुदीमधुन भागविण्यात येईल.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील बोळींज रुग्णालय मधील संतुलीत वीज भाराकरीता व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे कामी येणाऱ्या रक्कम 4,98,040/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विदयुत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ।।४१ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-03/03/2022

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय, बोळींज येथील अति दक्षता विभाग (ICU) मध्ये वातानुकुलित यंत्रणा बसविणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,72,224/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बोळींज माता व बाल रुग्णालय येथे अतिदक्ष रुग्णांकरिता अतिदक्षता विभाग (ICU), अर्भकाचा अतिदक्षता (NICU), बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) बनविण्यात आले आहेत. सदर अति दक्षता विभागांकरिता मध्ये वातानुकुलित यंत्रणा बसविणें व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- पॉईट वायरींग फॉर प्लग - 32 नग, SPMCB 32A C सिरीज - 12 नग, 2x4sq.mm मेन्स वायर-175 मी, 1.5 टन एअर कंडीशनर - 4 नग, स्टॅबिलायझर-4 नग, सॉफ्टड्रोन कॉपर पाईप-65 मी, कनडयुट-68 मी, 3x4sq.mm आर्मड केबल-216 मी, SPMCB 32A-4 नग, 4x25sq.mm XLPE आर्मड केबल-34 मी.
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:- 39,03,८८७।-
प्रस्तावित खर्च	:- ४,७२,२२४।-
उपलब्ध शिल्लक	:- १४,६३,५३,८८९।-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. १ पृष्ठ क्र. ३ अ.क्र १७ वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय, बोळींज येथील अति दक्षता विभाग (ICU) मध्ये वातानुकुलित यंत्रणा बसविणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामी येणाऱ्या रक्कम 4,72,224/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ।।९०

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 03/03/2022

प्रस्तावाचा विषय :- "कोरोना विषाणु (कोविड-19)आपत्तकालीन व्यवस्था"
महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील बोळींज रुग्णालय येथील ऑक्सिजन प्लांटच्या संतुलीत वीज भाराकरीता व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :- राज्यात कोरोना (कोविड-19) विषाणूंचा प्रादुर्भावामुळे संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील बोळींज रुग्णालय येथे ऑक्सिजन प्लांट उभारणेत आले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करणेंत येतो. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत होणारा वीज पुरवठा तांत्रिक कारणामुळे असंतुलित (Unbalance) झाल्यास संतुलीत वीज भार अभावी ऑक्सिजन प्लांट पुर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित होत नाहीत. यास्तव ऑक्सिजन प्लांट सुस्थितीत कार्यान्वित ठेवणेंकरीता योग्य क्षमतेचे व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे आवश्यक आहे.

सन 2021-22 या वित्तीय वर्षातील सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीमध्ये महानगरपालिकेस आवश्यक 250 के.व्ही.ए क्षमतेचे व्होल्टेज स्टॅबिलाझर साहित्यांचा समाविष्ठ नसल्याने कामाचे अंदाजपत्रक तयार करणे शक्य होत नाही. याकरीता मुख्यालय, विद्युत विभागामार्फत महानगरपालिकेस आवश्यक तपशिलानुसार (Specification) 250 के.व्ही.ए क्षमतेचे व्होल्टेज स्टॅबिलायझरचे दर विश्लेषण (Rate Analysis) करुन दर मागविले आहे.

तरी, महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील बोळींज रुग्णालय येथील ऑक्सिजन प्लांटच्या संतुलीत वीज भाराकरीता 250 के.व्ही.ए क्षमतेचा व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे कामाकरिता रक्कम 4,98,040/- रुपये खर्च अपेक्षित राहील.

सदरचा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील इतर दिवाबत्ती व्यवस्था या लेखशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- रुपये तरतुदीमधुन भागविण्यात येईल.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील बोळींज रुग्णालय येथील ऑक्सिजन प्लांटच्या संतुलीत वीज भाराकरीता व्होल्टेज स्टॅबिलायझर बसविणे कामी येणाऱ्या रक्कम 4,98,040/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ।।९।

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 03/03/2022

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय येथील LMO प्लांट, विराट नगर हिंदु स्मशानभुमी येथील गॅसदाहिनी व बोळींज प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग व्यवस्था करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,02,340/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुची व सन 2018-19 चे ग्राऊंड वॉटर सर्वे CSR नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बोळींज माता व बाल रुग्णालय येथे LMO प्लांट, विराट नगर हिंदु स्मशानभुमी येथील गॅसदाहिनी व बोळींज प्राथमिक आरोग्य उभारण्यात आले आहे. सदर ठिकाणी इमारत व विदयुत उपकरणे सुरक्षित राहण्याकरिता अर्थिंग बसविणे आवश्यक आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- बोरींग /ड्रीलिंग-90 मी., जी.आय पाईप-90 मी, अर्थिंग प्लेटसह-15 नग, जी.आय.स्ट्रीप-300 कि.ग्रॅ, आर.सी.सी चेंबर कव्हर-15 नग
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:- ५२,७५,८७०/-
प्रस्तावित खर्च	:- ४,०२,३४०/-
उपलब्ध शिल्लक	:- ७४,७३,७१,२०१/-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. २ पृष्ठ क्र. ३ अ.क्र २३ वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय येथील LMO प्लांट, विराट नगर हिंदु स्मशानभुमी येथील गॅसदाहिनी व बोळींज प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम 4,02,340/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विदयुत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ।।९२ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 03/03/2022

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील म्हाडा इ.क्र.10 विलगिकरण कक्षाकरिता सिलींग फॅन, लाईट, वॉटर गिझर बसविणे व त्याअनुषंगिक विदयुतीय कामे करणें कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 76,998/-(सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील म्हाडा गृह निर्माण संकुल येथील इ.क्र.10 मध्ये कोविड विलगिकरण कक्ष तयार करणेंत आले आहे. सदर कोविड विलगिकरण कक्षामध्ये कोविड संसर्गिक रुग्णांचे विलगिकरण करणेंत येणार आहे. यास्तव सदर कोविड केअर सेंटर मध्ये सिलींग फॅन, लाईट, वॉटर गिझर बसविणे व त्याअनुषंगिक विदयुतीय कामे करणे आवश्यक आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- डिसमेन्टलिंग संपर्ण सिलिंग फॅन, एक्झॉस्ट फॅन, केबिन फॅन, ब्रॅकेट फॅन 372 नग, सिलींग फॅन-372 नग, 2x1.5sq.mm कॉपर वायर-186 मी, डिसमेन्टलिंग अनसर्विसेबल वॉटर हिटर - 24 नग
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:- ७६,३९,०३२/-
प्रस्तावित खर्च	:- ७६,९९८/-
उपलब्ध शिल्लक	:- ९७,५२,८३,९७०/-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. ७ पृष्ठ क्र. ३ अ.क्र २७ वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील म्हाडा इ.क्र.10 विलगिकरण कक्षाकरिता सिलींग फॅन, लाईट, वॉटर गिझर बसविणे व त्याअनुषंगिक विदयुतीय कामे करणें कामी येणाऱ्या रक्कम 76,998/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विदयुत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ११९३ विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- 03/03/2022

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय, बोळींज, येथील ऑपरेशन थेटर मध्ये पॉईंट वायरिंग व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत

<u>प्रस्तावाचा मजकुर :-</u>

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,99,368/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बोळीज माता व बाल रुग्णालय येथे अतिदक्ष रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेंकरिता दोन ऑपरेशन थेटर बनविण्यात आले आहेत. सदर ऑपरेशन थेटर मध्ये अतिरिक्त विद्युत पॉईंट काढणेंकरिता वैद्यकिय आरोग्य विभागाने सुचित केले आहे. याकरिता प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ऑपरेशन थेटर मध्ये लाईट, फॅन व रुग्णालयीन उपकरणे बसविणेंकरिता पॉवर पॉईंट काढणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- पॉईंट वायरींग फॉर लाईट-20 नग, पॉईट वायरींग फॉर प्लग-4 नग 6A/10A मॉडयुलर टाईप स्विच-24 नग, 16A मॉडयुलर टाईप स्विच-16 नग, मॉडयुलर टाईप 3 पिन सॉकिट 6A-24 नग, 3 पिन सॉकिट 6A/16A-16 नग, वायरींग स्विचसॉकिटसह-40 नग, 16 मॉडयुलर स्विच बॉक्स -2 नग, 12 मॉडयुला स्विच बॉक्स - 8 नग, 2 मॉडयुलर स्विच बॉक्स - 6 नग, मॉडयुलर इंडिकेटर लॅम्प- 2 नग, SPMCB 32A B सिरीज- 12 नग, SPMCB 32A C सिरीज- 12 नग LED पॅनल लाईट-12 नग, 2x1.5sq.mm मेन्स वायर-116 मी, 2x2.5sq.mm मेन्स वायर-121 मी, 2x4sq.mm कॉपर वायर-55 मी, 1.5 टन एअर कंडीशनर - 4 नग, स्टॅबिलायझर-4 नग, सॉफ्टड्रोन कॉपर पाईप-75 मी. कनडयुट-92 मी, 3x4sq.mm आर्मड केबल-64 मी, SPMCB 32A- 4 नग, TPNDB-1 नग, 4 पोल RCCB-1 नग
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:- ९७,७६,२२०/-
प्रस्तावित खर्च	:- ४,९९,३६८/-
उपलब्ध शिल्लक	:- १४,३३,८४,४१२/-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. १ पृष्ठ क्र. ४ अ.क्र २५ वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील माता व बाल रुग्णालय, बोळींज, येथील ऑपरेशन थेटर मध्ये पॉईंट वायरिंग व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामी येणाऱ्या रक्कम 4,99,368/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ११९४ विभाग :-घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-०३ /०३ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E, F,G,H,I मध्ये पावसाळ्यापूर्वी पक्के व कच्चे पावसाळी नाले खोदाईसाठी व नाल्यातील गाळ काढण्यासाठी बॅकहो लोडर, पोकलेन व इतर यंत्रसामुग्री भाडेतत्वावर घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मध्ये पावसाळयात अनेक सखल भागांमध्ये पाणी भरत असल्याने शहरातील पावसाळी कच्चे व पक्के नाले गाळ काढून त्याची वाहतुक करणे इत्यादी कामे करणे आवश्यक असते. सदर कामे करणे करिता बॅकहो लोडर, पोकलेन द्वारे नाल्यातील गाळ काढणे व काढलेला गाळ डंपर द्वारे वाहून नेण्याचे काम केले जाते.

यापुर्वी सन २०२१-२२ या मागील वित्तीय वर्षामध्ये कोव्हिडच्या पार्श्वभुमीवर मा.आयुक्त सो., यांनी नविन निविदा न मागविता सन २०२०-२१ च्या मंजूर निविदाधारकांकडून त्या वर्षीच्या मंजूर दरामध्ये काम करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सन २०२१-२२ मध्ये **रक्कम रु.४,१७,२४,६७३/- (अक्षरी रक्कम रु.चार कोटी सतरा लक्ष चोवीस हजार सहाशे त्र्याहत्तर मात्र)** एवढा खर्च झालेला होता. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.१

अ.क्र.	प्रभाग समिती	सन २०२१-२२ मध्ये नाले सफाई/खोदाई साठी झालेला खर्च
१	A	रु.५६,७४,३२२/-
२	B	रु.३७,५६,५५८/-
३	C	रु.३३,६९,६००/-
४	D	रु.४७,७५,९३०/-
५	E	रु.६०,४६,३०६/-
६	F	रु.४४,९७,८४८/-
७	G	रु.५१,११,३८६/-
८	H	रु.४२,६०,५५१/-
९	I	रु.४२,३२,१७२/-
एकुण		रु.४,१७,२४,६७३/-

उपरोक्त तक्त्यानुसार सन २०२१-२२ मध्ये रक्कम रु.४,१७,२४,६७३/- इतका खर्च झाला असून सन २०२२-२३ करिता इंधनवाढ व अनुषंगिक खर्चातील वाढ अपेक्षित धरुन उपरोक्त खर्चावर १० ते १५टक्के वाढ अपेक्षित आहे. तरी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता शहरातील नाले सफाई करणे करिता बॅकहो लोडर व पोकलेन तसेच डंपर भाडेतत्वावर घेणे आवश्यक असून सदरकामी अंदाजे रक्कम रु.५ कोटी इतका खर्च अपेक्षीत धरण्यात येत आहे. सदरकामी प्रभाग निहाय वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांचेकडून पावसाळी कच्चे व पक्के नाले यांची यादी घेण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र.२

प्रभाग समिती A

अ.क्र	नाल्याचे नाव	लांबी (मीटर)
१	रेल्वे मोरी ८३ ते यशवंत नगर ते जकात नाका	१५००
२	जकात नाका ते बौध्द विहार	१६०
३	जकात नाका ते राजिव नगर जंक्शन	५००
४	राजिव नगर जंक्शन ते रानपाडा गाव	४५०
५	म्हाडा इमारत क्र.१४ ते म्हाडा इमारत क्र.३	३००
६	नानभाट मनुतलाव ते ओलांडा उघाडी ते रानपाडा जुने स्मशान	१५००
७	चिखलडोंगरी रोड (ग्लोबल सिटी) ते रेती बंदर	१७५०
८	कल्व्हर्ट क्र.८६ ते नारिंगी भवानी मंदिर	८००
९	स्टार प्लॅनेट हॉटेल ते पेनिसुला पार्क	७००
१०	आगाशी ग्रामीण रुग्णालय समोरील नाला	५००
११	चिखलडोंगरी गावाजवळील नाला	५५०
१२	मारंबळपाडा गावाजवळील नाला	२५०
१३	नारंगी क्रिकेट ग्राऊंडमागील नाला	२७०
१४	अपंग पुर्नवसन केंद्र ते खारोडी पुल	४००
१५	म्हाडा इमारत क्र.१४ ते विरार सोपारा लिंक रोड नाला	११००
१६	खारोडी पुल ते शगुन हॉल च्या पाठी मागे	६४५
१७	करमाळे - विशाल नाईक घर ते चंद्रकांत नाईक घरापर्यंत	४०
१८	घोसाळे गावामागे	२००
१९	कोफराड जे.पी.नगर समोरील नाला	२००
२०	गॅस गोडाउन पासुन ते वटार वरली रस्ता पर्यंत	५००
२१	पटाळे तलाव दिशा यांच्या समोरील नवापुर रस्ता	२००
२२	वटार तुसखाडी	४५०
२३	वटार वरली साईडचा नाला व नकाळे उघाडी नाला	१८०
२४	एस के फार्म ते शितामाता मंदिर	२००
२५	निरंकारी हॉल जवळील नाला	२३०
२६	डोंगरपाडा राधाकृष्ण मंदिर मागील नाला	४००
२७	पुरापाडा स्मशानभुमी रोड	३००
२८	आगाशी मुख्य रस्ता कल्वर्ट लगतचे नाले	१५०
एकुण		१४४२५ मी.
		१४.४२५ किलो

तक्ता क्र.३
प्रभाग समिती B

अ.क्र.	नाल्याचे नाव	नाल्याची लांबी (मीटर)
१	रेल्वे प्लॅटफॉर्म क्र.४ ते कल्व्हर्ट नं.८२	७८०
२	कल्व्हर्ट नं.८२ ते देशमुख फार्म	१२००
३	सितारा बेकरी ते सरस्वती हाईट्स (रेहमत नगर)	४७५
४	देशमुख फार्म ते कल्व्हर्ट नं.८३	५६५
५	पिंपळवाडी ते तारवाडी ते कल्व्हर्ट नं.८३	८३५
६	नाना नानी पार्क ते पाम मार्केट	५३५
७	डॉन बास्को चर्च ते अवधुत नगर	११०
८	सदाफुले (जगन्नाथ) हॉस्पिटल ते देशमुख फार्म	७७५
९	पाम मार्केट ते तोंडारे हॉस्पिटल ते कल्व्हर्ट नं.८३	६४०
१०	गणेश चौक नाला	२५०
११	विद्या विकासिनी ते नालेश्वर नगर	२२०
एकुण		६३८५ मी.
		६.३८५ कि.मी.

तक्ता क्र.४
प्रभाग समिती C

अ.क्र.	नाल्याचे नाव	एकुण लांबी(मीटर)
१	वनोठा पाडा ते सोपारा फाटा उजवी बाजु	३७००
२	आर.टी.ओ ऑफीस नाला	१६००
३	कोपरी शिवसेना शाखा	२००
४	आईस फॅक्टरी नाला	५००
५	गोकुळ धाम नाळा	५००
६	विकास नगरी ते नरेंद्रब्रम्ह कॉम्प्ल, गुरुदत्त नगर पर्यंत(गणपती मंदीर ते वेद हाईड्स)	५००
७	कातकरी पाडा मुख्य रोड	१५००
८	कातकरी पाडा,देवकी निवास	१९००
९	सहकार नगर चौधरी वाडी नाला	१५०
१०	जिवदानी पायथा पासून ते हिलपार्क पर्यंत	७५०
११	जिवदानी पायथा नाला,आनंदी नगर ते चोरघे वाडी	७००
१२	के.के.बेकरी पासून ते कोकण नगर रेल्वे मोरी	१०००
१३	गोपचार पाडा ते रेल्वे कोल्व्हर्ट	१३४५
१४	जी.एम नाला ते विजय नगर रेल्वे मोरी(८६ कल्वर्ट)	९००
१५	रेल्वे यार्ड नाला कल्वर्ट	२००
१६	इदगा ओपन नाला/एअर इंडिया ओपन नाला	१२००
१७	फुलपाडा डॅम जवळील नाला	५०
१८	पांडेनगर नाला सहकार नगर,विरार पुर्व	१५०
१९	बाप्पा सिताराम पासून ते मेडिकल	५००
एकुण		१७३४५ मी.
		१७.३४५ कि.मी.

तक्ता क्र.५

प्रभाग समिती D

अ.क्र.	नाल्याचा तपशिल	नाल्याची लांबी (मीटर)
१	राजनगर समाज ते वृंदावन गार्डन	६८०
२	विणा सरस्वती ते वसंत नगरी गेट	२०४५
३	अग्रवाल नगरी (लोड बेअरींग इमारती ते वसई ब्रिज)	४८५
४	वसंत नगरी प्रवेशव्दार ते ब्रॉडवे टॉकिज	६२०
५	ब्रॉडवे टॉकिज ते एव्हरशाईन आश्रम	८१५
६	स्वस्तिक मॉल (राजनगर) ते लालपूल कल्व्हर्ट नं. ७८ वसई पूर्व स्मशानभूमी कल्व्हर्ट	२९०५
७	नवघर पूर्व स्मशानभूमी ते जुने डंपिंग ग्राऊंड, राजावली पूल	२५१५
८	आझाद नगर ते वाघरी पाडा मागील नाला	८००
९	कल्व्हर्ट नं. ७६ नवघर पूर्व विरंगुळा केंद्र ते जुने डंपिंग ग्राऊंड	७६५
एकुण		११७१० मी.
		११.७१० कि.मी

तक्ता क्र.६

प्रभाग समिती E

अ. क्र.	नाल्याचे नाव	नाल्याची लांबी
१	रेल्वे ८२ कल्व्हर्ट ते श्रीप्रस्था ४ था रस्ता कल्व्हर्ट (दोन्ही बाजू) नाला	२४००
२	श्रीप्रस्था ४ था रस्ता कल्व्हर्ट ते करमाळे गावाकडे जाणारा नाला	८५०
३	श्रीप्रस्था ४ था रस्ता कल्व्हर्ट ते समेळ पाडा शिव मंदिरपर्यंतचा नाला	११००
४	समेळपाडा कल्व्हर्ट ते गोगटे सॉल्ट पाईप उघाडीपर्यंतचा नाला व त्याला जोडणारे विविध उपनाले.	२१००
५	रेल्वे प्लॅटफॉर्म १ (गणपती मंदिर) ते रेल्वे ७९ कल्व्हर्ट ते गोगटे पाईप कल्व्हर्ट पर्यंत	१०००
६	प्लॅटफॉर्म ४ ते अलकापूरी मुख्य रस्ता राज नगर टर्न पर्यंत नालासोपारा (पूर्व)	४५०
७	गोगटे पाईप कल्व्हर्ट ते रेल्वे ७८ कल्व्हर्ट पर्यंत नाला.	५०००
८	भाटेला तलाव ते समेळ मुख्य नाला.	४५०
९	छोटी सर गोडी गास ते समेळ मुख्य नाला.	१५००
१०	मोठी सरगोडी आतंबी बीद ते समेळ मुख्यनाला.	१२५०
११	दातार नगर ते राज रिसॉर्टनाला.	१००
१२	अथर्व रेसीडेन्सी ते समेळपाडा स्मशानभूमी मुख्यनाला.	२५०
१३	भक्ती कॉम्प्लेक्स ते फायर स्टेशन (निर्माण नगर) नाला.	२००
१४	रिलायबल कॉम्प्लेक्सच्या पाठी मागून ते ८२ कल्व्हर्ट पर्यंतचा नाला.	२००
१५	आलोक रिजेन्सी ते ८२ कल्व्हर्ट मुख्य रस्ता	१००
१६	एस.टी.डेपो रोड टर्न ते मुख्य नाल्यापर्यंत.	४००
१७	एकविरा मंदिर रावारपाडाकडे जाणारा नाला	२००
१८	भुईगांव समुद्राकडे जाणाऱ्या समांतर रस्ता ते भुईगांवखाडी पर्यंत जाणारा नाला.	३५०
१९	निर्मळ तलाव सुळेश्वर पाडा ते कळंब मुख्य खाडी.	३००
२०	गार्सियन नगर ते सनसिटी रोड पर्यंत नाला.	३५०
एकूण		१८,५५० मी.
		१८.५५० कि.मी.

तक्ता क्र.७
प्रभाग समिती F

अ.क्र.	नाल्यांचे नाव	लांबी
१	वर्तक वसाहत ते स्कायवे हॉटेल	१०००
२	पेल्हार स्कायवे हॉटेल ते सोपाराफाटा चाचा ढाबा पर्यंत	३००
३	इसामनू तबेला ते मेन रोड हॉटेल सालवा	१५००
४	पेल्हार घाटाळ नगर ते हॉटेल सालवा मुख्य हायवे उघाडी पर्यंत	१००
५	वर्तक वसाहत ते मुख्य रस्ता	१००
६	शिरसाड नाका ते चांदीप	१०००
७	एच. पी. पेट्रोल पंप ते सायली पेट्रोल पंपापर्यंत	१०००
८	सोपारा फाटा नॅशनल हॉटेल उघाडी ते सोपारा फाटा मुख्य हायवे उघाडी	१०००
९	जाबरपाडा (पेल्हार) शास. आश्रम शाळा ते जाबरपाडा मुख्य नैसर्गिक नाल्यापर्यंत चर मारणे	१००
१०	पेल्हर समृद्धी हॉटेल ते हायवे ब्रीज उघाडी पर्यंत	३०
११	माणिचापाडा अंतर्गत चर मारणे	५००
१२	जाबरपाडा एम. के. स्टार कम्पाऊंड ते मुख्य रस्ता	५०
१३	जाबरपाडा गावदेवी मंदीर ते मुख्य रस्ता	५०
१४	तोयबा नगर वाकणपाडा येथे चर मारणे	५०
१५	माणिचापाडा ते जाबरपाडा स्मशानभुमीच्या मुखअय नाल्यापर्यंत	३००
१६	वसईफाटा ब्रिज पासुन मुख्य नैसर्गिक नाल्यापर्यंत चर मारणे	१०
१७	सेन्ट लॉरेन्स स्कूल पासुन ते गोविंद पारधी तबेल्या पर्यंत वालईपाडा गाव	२०००
१८	गावदेवी साडी कंपनी पासुन ते एस. डी. एम. कम्पाऊंड पर्यंत चर मारणे	१५००
१९	नऊ एकर ईच्छापुर्ती पासुन ते हरि कमला नगर नाल्यापर्यंत धानिवबाग	१०००
२०	एस. डी. एम. कम्पाऊंड पासुन ते जाधवपाडा मुख्य नाल्यापर्यंत	१०००
२१	जाधवपाडा मुख्य नाला आंबादास यांच्या घरापर्यंत	८००
२२	जाधवपाडा पाल भवन संस्था जवळ ते ओम साई चाळ पर्यंत चर मारणे	५००
२३	श्रीरामनगर सागपाडा स्मशानभुमी पासुन ते तिवारी तबेला पर्यंत	८००
२४	बिलालपाडा, खंडोबा मंदीर जवळ चर मारणे	५००
२५	श्रीरामनगर सेवालाल संस्था जवळ नाले सफाई मुख्य रस्ता लगत	५००
२६	बिलालपाडा डोंगरपाडा गाव उघाडी	१००
२७	धानिवबाग गणेश नगर नाले सफाई	३००
२८	गांगडेपाडा भागवत टेकडी परिसर चर मारणे	८००
२९	रशिद कम्पाऊंड धानिव परिसर चर मारणे	१०००
३०	धानिव तलाव रामधनी नगर परिसर चर मारणे	३००
३१	वाकणपाडा चौधरी कम्पाऊंड चर मारणे	८००
३२	साई श्याम हॉस्पीटल सोपारा मुख्य रस्ता ते बिलालपाडा गाव	२००
३३	अंशीका चिकन सेंटर (शर्मावाडी) ते विद्याविकासिनी आश्रम	५००
३४	होलीफेज स्कूल ते शर्मावाडी तबेला	५००
३५	संतोषभुवन येथील तुलसीनगर टेकडी ते कारगील येथील परमहंस आश्रम पर्यंत	५००
३६	मोफत लाल कम्पाऊंट ते गांगडे पाडा हद्द	१००
३७	बावशेतपाडा नाका ते शंकर मंदीर	२००
३८	नवजीवन भंगार गल्ली	१००
३९	गांगडेपाडा	४००
४०	नवजीवन शौचालयाजवळ	१००
४१	नवजीवन विठ्ठल मंदिरामागे	१५०
४२	पेल्हार पाण्याच्या टाकी ते शिवेचा पाडा (मुख्य नैसर्गिक नाळा)	५०००
४३	जाबर पाडा स्मशानभुमी पासुन ते कृषी रोप वाटीका पर्यंत (खान कम्पाऊंड)	२०००

४४	बावशेतपाडा येथील धनंजय प्लॉट ते कारगील नगर मुख्य नाल्यापर्यंत	७००
४५	धानिव तलाव सोपारा मुख्य रस्ता ते चिचपाडा मुख्य रस्ता पर्यंत	४८००
४६	जयस्वाल चाळ संतोषभुवन ते अंशीका चिकन सेंटर शर्मावाडी पर्यंत	६००
४७	गांगडेपाडा मुख्य नाला	५००
४८	सुहाना चाळ (पापुळ गणू भोईर यांच्या घरापासुन सोपारा मुख्य रस्ता (स्मशानभुमी) जाधवपाडा	१५००
एकुण		३६८४० मी. ३६.८४० कि.मी.

तक्ता क्र.८

प्रभाग समिती G

अ.क्र.	नाल्याचे नाव	लांबी
१	गोल्डन तुळीप होटेल अग्रवाल ब्रीज	६०००
२	वालीव फाटा ब्रिज ते सेक्टो केमीकल पर्यंत जाणारा नाला	२०००
३	किचन गार्डन ते बीडसकर विहीर	२००
४	धुमाळ नगर ते जय नगर दोन्ही बाजूस कच्चा नाळा	३००
५	गोलानी मज्जीद ते रिलायन्स टॉवर कचा नाळा	१०
६	वाघमारे हॉस्पिटल मागे पक्का नाळा	२०
७	शिव भीम नगर गणेश धुमाळ च्या घरामागून काच कंपनी पर्यंत	२०
८	अगरवाल काच कंपनी मागील नाळा	७०
९	गोखिवरे मधुबन बालाजी हॉटेल ते लाकडी पुलापर्यंत नाळा	४०००
१०	भोईदा पाडा ते घर हो तो ऐसा पर्यंत नाळा	३०००
११	रेंज ऑफिस ते चिंचपाडा ब्रिज	८००
१२	राजवली आश्रम ते मांगउरली पाडा ते घर हो तो ऐसा पर्यंत	३५००
१३	मधुबन पासून ते नायगाव खाडी पर्यंत नाळा	३०००
१४	सातिवली बापा सीताराम मंदिर ते मंगलमूर्ती अपार्टमेंट विहीरपर्यंत नाळा	६००
१५	जग्गा यांचे घरापासून ते मुख्य नाल्या पर्यंत	४०
१६	कबरीस्तान तबेला पासून पायधुनी ब्रिज धुरी इंडस्ट्रीज फेस टू पर्यंतचा नाळा	७००
१७	लोहार चाळ शौचालय ते दामू पाडा नवीन शाळा जवळील शौचालय पर्यंत	४५०
१८	गावदेवी मंदिर ते दामू पाडा नवीन नाळा जवळ शौचालय पर्यंत	४००
१९	पारधी यांच्या विहिरीपासून ते जेन मंदिर पर्यंत नाळा	८००
२०	बर्मा शेल मुख्य ब्रीज ते कबरीस्तान तबेला पर्यंतचा नाळा	८००
२१	पायधुनी नाका ते वालीव फाटा ब्रीज	७००
२२	दामू पाडा ते आंबेडकर नगर ते सातीवली मुख्य नाका ते ते कुवरा पाडा ते पायधुनी मुख्य रस्ता ब्रिज मंगल गॅरेज पर्यंत	१५००
२३	जुचंद्र हासोबा मंदिर ते मुख्य नाल्यापर्यंत	८००
२४	सुकाला पाडा ते मुख्य खाडीपर्यंत	१६००
२५	शाळा कर्मवीर भाऊराव पाटील स्कूल ते सोपारा खाडीपर्यंत	५०००
२६	स्मशानभूमी जुचंद्र ते गिरिजा नगर पर्यंत	७००
२७	दफनभूमी परेरा नगर ते मुख्य खाडीपर्यंत	४५०
२८	बापाने तबेला पाडा ते विघा इंडस्ट्रियल ते रेल्वे ब्रिज ते कामण खाडी	२८००
२९	परेरा नगर बिल्डींग नंबर १ नाळा	१५०
३०	स्टार सिटी ते एम एस सी बी ऑफिस पर्यंत नाळा	३००
३१	बनारसी मिठागर ते सोपारा खाडीपर्यंतचा नाळा	२००
३२	ग्लोबल एरेना ते सेंटॅक्स पासून ते खाडीपर्यंतचा नाळा	१५००
३३	देऊळ स्टॉप ते खंडीपाडा पर्यंतचा नाळा	२०००
३४	रुस्तम कंपाउंड जवळचा नाळा	२००
३५	लोखंडी पाडा स्टॉप ते कोल्ही मराठी शाळेमागे नाळा	१००

३६	चिंचोटी नदी	१०००
३७	प्रीतम धाब्याच्या बाजूने ते खाडीपर्यंतचा नाळा	७००
३८	न्यू काठेवाडी हॉटेल पासून ते खाडीपर्यंतचा नाळा	१०००
३९	कोहिनूर मार्बल पासून ते खाडीपर्यंतचा नाळा	५००
४०	टी एन टी च्या बाजूचा नाळा	५००
एकुण		४८४१० मी.
		४८.४१० कि.मी.

तक्ता क्र.९

प्रभाग समिती H

अ.क्र	नाल्याचा तपशिल	लांबी
१	इंप्रेस टॉवर, कौल सिटी चुळणा सॉड नाला, सांडोर रस्ता ते गास रस्ता तबेला	१८००
२	चुळणा सॉड नाला, हॉटेल बालाजी ते टेम्पो स्टँड	१३००
३	सनसिटी पोलीस चौकी ते भवानी मंदीर पर्यंत	१५००
४	टोक पाडा मंदीर ते नालासोपारा उघाडी	४०००
५	भवानी मंदिर पुढील उघाडी (टोकपाडा उघाडी व सोपारा उघाडी) ते टी पॉईंट उघाडी	१५००
६	टी पॉईंट उघाडी (टोकपाडा उघाडी व सोपारा उघाडी) ते पंप रुम ते रेल्वे कलवर्ट नं. ७८ लाल पुल	२५००
७	भवानी मंदीर मागील नाला ते गोकटे सॉल्ट उघाडी	३०००
८	भवानी मंदिर पहिली उघाडी ते गोकटे सॉल्ट उघाडी (सनसिटी मधुन जाताना उजवी बाजु)	२५००
९	राजहंस ते उमेळमान स्मशानभूमी पर्यंत	१५००
१०	उमेळा उघाडी ते थॉमस बिल्डींग (डायानगरी) उमेळमान	२०००
११	रेल्वे उघाडी नं. ७५ ते महादेव मंदिर, डायानगरी उमेळमान	१५००
एकुण		२३१०० मी.
		२३.१०० कि.मी

तक्ता क्र.१०

प्रभाग समिती I

अ क्र	नाल्याचे ठिकाण	नाल्याची लांबी
१	जी.जी.कॉलेज उघाडी ते मुख्य खाडी नाला	३०००
२	पाचुबंदर डंपिंग ग्राउंड ते परुळेकर शाळा	१५००
३	महालक्ष्मी ते खोपवाडी नाला	१०००
४	किल्ला ते पाचुबंदर मुख्य नाला	१५००
५	डिमार्ट ते उमेळा फाटा नाला	५००
६	पापडी बौध्दवाडा ते पापडी औद्योगिक वसाहत नाला	६००
७	घाटाळ नगर ते उमेळा स्मशानभुमी नाला	७००
८	वडवली स्मशानभुमी उघाडी ते खाडी	३००
९	साकाई नगर-२ ते नायगाव स्टेशन	५००
१०	विजय पार्क ते मरियम नगर नाला	५००
१२	तांदुळ बाजार ते फिलीप्स कॉम्प्लेक्स उघाडी	७००
१३	नादोली ते नवापाडा खाडीपर्यंत	२००
१४	भडाळे पाडा नाला	२००
१५	कांडलई नाला	५००
१६	तांबडीपाडा स्मशान भुमी	७००
१७	कॅन्सर हॉस्पिटल नाला	५००

१८	पापडी घाटाळ नगर ते उमेळा नायगाव खाडी नाला	७००
१९	नायगाव खाडी ते उमेळा मिठानगर नाला	३०००
एकुण		१५९०० मी.
		१५.९०० कि.मी.

वरीलप्रमाणे ९ प्रभाग मिळून **एकूण १९२.६६५ किलो मिटर** लांबींच्या कच्चा व पक्क्या नाल्यांची सफाई करणे करिता ९ प्रभाग निहाय स्वतंत्र निविदा मागवून होणारा अंदाजीत खर्च रु.५कोटी इतका अर्थसंकल्पातील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील **नाले सफाई /खोदाई** या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित तरतुद **रु.५ कोटी** मधून भागवू शकतो.

तरी शहरातील कच्चे व पक्के पावसाळी नाले सफाई, खोदाई व गाळ काढून वाहतुक करणेकामी जेसीबी, पोकलेन व डंपर भाडेतत्वावर घेणेकामी ई-निविदा मागवून होणाऱ्या खर्चास प्रशाकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी पुढील ठराव करण्यात येत आहे.

निर्णय :- सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F, G,H,I मध्ये पावसाळ्यापूर्वी पक्के व कच्चे पावसाळी नाले खोदाईसाठी व नाल्यातील गाळ काढण्यासाठी ९ प्रभाग निहाय स्वतंत्र ई-निविदा मागवून बॅकहो लोडर, पोकलेन, डंपर व इतर यंत्रसामुग्री भाडेतत्वावर घेणेकामी व होणाऱ्या अंदाजीत रक्कम रु.५ कोटी एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

(अनिलकुमार पवार) ५/३
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ११९५ दिनांक : ०३/०३/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए' मधील जकात नाका, साईनाथ नाका, वाय.के.नगर मेन रोड, आगरी चौक आणि एच.डी.आय.एल. मध्ये दुभाजक बसविणे.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१,३९,२१,७०५/-

३) प्रस्तावाची गरज :- वसई - विरार शहर महानगरपालिका विरार (प.) मध्ये जकात नाका, साईनाथ नाका, वाय.के.नगर मेन रोड, आगरी चौक आणि एच.डी.आय.एल येथील दुभाजक नादुरुस्त झाले आहेत. सदरच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात रहदारी होत असते त्यामुळे पादचारी तसेच रहदारी करण्याचा नागरिकांना अडचणींचा सामना करावा जागत आहे. तरी मा.आयुक्त सो यांनी सुरक्षिततेच्या व सुशोभिकरणाच्या दृष्टीने दुभाजक बसविण्याचे आदेश दिले आहेत.

सदर कामी रु.१,३९,२१,७०५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंर्तभूत काम :- दुभाजक बसविणे

परिमाण :- लांबी - १९३० मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम नव्याने प्रस्तावित आहे.

६) जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- रस्ता

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- विकास निधी अंतर्गत इतर विकास कामे

ब) मुळ तरतूद :- रु.७,००,००,०००/-

क) शिल्लक :- रु.४,६३,२१,८०६/-

ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र.०१ पृष्ठ क्र.९७ अ.क्र.०७

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. नं.१२८ पृष्ठ क्र.०५ अ.क्र.३६ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

:ITA /Tippni/Goshwara/Tharav/Page.617

१०) **ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए' मधील जकात नाका, साईनाथ नाका, वाय.के.नगर मेन रोड, आगरी चौक आणि एच.डी.आय.एल. मध्ये दुभाजक बसविणे कामी रक्कम रु.1,39,21,705/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

(अनिल कुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ११८६ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ३/३ /२०२३

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.२ मध्ये कोपरी नाका येथे क्रॉकीट रोड बनविणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१)प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.२ मध्ये कोपरी नाका येथे क्रॉकीट रोड बनविणे.

२)अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ९५,८०,५०५/-

३) प्रस्तावाची गरज :- सादर करण्यात येते की, वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मध्ये कोपरी नाका येथे रस्त्याची दुराव्यस्था झालेली आहे. व मोठया प्रमाणात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचा रस्ता हा राष्ट्रीय माहामार्ग-८ ला जोडणारा मुख्य रस्ता असल्यामुळे रस्त्यावर वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. तसेच त्या ठिकाणी मोठया प्रमाणात लोकवस्ती आहे त्यामुळे तेथिल नागरीकांना ये-जा करण्यास मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. मा.आयुक्त सो. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहाणी केली असता येथे कॉंक्रीट रस्ता बनविणे गरजेचे आहे असे सुचविले आहे जेणे करुन गैरसोय होणार नाही.

त्यानुसार सदर रस्त्याचे मे.जवादे ॲण्ड असोसिएट्स कन्सलटींग इंजिनियर्स हयांनी रक्कम रु.९५,८०,५०५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- लांबी - १५०.००मी
रुंदी - १२.०० मी

अंतर्गत कामे :- Dismantling, Excavation, Disposing, Hard murum, Sub-base, lean concrete, M-४० PCC, Steel, Construction, Joints, LDPE, M-४०Beam, ८०mm Paver block, etc.

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम प्रथम प्रस्तावित आहे.

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :-

अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- रस्ता बांधकाम

ब) मुळ तरतूद :- ४०,००,००,०००/-

क) शिल्लक :- ३२,५१,०५,०८९/-

ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. १ पृष्ठ क्र. ०२ अ.क्र. १३

तरी सरदचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.२ मध्ये कोपरी नाका येथे क्रॉकीट रोड बनविणेकामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९५,८०,५०५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

W/23

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ७७९७ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ४/३/२०२१

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व जी.एम.ब्रेवरीज ते जय जिवदानी हॉस्पीटल पर्यंत रस्त्याच्या मधोमध दुभाजक बांधणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१)प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व जी.एम.ब्रेवरीज ते जय जिवदानी हॉस्पीटल पर्यंत रस्त्याच्या मधोमध दुभाजक बांधणे.

२)अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १,१६,८५,५१३/-

३) प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी.एम.ब्रेवरीज ते जय जिवदानी हॉस्पीटल पर्यंत रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग -८ ला जोडणारा मुख्य रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहनाची संख्या मोठया प्रमाणात असते व सदर रस्त्यावर दुभाजक नसल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच रस्त्यावर दुभाजक बसविण्याकरीता नागरीकांची वारंवार तक्रार येत असे करीता रस्त्यावर दुभाजक बसविणे गरजेचे आहे.

त्यानुसार सदर दरसूची २७-२१ नुसार रक्कम रु. १,१६,८५,५१३/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- लांबी - १६२०.०० मी
रुंदी - ०.२० मी

अंतर्गत कामे :- Excavation, Disposing, Soling, M-१० PCC, Steel, M-२० pardi, Filling, Painting etc.

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम प्रथम प्रस्तावित आहे.

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :-

अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- इतर विकास कामे

ब) मुळ तरतूद :- १५,००,००,०००/-

क) शिल्लक :- ७,५६,९५,८२८/-

ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. १ पृष्ठ क्र. ८७अ.क्र. ४

तरी सरदचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व मध्ये जी.एम.ब्रेवरीज ते जय जिवदानी हॉस्पीटल पर्यंत रस्त्याच्या मधोमध दुभाजक बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१,१६,८५,५१३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ७७९८ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ३/३/२०२१

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.०४ मध्ये नारंगी रेल्वे फाटक ते एचडीआयएल पर्यंत क्रॉकीट रोड बनविणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१)प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.०४ मध्ये नारंगी रेल्वे फाटक ते एचडीआयएल पर्यंत क्रॉकीट रोड बनविणे

२)अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ३,९३,१५,३९६/-

३) प्रस्तावाची गरज :- सादर करण्यात येते की, वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' मध्ये नारंगी रेल्वे फाटक ते एचडीआयएल येथे रस्त्याची दुराव्यस्था झालेली आहे. व मोठया प्रमाणात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्य रस्ता असल्यामुळे अवजड वाहने व टँकर यांची रस्त्यावर मोठया प्रमाणात वर्दळ असते. तसेच त्या ठिकाणी रेल्वे फाटक आहे त्यामुळे तेथिल नागरीकांना ये-जा करण्यास मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. मा.कार्यकारी अभियंता सो. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहाणी केली असता येथे कॉंक्रीट रस्ता बनविणे गरजेचे आहे असे सुचविले आहे जेणे करुन गैरसोय होणार नाही.

त्यानुसार सदर रस्त्याचे मे.जवादे ॲण्ड असोसिएट्स कन्सलर्टींग इंजिनियर्स हयांनी रक्कम रु.३,९३,१५,३९६/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- लांबी - ४००.००मी

रुंदी - ७.०० मी

अंतर्गत कामे :- Dismantling, Excavation, Disposing, Hard murum, Sub-base, Drylean concrete, M-४० PCC, Steel, Construction, Joints, LDPE, M-४०Beam, ८०mm Paver block, etc.

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम प्रथम प्रस्तावित आहे.

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :-

अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- रस्ता बांधकाम

ब) मुळ तरतूद :- ४०,००,००,०००/-

क) शिल्लक :- २५,४७,३३,५६५/-

ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. १ पृष्ठ क्र. २ अ.क्र. २२

तरी सरदचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :-वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.०४ मध्ये नारंगी रेल्वे फाटक ते एचडीआयएल पर्यंत क्रॉकीट रोड बनविणेकामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,९३,१५,३९६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार,पुर्व पिन नं.४०१३०५

प्रशासकीय ठराव क्रं : ७७९९

विभाग : विद्युत विभाग,
दिनांक : ०३/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील माणिकपूर पाण्याची टाकी येथील पाणी पुरवठा इमारती मध्ये इलेक्ट्रीफीकेशन काम करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१. अंदाजपत्रकीय रक्कम :- ४१९५८३.००

२. कामाची आवश्यकता :- प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रात विद्युत विभागामार्फत इलेक्ट्रीफीकेशन काम करण्यात येते. बांधकाम विभागामार्फत पाणी पुरवठा इमारती मध्ये नुतनीकरणाचे काम सुरु करण्यात आले आहे. सदर ठिकाणी पाहणी केली असता पाणी पुरवठा इमारती मध्ये इलेक्ट्रीफीकेशन काम करणे गरजेचे आहे.

३. जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

४. कामाचे स्वरुप :- 9W passage light = 4.00 Nos, LED square 13-15w = 8.00 Nos, Led 20w – 16.00 Nos, Celling fan 900/1050mm = 1.00 Nos, Bracket fan 400mm – 2.00 Nos , Celling fan 1200 Mm – 6.00 Nos, Fan regulator – 7.00 Nos, water heater 3.00 Ltr – 1.00 Nos, AC 1Ton – 1.00 Nos, AC 1.5 Ton – 2.00 Nos, Copper pipe – 12.00 Mtr, Refrigerator 165 to 205 Ltr – 1.00 Nos, Inverter 2500 VA – 1.00 Nos, Battery 200Ah – 2.00 Nos,LED flood light 90-100w – 2.00 Nos,LED flood light 200w – 2.00 Nos, Point wiring – 49.00 Nos, Independent point – 15.00 Nos

५. लेखाशिर्षक:- इतर दिवाबत्ती व्यवस्था.

उपरोक्त नमुद प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील माणिकपूर पाण्याची टाकी येथील पाणी पुरवठा इमारती मध्ये इलेक्ट्रीफीकेशन काम करणे करिता कामाच्या होणा-या रक्कम रु.४१९५८३.०० खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील माणिकपूर पाण्याची टाकी येथील पाणी पुरवठा इमारती मध्ये इलेक्ट्रीफीकेशन काम करणे करिता कामाच्या होणा-या रक्कमरु ४१९५८३.०० पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त
परिमंडळ -३
वसई विरार शहर महानगरपालिका









वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू.) जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1202.

विभाग : बांधकाम
दिनांक : 03/03/2022.

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे येथील काशी विश्वेश्वर मंदिरासमोर आर.सी.सी. क्रॉसींग बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये मुख्य रस्त्यालगत काशी विश्वेश्वर मंदिरासमोर असलेले पाईप क्रॉसिंग हे रस्त्याच्या थोडे वर असल्याने नागरीकांना त्याचा त्रास होत आहे. सदर रस्त्याच्या आत पाण्याची पाईप लाईन अंथरल्यामुळे पाईप गटार हे अत्यावश्यक परिस्थितीमध्ये रस्त्याच्या वर घेण्यात आले होते. तरी सदरचे गटार हे रस्त्याच्या समान पातळीवर करण्याकरीता आर.सी.सी. क्रॉसींग बांधणे गरजेचे आहे.

वरील तक्रारींची दखल घेऊन पाहणी केली असता सदर ठिकाणी आर.सी.सी. क्रॉसींग बांधणे करीता सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे येथील काशी विश्वेश्वर मंदिरासमोर आर.सी.स. क्रॉसींग बांधणे.	रु. ४४८४१९/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्या अनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा. आयुक्त सो. ह्यांचे कडील दि.२८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.य.वि.श.म./अजा/४८/२०२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ - ०३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. १२०३ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :- ०७/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील ४० मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर (TTL) वाहनाचे दुरुस्ती करीता स्पेटरपार्ट खरेदी करणेस येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र - आचोळे येथे टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंचीचे अग्निशमन व जीवसंरक्षक वाहन क्रमांक एम.एच. ४८ सी- ००३२ कार्यरत आहे. महानगरापलिका हद्दीमध्ये व हद्दी बाहेर कोणत्याही घटनास्थळी आग व रेस्क्यु वर्दी मिळताच आपल्या महानगरपालिका अग्निशमन विभागाचे कर्मचारी अग्निशमन वाहनासह त्वरीत घटनास्थळी पोहचतात. परंतु टर्न टेबल लॅडर वाहनामध्ये काही तांत्रिक बिघाड झाला आहे असे संदर्भिय अर्जान्वये वाहनचालक यांनी कळविले आहे.

वाहनाचे दुरुस्ती कामे करण्यासाठी लागणारे स्पेअर पार्ट व वाहनाची दुरुस्ती करणारे तांत्रिक तज्ञ व सुविधा महानगरपालिका व लगतच्या पुणे, मुंबई या परिसरात नाही. सदर वाहन विदेशामधील ऑस्ट्रिया येथून विकत घेतले असल्याने त्यासाठी लागणारे स्पेअरपार्ट रोझनबार कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडे उपलब्ध होतात. परंतू यापूर्वी गेली सात वर्ष सदर वाहनाचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा ठेका ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. कंपनीस देण्यात आला होता. सदर AMC ठेका सप्टेबर २०२० पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वाहनाचे दुरुस्ती करीता AMC ठेका नाही.

त्यामुळे वाहनचालकाचे प्राप्त अहवालानूसार अग्निशमन विभागाकडिल टर्न टेबल लॅडर वाहनाची तपासणी मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. या कंपनीच्या तांत्रिक अभियंता कडून केली असता त्यांनी पुढील प्रमाणे दुरुस्ती होणे अपेक्षित आहे असे कळविलेले आहे.

1) Seal kit cylinder 160/90 for Metz M6122-422007
2) Hydraulic hose DN6x180
3) Proximitty switch shutter 12mm M30/M12 IIM208
4) Hose hydraulic
5) Cable with plugs
6) Draw wire sensor with 7500mm stroke
7) Piping MBT A9708302315
8) Piping MBT A9738300015
9) Piping MBT A9708302415
10) Piping MBT A9738301515
11) Rubber Mounting
12) Leaf Spring Shim MBT A9703250184
13) Cap Screws
14) Nut
15) Leaf Spring Shim MBT A9703250184
16) Stop Buffer Spring Leaf MBT
17)Spring U Bolt MBT
18)Shackle MBT
19)Bushing MBT
20) Nut N13023 18x1.5
21) Hex Screw MBN 10105-C M18x1.5x140-10.9
22) Nut N13023-M 12
23) Screw
24) Hexagon Nut

प्र/क ३५७

उपरोक्त दुरुस्ती कामे करणे करीता आवश्यक असलेले स्पेअरपार्टसचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर येथील कुशल तांत्रिक अभियंता यांचेमार्फत वाहनाची तपासणीसाठी रक्कम रु. ४८,३८०/- खर्च आला असून उपरोक्त स्पेअरपार्ट खरेदी करणे करीता वस्तु व सेवा करासह एकुण रक्कम रु. १३,००,८०७/- खर्च येत आहे असे एकुण रक्कम रु. १३,४९,१८७/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील खर्च सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका मधील पान नं. ३१ वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा मध्ये तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी टर्न टेबल लॅडर वाहनाचे उपरोक्त दुरुस्ती कामे करण्यासाठी लागणारे स्पेअरपार्टस महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार रोझनबार या मुळ उत्पादक कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचे कडून विना ई-निविदा थेट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १३,४९,१८७/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंच शिडीचे वाहन विदेशातील रोझनबार इंटरनॅशनल यांचेकडून खरेदी केले आहे. या वाहनासाठी लागणारे स्पेअरपार्ट भारतातील अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचे व्यतिरिक्त कोठेही उपलब्ध होत नसल्यामुळे लागणारे स्पेअरपार्ट हे मुळ कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून उपलब्ध करावे लागणार आहेत व त्यांनी साहित्याच्या दराबाबत प्रोफॉर्मा इनव्हाईस दिले आहे. प्रोफॉर्मा इनव्हाईस मधील दराप्रमाणे टर्न टेबल लॅडर वाहनास लागणारे साहित्य रोझनबार इंटरनॅशनल कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार विना निविदा थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १३,४९,१८७/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

7/3/22

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. १२०४

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०७/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील वाहनांकरीता हाय प्रेशर गन दरपत्रक मागवून खरेदी करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पुर्व) ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (पश्चिम) ५) सनसीटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (पश्चिम) ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई (पूर्व) अशी मिळुन ०७ अग्निशमन केंद्रे २४X७ कार्यरत आहेत.

अग्निशमन विभागाकडे एकुण ३१ वाहने असून सदर वाहने २४ तास कार्यरत आहेत. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शहराचा विकास झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. नवघर (पूर्व), वालीव, गोखिवरे, गौराईपाडा, पेल्हार, कामण, विरार व पापडी हया भागात मोठया औद्योगिक वसाहती असुन आग लागण्याच्या दुर्घटना सातत्याने होत असतात. अशा आगीच्या वर्दीवर पाण्यामार्फत आग विझविण्यासाठी हाय प्रेशर गनचा वापर केला जातो. त्यामुळे सदर अग्निशमन वाहनांमध्ये हाय प्रेशर गन ठेवलेल्या असतात. सदर हाय प्रेशर गन नादुरुस्त व खराब झाले बाबत अग्निशमन वाहनचालक यांनी अहवाल सादर केला आहे.

सदर हाय प्रेशर गन हया मिनी वॉटर टेंडर, वॉटर टेंडर व वॉटर बाऊझर अग्निशमन वाहने खरेदी केली असतांना वाहनांसोबत खरेदी करण्यात आलेल्या होत्या. सदर गनचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. तसेच हाय प्रेशर गन दुरुस्ती करण्यास महापालिकेकडे मंजूर ठेकेदार नाही. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने सदर हाय प्रेशर गन दरपत्रक मागवून खरेदी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त वाहनांवर १६ नग हाय प्रेशर गन खरेदी करावे लागतील त्यासाठी वस्तु व सेवा करासह अंदाजीत रक्कम रु. ४,५३,१२०/- खर्च अपेक्षित आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प सन २०२०-२०२१ सह सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर अ.क्र. ४ लेखाशिर्ष अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी / गणवेश खरेदी यामध्ये एकुण वार्षिक रुपये ६० लक्ष तरतुद करण्यात आली असून त्या मधून खर्च करता येईल.

तरी अग्निशमन विभागातील वाहनांवर हाय प्रेशर गन दरपत्रक मागवून खरेदी कामी व वस्तु व सेवा करासह येणा-या रक्कम रु. ४,५३,१२०/- पर्यंतचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागातील वाहनांवर हाय प्रेशर गन दरपत्रक मागवून खरेदी कामी व वस्तु व सेवा करासह येणा-या रक्कम रु. ४,५३,१२०/- पर्यंतचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(अनिल कुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ७२०५ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०७/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील मकिटा चैन सॉ कटर मशीनचे चैन व पाटे यांचे दुरुस्ती साठी साहित्य खरेदी करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्ती, पुर परिस्थिती, झाडाचे कॉल मोठया प्रमाणावर प्राप्त होत असतात. महापालिका क्षेत्रामधील रहदारीच्या ठिकाणी, वस्तीच्या ठिकाणी, घरावर, इमारतींवर, विद्युत तारांवर, ट्रांन्सफॉर्मरवर, वाहनांवर, रस्त्यावर खुप मोठया प्रमाणात झाडे उन्मळून पडतात. सदर विविध प्रकारची प्रचंड मोठी झाडे सॉ कटर मशीनचे सहाय्याने कापून बाजूला करावी लागतात. त्यामुळे अग्निशमन विभागाकडे वापरात असलेले सॉ कटर मशीनचे चैन ची धार बोथट होते व पडलेली झाडे कापून बाजुला करण्यासाठी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिन चैनला धार लावणे करीता Saw Chain Sharpeing Machine तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर मशीनचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता महापालिकेकडे मंजूर ठेकेदार नाही. तसेच सदर मशीनचा उपयोग अत्यावश्यक सेवेत करण्यात येतो म्हणून सदर मशीनची दुरुस्ती मकिटा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर यांचेकडून करणे आवश्यक आहे. मे. मकिटा पॉवर टूल्स इंडिया प्रा.लि. कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. तनुष इंटरप्रायजेस यांनी मशीनचे दुरुस्ती साहित्या करीता वस्तु व सेवा करासह रक्कम रु. ७,९६,२६०/- चे दरपत्रक तसेच मकिटा कंपनीचे सर्व्हिस ऑथरायझेशन पत्र सादर केलेले आहे. सदर पत्र सोबत जोडले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ०५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरूस्ती / कटर मशीन दुरूस्ती निगा** यामध्ये एकुण वार्षिक रुपये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी मकिटा कटर मशिनचे दुरुस्ती साहित्य अत्यावश्यक बाब असल्याने महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार मकिटा या मुळ उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. तनुष इंटरप्रायजेस यांचे कडून विना ई-निविदा थेट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७,९६,२६०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामधील चैन सॉ कटर मशीनचे दुरुस्ती साहित्य मकिटा या मुळ उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. तनुष इंटरप्रायजेस यांचे कडून विना ई-निविदा थेट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७,९६,२६०/- खर्चास महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(मनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - ७२०६ विभाग - विद्युत
दिनांक - ७/९/२०२२

प्रस्तावाचा विषय : - प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील पाटणकर पार्क नागरी सुविधा केंद्र व समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग व्यवस्था करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

कामाचा खर्च :- **रु.५,००,०००/-**
४,५३,०६६/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील पाटणकर पार्क नागरी सुविधा केंद्र व समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग करणे गरजेचे आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका
कामाचे स्वरुप :- बोरींग /ड्रीलिंग-८४ मी., जी.आय पाईप-८४ मी, जी.आय.स्ट्रीप-२८० कि.ग्रॅ, आर.सी.सी चेंबर कव्हर-१४ नग.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील पाटणकर पार्क नागरी सुविधा केंद्र व समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग व्यवस्था करणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

०७/९/२२

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - ९२०७ विभाग - विद्युत
दिनांक - ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय : - **प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील LMO प्लांट येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग व्यवस्था करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

कामाचा खर्च :- रु.५,००,०००/-
१,३९,४७९/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णाल येथे LMO प्लांट उभारण्यात आले आहे. सदर ठिकाणी इमारत व विद्युत उपकरणे सुरक्षित राहण्याकरिता अर्थिंग बसविणे आवश्यक आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- बोरींग /ड्रीलिंग-२४ मी., जी.आय पाईप-२४ मी, जी.आय.स्ट्रीप-१२० कि.ग्रॅं, आर.सी.सी चेंबर कव्हर-०४ नग.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील LMO प्लांट येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने अर्थिंग व्यवस्था करणे कामी महानगरपालिकाअधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. । २०३ — विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- ०७/०३/2022

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील आय.सी.यु व शस्त्रक्रीया विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावाचा मजकुर :-</u>

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,86,842/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथे नव्याने आय.सी.यु. व शस्त्रक्रीया विभाग उभारले असुन सदर ठिकाणी वातानुकुलीत यंत्रणा बसविणे गरजेचे आहे
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- वातानुकुलीत यंत्रणा:- 1.5 टन - 05 नग, कॉपर पाईप:- 125 मी पी.व्ही.सी. पाईप :- 135 मी, 3 x4 स्वेअर एम.एम. कॉपर वायर:- 150 मी
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

   मुळ तरतूद :- 15,00,00,000/-

   या पुर्वीचा खर्च :-

   प्रस्तावित खर्च :-

   उपलब्ध शिल्लक :-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. पृष्ठ क्र. अ.क्र वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील आय.सी.यु व शस्त्रक्रीया विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी येणाऱ्या रक्कम 4,86,842/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - ७२०९ विभाग - विद्युत
दिनांक - ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय : - प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील नव्याने बांधण्यात आलेल्या आय.सी.यु., शस्त्रक्रीया विभाग व स्टोर रुम करीता केबल व्यवस्था करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

कामाचा खर्च :- रु.५,००,०००/-
२,४१,३८८/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सोपारा सामान्य रुग्णालय येथे नव्याने आय.सी.यु., शस्त्रक्रीया विभाग व स्टोर रुम उभारण्यात आले आहे. सदर ठिकाणी विद्युतीकरण करणे कामी केबल अंथरणे आवश्यक आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- ४x४ स्वेअर एम.एम. कॉपर केबल :- ४४५ मी., ४x१६ स्वेअर एम.एम. कॉपर केबल :- ४५ मी., ४x२५ स्वेअर एम.एम. कॉपर केबल :- ४५ मी.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील नव्याने बांधण्यात आलेल्या आय.सी.यु., शस्त्रक्रीया विभाग व स्टोर रुम करीता केबल व्यवस्था करणे कामी महानगरपालिकाअधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. १२।०

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-07/03/2022

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील शस्त्रक्रीया विश्रांती विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 3,27,452/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथे नव्याने शस्त्रक्रीया विश्रांती विभाग उभारले असुन सदर ठिकाणी वातानुकुलीत यंत्रणा बसविणे गरजेचे आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- वातानुकुलीत यंत्रणा:- 1.5 टन - 03 नग, कॉपर पाईप:- 100 मी पी.व्ही.सी. पाईप :- 91 मी., 3 x4 स्वेअर एम.एम. कॉपर वायर:- 100 मी
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:-
प्रस्तावित खर्च	:-
उपलब्ध शिल्लक	:-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. पृष्ठ क्र. अ.क्र वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील शस्त्रक्रीया विश्रांती विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी येणाऱ्या रक्कम 3,27,452/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

07/03/2022

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - 12.11 विभाग - विद्युत
दिनांक - 07/03/2022

प्रस्तावाचा विषय : - **प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील नव्याने बांधण्यात आलेल्या क्ष-किरण विभाग, सोनोग्राफी विभाग, फार्मसी विभाग, स्टोर रुम व ओपीडी कक्षात नव्याने विद्युतीकरण करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

कामाचा खर्च :- **रु.५,००,०००/-**
४,८५,७५६/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सोपारा सामान्य रुग्णालय येथे नव्याने क्ष-किरण विभाग, सोनोग्राफी विभाग, फार्मसी विभाग, स्टोर रुम व ओपीडी विभाग उभारण्यात आले आहे. सदर ठिकाणी विद्युतीकरण करणे आवश्यक आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- पॉईंट वायरिंग :- ७२ नग, इंडीपेंडेट प्लग:- ०८ नग, स्विच सॉकेट :- ८२ नग, मॉडयुलर बॉक्स :- ३८ नग, सिंगल पोल एम.सी.बी. :- ०९ नग, एल.ई.डी. पॅनल लाईट :- १२ नग, सिलींग फॅन :- १५ नग, इन्वरटर :- ०३ नग, २०० amp बॅटरी :- ०६ नग, जी.आय. शीट :- ०९ sqmm. मेटल वर्क :- १०० kg, बस बार :- ०२ नग, २x१० स्वेअर एम.एम. कॉपर वायर :- ३० मी., २x१.५ स्वेअर एम.एम. कॉपर वायर :- १४० मी., २x४ स्वेअर एम.एम. कॉपर वायर :- १४० मी.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील नव्याने बांधण्यात आलेल्या क्ष-किरण विभाग, सोनोग्राफी विभाग, फार्मसी विभाग, स्टोर रुम व ओपीडी कक्षात नव्याने विद्युतीकरण करणे कामी महानगरपालिकाअधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

07/03/22

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - ७२७२ विभाग - विद्युत
दिनांक - ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय : - **प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने मुख्य डिस्ट्रीबुशन पॅनल बसविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

कामाचा खर्च :- रु.५,००,०००/-
४,३४,५८०/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- देशभरात कोरोना (कोविड-१९) विषाणुच्या संसर्गामुळे झपाटयाने वाढणारी रुग्णांची संख्या व मृताचे प्रमाण लक्षात येता, शासनाने करोना संसर्गिक रुग्णांचे मृत शरीर विद्युत / गॅस दाहिनीवर दहन करणेबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने वसई विरार शहर कार्यक्षेत्रात समेळपाडा स्मशानभुमी, नालासोपारा (प) येथे गॅस दाहीनी बसविण्याचे काम महापालिकामार्फत सुरु आहे. सदर गॅस दाहिनी ही विद्युत प्रवाहावर कार्यरत असलेमुळे त्यामध्ये नव्याने योग्य क्षमतेनुसार विद्युतीकरण, डिस्ट्रब्युशन व कंट्रोल पॅनल बसविणे व त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणे गरजेचे आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- **(डिस्ट्रब्युशन पॅनल)** :- जी.आय. शिट- ४५ स्क्वे.मी. आर्यन शिट मेटल वर्क- ४२५ कि.ग्रॅ., चेंज ओव्हर स्वि-१ नग, , ३ पोल एम.सी.सी.बी. २०० A-१ नग., FPMCB- ८ नग, DPMCB- १० नग, TPMCB-५ नग,SPMCB- १० नग, रोट्री हन्डल २५०A-४ नग, टर्मिनल स्प्रेडर्स २५०A -१ सेट, लॉक - २६ नग, ॲमिटर-१नग, व्होल्टमिटर-१नग, सिलेक्टर स्विच-२ नग, करंट ट्रान्सफॉर्मर-३ नग, पायलेट लॅम्प - ९नग, २पोल पॉवर कॉन्ट्रक्टर- १नग, फयुज ब्रिज-१२ नग, पोर्किलिन/ई-प्रॉक्सी-१२ नग, बस पटटी व बार ८२ कि.ग्रॅ., २x१५ स्क्वें.एम.एम. कॉपर वायर -५० मी. २x२.५ स्क्वे.एम.एम. कॉपर वायर -५० मी. २x६ स्क्वे.एम.एम. कॉपर वायर-५० मी, २x१० स्क्वे.एम.एम. कॉपर वायर -५०मी, ४x१६ स्क्वे.एम.एम. कॉपर वायर- २५ मी, ॲल्युमिनीअम लग्ज - १००० नग, न्युट्रल लिंक - २ नग, ओव्हरलोड रिले - १ नग, टाईम स्विच -१ नग.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने मुख्य डिस्ट्रीबुशन पॅनल बसविणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - २२१३ विभाग - विद्युत
दिनांक - ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत सार्वजनिक शौचालयामध्ये विद्युतीकरण करणे.**

कामाचा खर्च :- रु.५,००,०००/-
अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ३,६६,७२३/-
(सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रातील शौचालया मध्ये विद्युतीकरण करणे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- ६ इंच एक्झॉस्ट फॅन – १२० नग, ९ इंच एक्झॉस्ट फॅन- नग ७५, २ पोल एम.सी.बी-२४ नग, ४० वॅट क्लियर बल्ब-१२० नग, १०० वॅट क्लियर बल्ब-२४ नग, प्लग पॉईट-२४ नग, पॉईट वायरींग-२४ नग, होल्डर (पेन्डेन्ट/ ब्रकेट) २४ नग.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत सार्वजनिक शौचालयामध्ये विद्युतीकरण करणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
परिमंडळ - २
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - ७२७४ विभाग - विद्युत
दिनांक - ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय : - **प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील नव्याने बांधण्यात आलेल्या एन.आय.सी.यु. कक्ष, आय.सी.यु. कक्ष, शस्त्रक्रीया विभागात नव्याने विद्युतीकरण करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...**

कामाचा खर्च :- **रु.५,००,०००/-**
४,३५,९६१/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सोपारा सामान्य रुग्णालय येथे नव्याने एन.आय.सी.यु. कक्ष आय.सी.यु.कक्ष, शस्त्रक्रीया विभाग उभारण्यात आले आहे. सदर ठिकाणी विद्युतीकरण करणे आवश्यक आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- पॉईंट वायरिंग :- ७१ नग, इंडीपेंडेट प्लग:- ११ नग, स्विच सॉकेट :- १०० नग, मॉडयुलर बॉक्स :- ४६ नग, सिंगल पोल एम.सी.बी. :- २८ नग, एल.ई.डी. पॅनल लाईट :- ४२ नग, सिलींग फॅन :- ०८ नग, २x२.५ स्वेअर एम.एम. कॉपर वायर :- १८० मी., २x४ स्वेअर एम.एम. कॉपर वायर :- ११५ मी., २x१.५ स्वेअर एम.एम. कॉपर वायर :- ११५ मी., इन्सुलेशन मॅट :- १५ मी., इन्सुलेशन हॅन्ड गलोज :- ०१ नग., इन्स्ट्रक्शन चार्ट :- ०१ नग.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील नव्याने बांधण्यात आलेल्या एन.आय.सी.यु. कक्ष, आय.सी.यु. कक्ष, शस्त्रक्रीया विभागात नव्याने विद्युतीकरण करणे कामी महानगरपालिकाअधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. - ७२७५ **विभाग - विद्युत**
दिनांक - ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय : - प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने फिडर पिलर, सिटी मीटर पॅनल व केबल व्यवस्था करणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

कामाचा खर्च :- रु.५,००,०००/-
४,७४,४१७/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची व सन २०२०-२१ चे CSR नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- देशभरात कोरोना (कोविड-१९) विषाणुच्या संसर्गामुळे झपाटयाने वाढणारी रुग्णांची संख्या व मृताचे प्रमाण लक्षात घेता, शासनाने करोना संसर्गिक रुग्णांचे मृत शरीर विद्युत / गॅस दाहिनीवर दहन करणेबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात समेळपाडा स्मशानभुमी, नालासोपारा (प) येथे गॅस दाहीनी बसविण्याचे काम महापालिकामार्फत सुरु आहे. सदर गॅस दाहिनी ही विद्युत प्रवाहावर कार्यरत असलेमुळे त्यामध्ये नव्याने योग्य क्षमतेनुसार विद्युतीकरण, कंट्रोलपॅनल बसविणे व त्या अनुषंगिक विद्युतीय काम करणे गरजेचे आहे.

जागेची मालकी :- व.वि.श. महानगरपालिका

कामाचे स्वरुप :- **पार्ट-१ (फिडर पिलर पॅनल) :-** जी.आय. शिट- ११ स्क्वे.मी. आर्यन शिट मेटल वर्क- ६० कि.ग्रॅ. लॉक-४ नग, २x१० स्क्वे. एम.एम. कॉपर वायर- १५मी., पोर्किलिन/ई- प्रॉक्सी- ९ नग, बस पटटी व बार-२७ नग, रोट्री हॅन्डल २५०A-१ नग, टर्मिनल स्प्रेडर्स ४०० A- १सेट.

पार्ट-२ (सिटी मिटर) :- जी.आय. शिट- ११ स्क्वे.मी. आर्यन शिट मेटल वर्क- ५० कि.ग्रॅ., लॉक-४ नग, टर्मिनल स्प्रेर्स-१ सेट, ३ पोल एम.सी.सी.बी.-१ नग.

पार्ट- ३ (केबल व्यवस्था) :- ४x१० स्क्वे.एम.एम आर्मड केबल-२०० मी, ४x२५ स्क्वे.एम.एम. आर्मड केबल-५० मी, ट्रेन्च - ८० मी. DWC पाईप- १६० मी.

ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील समेळपाडा स्मशानभुमी येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने फिडर पिलर, सिटी मीटर पॅनल व केबल व्यवस्था करणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९ (१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

७/३/२२

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 1216

विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :-07/03/2022

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील एन.आय.सी.यु व नव्याने बांधण्यात आलेले स्टोर रुम विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,30,394/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रात सोपारा सामान्य रुग्णालय येथे नव्याने एन.आय.सी.यु व नव्याने बांधण्यात आलेले स्टोर रुम विभाग उभारले असुन सदर ठिकाणी वातानुकुलीत यंत्रणा बसविणे गरजेचे आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- वातानुकुलीत यंत्रणा- 1.5 टन - 05 नग, कॉपर पाईप:- 90 मी पी.व्ही.सी. पाईप - 100 मी, 3 x4 स्वेअर एम.एम. कॉपर वायर:- 115 मी
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:-
प्रस्तावित खर्च	:-
उपलब्ध शिल्लक	:-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. पृष्ठ क्र. अ.क्र वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील एन.आय.सी.यु व नव्याने बांधण्यात आलेले स्टोर रुम विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी येणाऱ्या रक्कम 4,34,394/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. / 217

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 07/03/2022

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील क्ष-किरण विभाग, फार्मसी व सोनाग्राफी विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 4,54,409/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विदयुत) जिल्हा दरसुची नुसार)
2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथे क्ष-किरण विभाग, फार्मसी व सोनाग्राफी विभाग उभारले असुन सदर ठिकाणी वातानुकुलीत यंत्रणा बसविणे गरजेचे आहे.
3. जागेची मालकी :- महानगरपालिका
4. कामाचे स्वरुप :- वातानुकुलीत यंत्रणा:- 1.5 टन - 05 नग, कॉपर पाईप:- 105 मी पी.व्ही.सी. पाईप :- 113 मी., 3 x4 स्वेअर एम.एमं. कॉपर वायर:- 130 मी
5. लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

मुळ तरतूद	:- 15,00,00,000/-
या पुर्वीचा खर्च	:-
प्रस्तावित खर्च	:-
उपलब्ध शिल्लक	:-

तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. पृष्ठ क्र. अ.क्र वर नोंद घेण्यात आली आहे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील सोपारा सामान्य रुग्णालय येथील क्ष-किरण विभाग, फार्मसी व सोनाग्राफी विभागात नविन वातानुकुलीत यंत्रणा बसविणे कामी येणाऱ्या रक्कम 4,54,409/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२७८ विभाग : बांधकाम
दिनांक : ०७/०३/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "आय" कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.१०९ मधील मांडलई गावातील चाफेकर हयांचे घर ते जॉन्सन घोन्सालवीस हयांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी आर्थिक व प्रशासकिय मंजूर मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २६४८९३९/-

३) प्रस्तावाचा मजकूर :-

प्रभाग समिती "आय" कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील मांडलई गावातील चाफेकर हयांचे घर ते जॉन्सन घोन्सालवीस हयांचे घरापर्यंतचा रस्ता कच्च्या स्वरुपाचा असुन सदर ठिकाणी पावसाळ्यात मोठया प्रमाणात पाणी साचुन राहते त्यामुळे नागरीकांना रस्त्यावरुन ये-जा करताना चिखलाचा मोठया प्रमाणात त्रास होतो. तरी सदर ठिकाणी खडीकरण व डांबरीकरण केल्यास नागरीकांना ये-जा करणेस सोयीचे होईल तरिही सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण होणे गरजेचे आहे.

४) कामाचे स्वरुप :- खडीकरण, बी.बी.एम., डांबरीकरणचा अंतर्भाव आहे.

परिमाण :- १) रस्त्याची लांबी - १६५ मी.
२) रस्त्याची रुंदी - ५.०० मी.
३) ग्रेड १ - लांबी १६५ मी. रुंदी - ५.०० मी. व ०.१५ मी. जाडी
४) ग्रेड २ - लांबी १६५ मी. रुंदी - ५.०० मी. व ०.१० मी. जाडी
५) बी.बी.एम. - लांबी १६५ मी. रुंदी - ५.०० मी.
६) बी.एम. - लांबी १६५ मी. रुंदी -५.०० मी. व ०.०५० मी. जाडी
७) बी.सी. - लांबी १६५ मी. रुंदी - ५.०० मी. व ०.०२५ मी. जाडी

५) यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-

६) जागेची मालकी :-

७) विकास आराखडयातील आरक्षण :- अस्तित्वातील रस्ता

८) अर्थसंकल्पीय तस्तूद :- अ) लेखाशिर्ष :- रस्ते बांधकाम.

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र.१५ अ.क्र. २६१७ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१०९ मधील मांडलई गावातील चाफेकर हयांचे घर ते जॉन्सन घोन्सालवीस हयांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी तयार करण्यात आलेल्या रु. २६४८९३९/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ७२७९

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती एफ मधील धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४१ मधील डोंगरपाडा गल्ली नं. ५ ते डोंगरपाडा मुख्य रस्त्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रशासकिय मान्यता :- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५१३ दि. २१/०१/२०२०

प्रस्तावित कामाची मुळ रक्कम :- रु. ४०,१८,३६७/-

निविदा अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २९,१६,७१०/- (पाईपची रक्कम वगळून)

तांत्रिक मान्यता :- मा. शहर अभियंता, दि. ०६/०२/२०२०

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४०,११,८४४/-

जाहिर निविदा सुचना :- १) दै. महाराष्ट्र टाईम्स २) दै. प्रहार
३) दै. वृत्तमानस ४) दै. मुंबई केसरी टाईम्स
५) दै. खबरे आजतक ६) दै. इंडियन एक्सप्रेस
७) दै. स्टॅण्डर्ड पोस्ट

ई निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि. १२/०७/२०२१

द्वितीय लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि. ०५/१०/२०२१

प्राप्त निविदांची संख्या :- ०३

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा
१.	**मे. रोहन मोहिते**	**अंदाजपत्रकीय दराने**
२.	मे. ए.जी. पाटील	५.००% जास्त दराने
३.	मे. संजय कंन्स्ट्रक्शन	३.००% जास्त दराने

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. रोहन मोहिते** यांच्या निविदेतील दर ०.००% अंदाजपत्रकीय रक्कमेचा असुन सदरचा दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी आहे. **मे. रोहन मोहिते** यांचे निविदेतील प्राप्त दरास मा. निविदा समिती सभेने दि. १६/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदा समिती सभेने मान्य केलेले दर
१.	**मे. रोहन मोहिते**	**अंदाजपत्रकीय दराने**	**१.००% कमी दराने**

तरी **मे. रोहन मोहिते** यांच्या अंदाजपत्रकीय दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी व योग्य असून **मे. रोहन मोहिते** ह्यांच्या **अंदाजपत्रकीय दराच्या रक्कमेपेक्षा १.००% कमी** दराची निविदा मंजूरीस्तव सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये संविदा करणेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- प्रभाग समिती एफ मधील धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४१ मधील डोंगरपाडा गल्ली नं. ५ ते डोंगरपाडा मुख्य रस्त्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी **मे. रोहन मोहिते** यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

१८/१/२२

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ७२२०

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : ७/४/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती एफ मधील धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४२ मधील गांगडीपाडा येथील पांडे निवास ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रशासकिय मान्यता :- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ४२४ दि. १३/१२/२०१९

प्रस्तावित कामाची मुळ रक्कम :- रु. ३३,२८,२६९/-

निविदा अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २०,२६,८३३/- (पाईपची रक्कम वगळून)

तांत्रिक मान्यता :- मा. शहर अभियंता, दि. १०/१२/२०१९

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ३३,२८,२६९/-

जाहिर निविदा सुचना :- १) दै. महाराष्ट्र टाईम्स २) दै. प्रहार
३) दै. वृत्तमानस ४) दै. मुंबई केसरी टाईम्स
५) दै. खबरे आजतक ६) दै. इंडियन एक्सप्रेस
७) दै. स्टॅण्डर्ड पोस्ट

ई निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि. १२/०७/२०२१

द्वितीय लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि. ०५/१०/२०२१

प्राप्त निविदांची संख्या :- ०३

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ. क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा
१.	**मे. रोहन मोहिते**	**अंदाजपत्रकीय दराने**
२.	मे. ए.जी. पाटील	५.००% जास्त दराने
३.	मे. संजय कंन्स्ट्रक्शन	३.००% जास्त दराने

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. रोहन मोहिते** यांच्या निविदेतील दर ०.००% अंदाजपत्रकीय रक्कमेचा असुन सदरचा दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी आहे. **मे. रोहन मोहिते** यांचे निविदेतील प्राप्त दरास मा. निविदा समिती सभेने दि. १६/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदा समिती सभेने मान्य केलेले दर
१.	**मे. रोहन मोहिते**	**अंदाजपत्रकीय दराने**	**१.००% कमी दराने**

तरी **मे. रोहन मोहिते** यांच्या अंदाजपत्रकीय दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी व योग्य असून **मे. रोहन मोहिते** ह्यांच्या **अंदाजपत्रकीय दराच्या रक्कमेपेक्षा १.००% कमी** दराची निविदा मंजूरीस्तव सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये संविदा करणेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- प्रभाग समिती एफ मधील धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४२ मधील गांगडीपाडा येथील पांडे निवास ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी **मे. रोहन मोहिते** यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

16/2

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

परिमंडळ -3 कार्यालय, दिवाणमान, जि - पालघर , पिन नं. 401202

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1221

विभाग :- बांधकाम

दिनांक : 07/03/2022

प्रस्तावाचा विषय :- वॉर्ड नं . १०१ मध्ये साधना आराधना इमारतीजवळ पाईपड्रेन करणे कामी सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुर करून संविदा करणे .

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकिय रक्कम :- रू . ४७५८९७ .00 तांत्रिक मंजुरी रक्कम रू . ४७५१८० .00

प्रशासकिय मंजुरी :- मा . उप आयुक्त परिमंडळ – ३ ह्यांच्या कडील ठराव क्र . ६१७ दिनांक ३० .०९ . २०२१ .

तांत्रिक मंजुरी :- मा . उप अभियंता यांचे कडील क्र . ०५ दि . ११ . १० . २०२१

ई निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/२०९/२१-२२/दि . २२/११/२०२१ उप आयुक्त, परिमंडळ – ३ वसई विरार शहर महानगरपालिका

ई निविदा प्रसिध्दी दिनांक :- दि . ०२ . १२ . २०२१

वर्तमान पत्राचे नांव :- दै . सामना, आमची मुंबई व आपल महानगर

ई निवीदा फॉर्म विक्री दिनांक :- दि . ०२ . १२ . २०२१ ते दि . १६ . १२ . २०२१

ई निविदा स्विकारण्याची तारीख :- दि . १७ . १२ . २०२१

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त ई निविदा :- ०५

ई निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- १७ . १२ . २०२१ सायं . ४ . ०० .

ई निविदा उघडण्याची दिनांक (दुसरा लखोटा) :- ०४ . ०२ . २०२२ प्राप्त ई निविदा निविदा समितीपुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत .

अ . क्र .	निविदाधारकाचे नांव	निविदेतील दर	शेरा
१ .	मे . आवावेल एन्टरपायझेस	१८ . ००% कमी दराने	
२ .	मे . ए . पी . एन्टराप्रायजेस	१८ . ८७% कमी दराने	
३ .	मे . महेश विजय सातपुते	२१ . ०१% कमी दराने	
४ .	मे . आर . व्ही . कंस्ट्रक्शन	१९ . १९% कमी दराने	
५ .	मे . फरहान एन्टरप्रायझेस	१८ . ८९% कमी दराने	

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे . महेश विजय सातपुते यांच्या निविदेतील २१ . ०१% कमी दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे . त्यामुळे सदर कामासाठी प्राप्त

निवीदाधारकांपैकी मे. महेश विजय सातपुते यांची २१.०१% कमी दराची निविदा मंजुरीस दि.२५.०२.२०२२ रोजी निविदा समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये मा. आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.वविशम/आस्था/ ४४/२१ दि.२८/०६/२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने मा.उप आयुक्त व मा.अति. आयुक्त यांना काम वाटप केलेले आहे. त्यामध्ये मा.उप आयुक्त, परिमंडळ रू.५.00 लक्षा खालील कामाबाबत अधिकार प्रदान केलेले आहेत. महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(अ) अन्वये सदर कामी आलेल्या निविदांपैकी मे. महेश विजय सातपुते यांची सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुरी व संविदा करणेस मा. उप आयुक्त परिमंडळ - ३ यांचे मंजुरीसाठी सविनय सादर.

ठराव :-

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. महेश विजय सातपुते यांच्या निविदेतील २१.०१% कमी दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व वाजवी आहे.त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी क्र.वविशम / आस्था / ४४ / २१ दि.२८/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उप आयुक्त (परिमंडळ - 3) यांना प्रदान केलेल्या त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच इतर नामंजुर निविदाधारकांची इसारा रक्कम परतावा करणेस व याकामी होणा-या इतर अनुषंगीग खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त (परिमंडळ - 3)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

परिमंडळ -3 कार्यालय, दिवाणमान, जि - पालघर , पिन नं. 401202

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1222

विभाग :- बांधकाम

दिनांक : 07/03/2022

प्रस्तावाचा विषय :- वॉर्ड नं.९५ मध्ये प्रिया अपा. मागे पाईपड्रेन बांधणे कामी सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुर करून संविदा करणे .

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकिय रक्कम :- रू.४९४९९८/-

प्रशासकिय मंजुरी :- मा. उप आयुक्त परिमंडळ - ३ ह्यांच्या कडील ठराव क्र.६१६ दिनांक ३०.०९.२०२१

तांत्रिक मंजुरी :- मा.उप अभियंता यांचे कडील क्र.०४ दि.११.१०.२०२१

ई निविदा प्रसिध्दी :- बविशम/बांध/२०९/२१-२२/दि.२२/११/२०२१ उप आयुक्त, परिमंडळ - ३ वसई विरार शहर महानगरपालिका

ई निविदा प्रसिध्दी दिनांक :- दि. ०२.१२.२०२१

वर्तमान पत्राचे नांव :- दै. सामना, आमची मुंबई व आपल महानगर

ई निवीदा फॉर्म विक्री दिनांक :- दि.०२.१२.२०२१ ते दि.१६.१२.२०२१

ई निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. १७.१२.२०२१

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त ई निविदा :- ०५

ई निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- १७.१२.२०२१ सायं.४.००

ई निविदा उघडण्याची दिनांक (दुसरा लखोटा) :- ०४.०२.२०२२ प्राप्त ई निविदा निविदा समितीपुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नांव	निविदेतील दर	शेरा
१.	मे. आर.व्ही.धोत्रे कंस्ट्रक्शन	१९.१९% कमी दराने	
२.	मे. महेश विजय सातपुते	२१.०१% कमी दराने	
३.	मे.निकसन	२१.७९% कमी दराने	
४.	मे.सिध्देश्वर कंस्ट्रक्शन कं	१९.३०% कमी दराने	
५.	मे.बालाजी एन्टरप्रायझेस	२०.००% कमी दराने	

ठराव :-

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. निकसन यांच्या निविदेतील २१.७९% कमी दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे सदर कामासाठी प्राप्त निवीदाधारकांपैकी मे. निकसन यांची २१.७९% कमी दराची निविदा मंजुरीस दि.२५.०२.२०२२ रोजी निविदा समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये मा. आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.वविशम/आस्था/ ४४/२१ दि.२८/०६/२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने मा.उप आयुक्त व मा.अति. आयुक्त यांना काम वाटप केलेले आहे. त्यामध्ये मा.उप आयुक्त, परिमंडळ रू.५.00 लक्षा खालील कामाबाबत अधिकार प्रदान केलेले आहेत. महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(अ) अन्वये सदर कामी आलेल्या निविदांपैकी मे. निकसन यांची सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुरी व संविदा करणेस मा. उप आयुक्त परिमंडळ – ३ यांचे मंजुरीसाठी सविनय सादर.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. निकसन यांच्या निविदेतील २१.७९% कमी दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व वाजवी आहे.त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी क्र.वविशम / आस्था / ४४ / २१ दि.२८/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उप आयुक्त (परिमंडळ - 3) यांना प्रदान केलेल्या त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच इतर नामंजुर निविदाधारकांची इसारा रक्कम परतावा करणेस व याकामी होणा-या इतर अनुषंगीग खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त (परिमंडळ - 3)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२२३ विभाग :- बांधकाम

दिनांक : ७/३/२०२३

प्रस्तावाचा विषय:- :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच' मधील दिवाणमान येथील जयश्री अपार्टमेंट ते साई कृपा सर्व्हिस सेंटर पर्यत गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मधील दिवाणमान नवयुगनगर येथे वॉर्ड नं. ९६ मध्ये जयश्री अपार्टमेंट ते साईकृपा सर्व्हिस सेंटर पर्यत सांडपाणी व पावसाळी पाणी जाण्यासाठी तत्कालीन नगरपरिषदेच्या काळात गटार बांधलेले आहे. सद्यस्थितीत सदरचे गटार जुने झाल्यामुळे मोडकळीस आले आहे. तसेच सदरचे गटार रुंदीला कमी असल्यामुळे पावसाळ्यात नवयुगनगर, दिवाणमान परिसरामध्ये पाणी साचुन आजुबाजुच्या इमारतीमध्ये पाणी जाऊन नुकसान होत असते. त्यामुळे गटाराची रुंदी वाढवून नव्याने आर.सी.सी स्वरुपात गटार बांधावयाचे आहे.

सदर कामाची जागेवर प्रत्यक्ष पाहणी केली असता गटाराची रुंदी वाढविणे आवश्यक आहे. गटाराची लांबी २८९.०० मी. आहे व रुंदी २.०० मी. प्रस्तावित करण्यात आली आहे. कामाचे सन २०१९-२० चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दरसुचीनुसार रु. ६६,१६,१२८/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमूद दिवाणमान येथील जयश्री अपार्टमेंट ते साई कृपा सर्व्हिस सेंटर पर्यत गटार बांधणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :-वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच' मधील दिवाणमान येथील जयश्री अपार्टमेंट ते साई कृपा सर्व्हिस सेंटर पर्यत गटार बांधणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या रु. ६६,१६,१२८/- अंदाजपत्रकानूसार काम करुन घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामास तांत्रिक मंजूरी घेवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी.त्या अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

अनिलकुमार पवार
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९२२४

विभाग :- बांधकाम
दिनांक : ७/३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच' मधील वसई मुख्य रस्त्यावरील महांबरे सिलेक्शन ते पार्वती क्रॉस पर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मध्ये वसई रोड रेल्वे स्टेशन ते भाबोळा नाका हा मुख्य रस्ता आहे. सदर रस्ता जास्त रहदारीचा आहे. तत्कालीन नगरपारिषद काळात पुर्ण रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. सद्यस्थितीत पॅचवर्क करुन रस्त्याची डागडुजी केलेली आहे.

मागील ३ ते ४ वर्षापासुन पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास रस्त्यावर २ ते ३ फुट पाणी जमा होते. त्यामुळे रस्त्यावर मोठया प्रमाणात खड्डे तयार होतात, त्यामुळे नागरिकांचे मोठया प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे रस्ता कॉक्रीटीकरण केल्यास सुस्थितीत राहील.

सदर कामाची जागेवर प्रत्यक्ष पहाणी करुन मे.जवादे ॲन्ड असोसिएट्स, तांत्रिक सल्लागार यांनी महांबरे सिलेक्शन ते पार्वती क्रॉस पर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेबाबतचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. अंदाजपत्रकात फुटपाथ, शोल्डर पेव्हरब्लॉक, कॉक्रीट रस्ता, डीव्हायडर प्रस्तावित करण्यात आलेले आहे. रस्त्याची लांबी २००.०० मी. व रुंदी २०.०० मी. आहे. कामाचे सन २०२१-२२ चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दरसुचीनुसार रु.१,५५,६८,१५०/- इतक्या रक्कमेचेअंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमूद वसई मुख्य रस्त्यावरील महांबरे सिलेक्शन ते पार्वती क्रॉस पर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच' मधील वसई मुख्य रस्त्यावरील महांबरे सिलेक्शन ते पार्वती क्रॉस पर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या रु. १,५५,६८,१५०/-अंदाजपत्रकानूसार काम करुन घेण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामास तांत्रिक मंजूरी घेवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी.त्या अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

7/3
अनिलकुमार पवार
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. 401 305
दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1225 विभाग :- बांधकाम

दिनांक : 09/03/2022

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं.98 मध्ये दिवाणमान येथील बाल भवन व ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रात रंगकाम व विविध दुरूस्ती करणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये दिवाणमान येथे बाल भवन व ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र इमारत आहे. सदर इमारती मध्ये टाईल्स, दरवाजे, खिडक्या खराब झालेल्या आहेत. तसेच इमारतीच्या आत व बाहेरील रंग उडालेला आहे. त्यामुळे येथील ज्येष्ठ नागरीक सदर काम करण्याची मागणी करीत आहेत. त्यामुळे बाल भवन व ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रात रंगकाम व विविध दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

सदर जागी प्रत्यक्ष पहाणी करुन सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं.98 मध्ये दिवाणमान येथील बाल भवन व ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रात रंगकाम व विविध दुरूस्ती करणे कामी रक्कम रु. 16,00,912/- याकरीता वरील ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन 2021-22 चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमूद ठिकाणी वॉर्ड नं.98 मध्ये दिवाणमान येथील बाल भवन व ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रात रंगकाम व विविध दुरूस्ती करण्यासाठी आवश्यक बांधकाम करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने सदर कामी होणाऱ्या रक्कम रु. 16,00,912/- चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं.98 मध्ये दिवाणमान येथील बाल भवन व ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रात रंगकाम व विविध दुरूस्ती करणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. 16,00,912/-पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामास तांत्रिक मंजूरी घेवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी. सदर कामी होणा-या अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

8/3

(श्री. अनिल कुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ९२२६

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : ०८/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे सर्वेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणूक करुन ई-निविदा मागविणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेने सन २०२१-२२ ह्या अर्थसंकल्पात जमिनीचे सव्हेक्षण करणे, नकाशे, आराखडे तयार करणेसाठी अ) प्लेन टेबल सर्व्हे ब) कंटूर सर्व्हे क) रुठ सर्व्हे ड) डी.पी. रोड/ आरक्षण डिमार्केशन व नाले डिमार्केशन वैगेरे कामासाठी तरतूद केलेली आहे.

सदर कामांचे नकाशे व आराखडे तयार करणे त्यानूसार अंदाजपत्रके तयार करणे व खालील कामांसाठी सर्वेअर नेमणूक करणे गरजेचे आहे. त्यानूसार वसई विरार शहर महानगरपालिकेस पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) ह्या वित्तीय वर्षासाठी विविध क्षेत्रातील जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्व्हेअरची नेमणूक करणे आवश्यक आहे.

सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षासाठी जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी रक्कम रु.३००.०० लक्ष प्रती वर्ष अपेक्षित आहे.

सदर कामाचा खर्च "बांधकाम विभाग सर्वेक्षण खर्च" या लेखाशिर्षातंर्गत भागविण्यात येणार आहे.

यास्तव सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात प्रतिवर्षी अर्थसंकल्पात सदर कामाकरीता सदरच्या लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद करण्याची तजवीज ठेवण्यात येईल.

सदर कामी वेळोवेळी तरतूदमध्ये वाढ करुन पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे आवश्यक आहेत.

तरी पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) या वित्तीय वर्षासाठी जमिनीचे सर्व्हेक्षण करणेकामी होणाऱ्या खालीलप्रमाणे खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची आर्थिक व प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अपेक्षित खर्च (३ वर्षासाठी)
१.	वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील जमिनीचे सर्व्हेक्षण करणे. अ) प्लेन टेबल सर्व्हे ब) कंटूर सर्व्हे क) रुठ सर्व्हे ड) डी.पी. रोड/ आरक्षण डिमार्केशन ई) नाले डिमार्केशन वैगेरे.	रु. ९.०० कोटी

महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये सदर होणाऱ्या अपेक्षित खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदयांना आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या निर्णयार्थ सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे सर्वेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणूक करणेकामी एकूण रक्कम रु. ९.०० कोटी इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत असून ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील ३ वर्षाकरीता बी-२ निविदा दर मागविणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

8/3

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ३२२७ विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : ०८/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभुम्या व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेचेंस, बेंचेस पट्ट्या व संबंधित इतर आवश्यक साहित्य बसविणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील स्मशानभूम्या, विविध उद्याने, इतर ठिकाणी बसणेकरीता बेंचेस व बेंचेससाठी लागणाऱ्या लाकडी व लोखंडी फायबर पट्ट्यांची आवश्यकता असते. याबाबत विविध विभागातील माजी नगरसेवक, सदस्य, समाजसेवक व स्थानिक नागरीकांची मागणी मुख्य कार्यालयाकडे प्राप्त होतात.

तरी सदर कामी बेंचेस, बेंचेस पट्ट्या व संबंधित इतर आवश्यक साहित्य पुरविणे व बसविणे आवश्यक आहे. सदर निविदांची मुदत दि. ३१/०३/२०२२ रोजी संपुष्टात येणार असुन पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) ह्या वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा मागविणे आवश्यक आहेत.

सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभुम्या व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेचेंस, बेंचेस पट्ट्या व संबंधित इतर आवश्यक साहित्य पुरविणेकामी रक्कम रु. ३.०० कोटी प्रती वर्ष खर्च अपेक्षित आहे.

सदर कामाचा खर्च "विकास निधी अंतर्गत उद्यान विकास" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहेत.

यास्तव सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात प्रतिवर्षी अर्थसंकल्पात सदर कामाकरीता सदरच्या लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद करण्याची तजवीज ठेवण्यात येईल.

सदर कामी वेळोवेळी तरतूदमध्ये वाढ करुन पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे आवश्यक आहेत.

तरी पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) या वर्षाकरीता स्मशानभूम्या, विविध उद्याने, इतर ठिकाणी बसणेकरीता बेंचेस व बेंचेससाठी लागणाऱ्या लाकडी व लोखंडी फायबर पट्ट्या खरेदी करणेकामी रक्कम रु. ९.०० कोटी (३ वर्षाकरीता) होणाऱ्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची आर्थिक व प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये सदर होणाऱ्या अपेक्षित खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदयांना आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या निर्णयार्थ सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभुम्या व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेर्चेस, बेंचेस पट्ट्या व संबंधित इतर आवश्यक साहित्य बसविणेकामी एकूण रक्कम रु. ९.०० कोटी इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत असून ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील ३ वर्षाकरीता बी-२ निविदा दर मागविणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ९२२८

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : ०८/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती वैगेरे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे कामी मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन अनेक ठिकाणी तुटलेले नादुरुस्त अवस्थेत आहेत. स्वच्छ अभियान अंतर्गत सदर फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती नुतनीकरण करण्याबाबत मा. आयुक्त यांनी सुचना दिलेल्या असून सदर कामी ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती करणेकामी सुमारे रक्कम रु. ५००.०० लक्ष प्रती वर्षी एवढा खर्च अपेक्षित आहे.

सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरीता सदर कामावर रक्कम रु. १५००.०० लक्ष एवढा खर्च खर्चाची तरतूद "फुटपाथ व्यवस्था" या लेखाशिर्षात प्रस्तावित करण्यात येणार आहे.

सदर कामाचा खर्च "फुटपाथ व्यवस्था" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहेत.

वास्तव सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात प्रतिवर्षी अर्थसंकल्पात सदर कामाकरीता सदरच्या लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद करण्याची तजवीज ठेवण्यात येईल.

तरी पुढील तीन (सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५) या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती करणेकामी होणाऱ्या एकूण रक्कम रु. १५.०० कोटी इतक्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची आर्थिक व प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये सदर होणाऱ्या अपेक्षित खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदयांना आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या निर्णयार्थ सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती वैगेरे कामी एकूण रक्कम रु. १५.०० कोटी इतक्या होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत असून ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील ३ वर्षाकरीता बी-२ निविदा दर मागविणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

8/3

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . १२२९ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०८/०३/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील प्रभाग क्र.०८ मध्ये विरार (पू)राक्षसीपाडा येथे विजय मराठे हयांच्या घरापासून ते राम मिलन निशाद यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेकामास प्रशासकीय व वित्तीया मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा निर्णय :- वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक वसई विरार शहर महानगरपालिका यांचे दालनात सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, भांखस २०२१/प्र.क्र.८२/ उद्योग - ४, दि.०७ मे २०२१ च्या परिच्छेद क्र.३.२.३ मध्ये शासन निर्णय क्र. मातंसं ०५४/३१/२०१६/३९ दि. ११ /०५/ २०२१ अन्वये सुधारणा करून दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रू.३ लाखावरून (रू.३,00,000/-) रू. १० लाखापर्यंत (रू.१०,00,000/-) सर्व कर अंतर्भूत करून वाढविण्यात आलेली आहे. यानुसार सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयांसाठी लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी जाहीर दरपत्रक सूचना प्रसिध्द करून दरपत्रक मागवून जास्त सवलत देणा-या मंजूर दरपत्रकधारकाकडून खरेदी करणेकामी प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

25.03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व)
ता.वसई जि.पालघर

प्रशासकीय ठराव क्र. १३०८

विभाग :- सार्वजनिक वाचनालय

दिनांक :- ७५/०३/ २०२२

विषय :- सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयांसाठी लागणारी दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी दरपत्रक मागवीणे तसेच त्याकमी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मालकीची चार सार्वजनिक वाचनालय असुन सदर वाचनालयात दररोज मोठ्या संखेने वाचक व विद्यार्थी वर्ग दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक इ. वाचनसाहित्य लाभ घेत असतात. तसेच महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी वर्ग यांना वर्तमानपत्र वाचनासाठी आवश्यक असतात. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी वार्षिक अंदाजपत्रकात १३.७५ लक्ष इतकी तरतूद करण्यांत आलेली असून रक्कम रू. १० लक्ष इतक्या खर्चास मंजूरी घेण्यात येऊन दरपत्रक मागवून खरेदी करण्यात आलेली होती.सदर दरपत्रकाची मुदत मार्च २०२२ मध्ये संपत असून माहे एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या वर्षाकरिता नव्याने दरपत्रक मागवून खरेदी करणे आवश्यक आहे.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात लागणारी दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदीकामी महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात (५२१-२२४१-१) वृत्तपत्रे,मासिके व नियतकालिके यासाठी चार वाचनालयांसाठी एकत्रित मिळून रक्कम रू.१० लक्ष इतकी तरतूद करण्यांत आली आहे.

सदर दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणेकामी महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर जाहीर दरपत्रक सुचना प्रसिध्द व महापालिकेच्या संकेस्थळावर प्रसिध्दी देवून सन २०२२-२३ वर्षाकरीता वार्षिक दरपत्रक मागवून मंजूर दरपत्रकधारकाकडून वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी केल्यास खरेदीच्या एकूण रक्कमेवर महापालिकेस सवलत मिळू शकणार आहे. सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात पडणार असून वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयाकरीता लागणारी वर्त मानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक दरपत्रक मागवून खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रू.१० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक (वसई विरार शहर महानगरपालिका) यांचेकडे सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक वसई विरार शहर महानगरपालिका यांचे दालनात सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, भांखस २०२१/प्र.क्र.८२/ उद्योग - ४, दि.०७ मे २०२१ च्या परिच्छेद क्र.३.२.३ मध्ये शासन निर्णय क्र. मातंसं ०५४/३१/२०१६/३९ दि. ११ /०५/ २०२१ अन्वये सुधारणा करून दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणा-या खरेदीची आर्थिक मर्यादा रू.३ लाखावरून (रू.३,००,०००/-) रू. १० लाखापर्यंत (रू.१०,००,०००/-) सर्व कर अंतर्भूत करून वाढविण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालया करिता लागणारी दैनंदिन वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके व दिवाळी अंक खरेदी करणे कामी जाहीर दरपत्रक सूचना प्रसिध्द करून दरपत्रक मागून जास्त सवलत देणा-या मंजूर दरपत्रकधारकास खरेदी करणे कामी प्रशासकीय मंजुरी देत आहे.

७/०३

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३०९ विभाग : बांधकाम

दिनांक :७५/३/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" मधील वॉर्ड क्र. ११३ मधील नादब्रम्हा अपा. समोरील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेस तारेचे कुंपण बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु. १,८६,८१५/-

३) प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११३ मधील नादब्रम्हा अपा. समोर महानगरपालिकेची मोकळी जागा असुन सदर जागेलगत आदिवासी बांधवांची मोठी वस्ती आहे. तेथील नागरीकांनी मोकळ्या जागेत अतिक्रमण करण्याचे काम सुरु केले आहे. नादब्रम्हा अपा. समोर महानगरपालिकेची मोकळी जागा असुन सदर जागेत अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदर जागेत तारेचे कुंपण घालणे अत्यंत तातडीचे आहे.

तरी सदरचे काम होणे गरजेचे असल्याने सदर कामी रक्कम रु. १,८६,८१५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- तारेचे कुंपण व गेट

परिमाण :- तारेचे कुंपण : लांबी ६०.०० मी.

गेट : साईज १.८०X१.५० मी.

५) यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- व.वि.श.म

७) विकास आराखडयातील आरक्षण :-

८) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. ०९ अ.क्र. ८२ वर नोंद

मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२१ दि. २८/०६/२०२१ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४९ व ६८(१), ६९(१) व (२) नुसार मा. उपायुक्त परिमंडळ-३ हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११३ मधील नादब्रम्हा अपा. समोरील महानगरपालिकेच्या मोकळ्या आगेस तारेचे कुंपण बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,८६,८१५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

उपायुक्त परिमंडळ - ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी – २०२०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७३१०

विभाग : आस्थापना
दिनांक :१६/१०/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्यक्त नगररचना विभागातील उप संचालक यांनी नियमबाह्य TDR वितरीत केलेबाबत मुद्दयांची चौकशी समिती गठीत करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- सन २०२२ चे पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये सन २०१९ मध्ये अल्पावधीत नियमबाह्य TDR वितरीत करून महापालिकेचे आर्थिक नुकसान केलेबाबत विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३८३६४ उपस्थित करण्यात आला होता. त्यानुसार पत्र क्र. वविशम/अति.आ/साप्रवि/०२/२२, दि.२३/०२/२०२२ अन्वये मा. शासनास वसई-विरार शहर महानगरपालिकेचा अहवाल सादर करण्यात आला होता. मा. नगरविकास विभागाकडील पत्र क्र. वविम-१९२२/प्र.क्र.२७/नवि-२३, दि.०२/०३/२०२२ अन्वये सदर प्रकरणांची चौकशी करून ८ आठवड्याच्या मुदतीत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणांची चौकशी करून अहवाल सादर करणेकामी खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदनाम	समितीमधील पदनाम
१	श्री. अजिक्य बगाडे	अतिरिक्त आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका	अध्यक्ष
२	श्री. मनोहर भार्गव	निवृत्त सहा. संचालक, नगररचना विभाग	सह अध्यक्ष
३	श्री. सुरेश बनसोडे	मुख्य लेखापरिक्षक, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य
४	श्री. किशोर गवस	उप-आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य
५	श्री. पंकज पाटील	उप-आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य सचिव
६	श्री. प्रदिप पाचंगे	उप अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य सचिव सहाय्यक

उपरोक्त गठीत समितीने सदर प्रकरणाच्या अनुषंगाने वेळोवेळी बैठका आयोजित करून संदर्भीय प्रकरणातील कागदपत्रांची पडताळणी/छाननी करावी व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल ५ आठवड्यांच्या कालावधीत मा. आयुक्त यांना सादर

करावयाचा आहे. सदस्य सचिव अथवा सहा. सदस्य सचिव यांनी श्री. मनोहर भार्गव, निवृत्त सहसंचालक, नगररचना विभाग यांचेशी व्यक्तीशः समन्वय साधून वेळोवेळी बैठका आयोजित कराव्यात. तसेच प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त अद्ययावत ठेवावे. महानगरपालिकेत कार्यरत उप संचालक, नगररचना विभाग व नगररचना विभागाचे सर्व संबंधीत अभियंते/तांत्रिक कर्मचारी यांनी चौकशी समितीसमोर उपस्थित राहून आवश्यक त्या तांत्रिक बाबींची कागदपत्रे, संचिका वेळेत उपलब्ध करुन देणे अनिवार्य असेल. मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१६/०९/२०१३ व मा. शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१४/प्र.क्र.५५/११-अ, दि.१६/०२/२०१५ चे अधीन राहून श्री. मनोहर भार्गव, निवृत्त सहसंचालक, नगररचना विभाग यांना सदर समितीकरिता नियमानुसार अनुज्ञेय असणारे मानधन देणे उचित राहील. तसे त्यांना प्रवासभत्ता व संदर्भीय विषयानुसार प्रवास करणेकरिता ठेक्यावरील वाहन देणे उचित राहील. असा प्रस्ताव सादर केलेला आहे.

निर्णय :- उपरोक्त प्रस्तावानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील उप संचालक यांनी नियमबाह्य TDR वितरीत केलेबाबत मुद्दयांची चौकशी करुन शासनास ८ आठवड्यांच्या मुदतीत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने शासनाकडील श्री. मनोहर भार्गव, सेवानिवृत्त सहा.संचालक नगररचना विभाग यांची चौकशी समितीमध्ये सह अध्यक्ष म्हणून नेमणूक करणेस मान्यता देण्यात येत आहे. चौकशी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदनाम	समितीमधील पदनाम
१	श्री. अजिक्य बगाडे	अतिरिक्त आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका	अध्यक्ष
२	श्री. मनोहर भार्गव	निवृत्त सहा. संचालक, नगररचना विभाग	सह अध्यक्ष
३	श्री. सुरेश बनसोडे	मुख्य लेखापरिक्षक, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य
४	श्री. किशोर गवस	उप-आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य
५	श्री. पंकज पाटील	उप-आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य सचिव
६	श्री. प्रदिप पाचंगे	उप अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका	सदस्य सचिव सहाय्यक

महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि.१३/१२/२०१९ अन्वये महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७(२) व सेवाविषयक बाबींना समर्थ करणारी अधिनियमातील इतर सर्व संबंधीत कलमान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील

सर्व स्थायी अधिकारी कर्मचारी यांना ठरावात नमूद भाग-एक व भाग-दोन मधील सेवाविषयक नियम/बाबी लागू राहतील.

तरी ठरावातील भाग-दोन (१४) व (१५) नुसार शासनाचे यासंबंधीत सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१६/०२/२०१५, दि.१७/१२/२०१६ व दि.२१/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सुचनांनुसार मानधन, वाहनभत्ता इत्यादी संबंधीत सेवानिवृत्त अधिकाऱ्यास देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शासन निर्णयामध्ये वेळोवेळी काही बदल झाल्यास ते बदल देखील लागू राहतील.

16/03

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

प/२३५

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व)
ता.वसई जि.पालघर

प्रशासकीय ठराव क्र. ७३७७ — विभाग :- सार्वजनिक वाचनालय
दिनांक :- २६/०३/२०२२

विषय :- सार्वजनिक वाचनालय, विरार नियमितपणे लाभ घेत नसलेले सभासदांची अनामत रक्कम जप्त करून सभासदत्व रद्द करणे किंवा अनामत रक्कम मनपा फंडात जमा ठेवून त्यांचे सभासदत्व रद्द करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै २००९ रोजी झाली असुन महानगरपालिकेच्या मालकीची एकूण ४ वाचनालये (ग्रंथालये) असून त्यापैकी प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथे सार्व जनिक वाचनालय आहे. सदर वाचनालयाची स्थापना १९५१ मध्ये झालेली आहे. सन १९५१ पासून ते आजमितीस एकूण सभास त्यानुसार सभासद महिती खालील प्रमाणे.

सन १९५१ पासून ते आजमितीस एकूण सभासद -	२५६१
त्यापैकी आजपर्यंत आजीवन सभासद -	११ (प्रपत्र - १)
सभासदत्व कायमस्वरूपी रद्द केलेले सभासद -	९२ (प्रपत्र - २)
वाचनालयाचा लाभ घेणारे सभासद -	४३६ (प्रपत्र - ३)
वाचनालयाचा लाभ न घेणारे एकूण सभासद -	२०२२ त्यापैकी
वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासद - (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.)	४३५ (प्रपत्र - ५)
वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासद - (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.)	१५८५ (प्रपत्र - ४)
वाचनालयात मागणी रजिस्टरमध्ये सभासद क्रमांक रिक्त असलेले सभासद - (अनामत नाही)	२ (प्रपत्र - ४)
बालवाचक आजमितीस एकूण सभासद -	२८२
सभासदत्व कायमस्वरूपी रद्द केलेले सभासद -	३ (प्रपत्र - 'अ')
वाचनालयाचा लाभ घेणारे सभासद -	१० (प्रपत्र - 'ब')
वाचनालयाचा लाभ न घेणारे एकूण सभासद - (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.)	२६७ (प्रपत्र - 'क')
वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासद - (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.)	२ (प्रपत्र - 'ड')

त्यापैकी - प्रौढ वाचक - १५८५ + बालवाचक २६७ = १८५२

२ सभासदांची प्रत्येकी रू.५/- याप्रमाणे अनामत रक्कम रू.	१०/-
२१ सभासदांची प्रत्येकी रू.५०/- याप्रमाणे अनामत रक्कम रू.	१०५०/-
१५५२ सभासदांची प्रत्येकी रू.१००/- याप्रमाणे अनामत रक्कम रू.	१५५२००/-
१० सभासदांची प्रत्येकी रू.४००/- याप्रमाणे अनामत रक्कम रू.	४०००/-
२६७ बालवाचक प्रत्येकी रू.१५/- याप्रमाणे अनामत रक्कम रू.	४००५/-
१८५२	१,६४,२६५/-

वाचनालयाचा लाभ न घेणारे (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.) १५८५ प्रौढ वाचक (प्रपत्र - ४) व २६७ बालवाचक (प्रपत्र - 'क') याप्रमाणे १,६४,२६५/-अनामत जमा आहे.

सन २०१९ या कालावधी पर्यत वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासद (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही.) संख्या ४३५ प्रौढ वाचक (प्रपत्र - ५) व २ बालवाचक (प्रपत्र - 'ड') असून त्यांची अनामत रक्कम रू.४४,२८०/- इतकी अनामत रक्कम मनपा फंडात जमा आहे. यासर्व सभासदांनी वाचनालयास परत न केलेल्या पुस्तकांची एकुण रक्कम ८८,९१३/- (पुस्तक संख्या - ४३५) इतकी आहे. अनामत रक्कमेपेक्षा पुस्तकांची रक्कम ४४,४४३/- रूपयांनी जास्त आहे परंतु (प्रपत्र - ४) व (प्रपत्र - 'क') मधील नमूद १८५२ वाचकांची अनामत १,६४,२६५/- इतकी मनपा फंडात जमा आहे. (प्रपत्र - ४) व (प्रपत्र - 'क') मधील जमा असलेल्या अनामत रक्कमेतून (प्रपत्र - ५) व (प्रपत्र - 'ड') मधील रक्कमेची तूट भरून काढता येईल. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होणार नाही. (प्रपत्र - ४) व (प्रपत्र - 'क') मधील १,६४,२६५/- या जमा अनामत रक्कमेतून (प्रपत्र - ५) व (प्रपत्र - 'ड') मधील पुस्तकांची उर्वरित रक्कम ४४,४४३/- वजा केल्यास (तूट भरून काढल्यास) १,१९,८२२/- रूपये इतकी रक्कम शिल्लक राहणार आहे.
सबब उक्त नमूद प्रपत्र - ४ व प्रपत्र - 'क' मधील नमूद सभासदांची अनामत रू. १,१९,८२२/- रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम १९० (३) अन्वये अनामत व्यपगत करून मनपा फंडात जमा संकीर्ण - इतर बाबी व्यपगत ठेवी सन २०२१ - २२ च्या लेखा संकेतांक ०४३- ३६२१-३६२० मध्ये जमा करून मनपा फंडात तशीच जमा ठेवून सभासदांजवळ असलेली पुस्तके व त्यांचे सभासदत्व कायमचे रद्द करावे याबाबतच्या निर्णयार्थ सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वरिल विषयावर मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेशी त्यांच्या दालनात सविस्तर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक वाचनालय, विरार वाचनालयात आजमितीस एकूण एकूण सभासद २८४३ इतके असून त्यापैकी पुस्तके परत केलेली परंतु अनामत रक्कम परत न घेतलेले वाचनालयाचा नियमित लाभ न घेणारे सभासद १८५४ असून त्यापैकी २ सभासद क्रमांक रिक्त आहेत.त्यामुळे उर्वरित १८५२ सभासदांची अनामत रक्कम रू. १,६४,२६५/- इतकी आहे. तसेच पुस्तके परत न केलेली आणि अनामत रक्कम परत न घेतलेले वाचनालयाचा नियमित लाभ न घेणारे सभासद ४३७ सभासदांची अनामत रक्कम रू.रू.४४,२८०/- इतकी आहे. परत न केलेल्या पुस्तकांची किंमत रू.८८,७२३/- इतकी होत आहे. एकूण २२८९ सभासदांची एकूण अनामत रक्कम रू.२,०८,५४५/- इतक्या रक्कमेतून पुस्तकांची किंमत रू.८८,७२३/- मनपाचे येणे समायोजित करून उर्वरित रक्कम रूपये १,१९,८२२/- महानगरपालिका फंडात जमा करून सदर सभासदांजवळ असलेली पुस्तके व त्यांचे सभासदत्व कायमस्वरूपी रद्द करण्यास तसेच भविष्यात सार्वजनिक वाचनालयात येणा-या कोणत्याही वाचकाने ३ वर्षापेक्षा अधिक कालावधित वाचनालयाचा लाभ न घेतल्यास अशा वाचकांचे सभासदत्व रद्द करून त्याने भरलेली अनामत जप्त करून मनपा फंडात जमा करणेकामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी देण्यात येत आहे.

16/03
(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहरमहानगरपालिका
प्रभाग समिती "डी", आचोळे, नालासोपारा (पू)
ग्रंथालय विभाग

प्रशासकीय ठराव क्र. ७३७२

विभाग- सार्व. वाचनालय
दिनांक :-२६/०३/२०२२

विषय - सार्वजनिक वाचनालय नालासोपारा आचोळ येथील सार्वजनिक वाचनालयाचा नियमित पणे लाभ घेत नसलेल्या सभासदाची अनामत रक्कम जप्त करुन सभासदत्व रद्द करणे किंवा अनामत रक्कम मनपा फंडात तशीच जमा ठेऊन त्यांचे सभासदत्व रद्द करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन ३ जुलै २००९ रोजी झाली असुन महानगरपालिका मालकीचे एकुण ४ ग्रंथालय (वाचनालय) असुन त्या पैकी प्रभाग समिती (डी), नालासोपारा मजेठीया पार्क, खुला रंगमंच येथील सार्वजनिक वाचनालय असुन त्याची स्थापना सन २००९ मध्ये झालेली आहे. त्यानुसार सदर सभासदांची माहिती खालील प्रमाणे.

सन २००९ पासुन ते आजमितीस एकुण सभासद	३०६	
सन २०१२ पासुन आजपर्यंत आजीवन सभासद	४	(प्र प्रत्र-१)
कायमस्वरुपी रद्द केलेले सभासद	८	(प्र प्रत्र-२)
वाचनालयाचा लाभ घेणारे सभासद	४०	(प्र प्रत्र-३)
वाचनालयाचा लाभ न घेणारे एकुण सभासद	**२५४**	**(त्यापैकी)**
वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासद (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही)	१६	(प्र प्रत्र-४)
वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासद (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही)	२३८	(प्र प्रत्र-५)
वाचनालयातील बालवाचक (पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही)	५	(प्र प्रत्र-५)
वाचनालयातील मागणी रजिस्टरमध्ये सभासद क्रंमाक रिक्त असलेले सभासद (अनामत नाही)	१	(प्र प्रत्र-५)

त्यापैकी - प्रौढ वाचक -२३२ + बालवाचक - ५ = २३७

२३२ सभासदाची प्रत्येकी रु.३००/- या प्रमाणे अनामत रक्कम	**रु.६९६००/-**
५ बालवाचक प्रत्येकी रु.५०/- या प्रमाणे अनामत रक्कम	**रु.२५०/-**
	६९,८५०/-

सन २००९ ते २०१८ या कालावधीत वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासदांची (पुस्तक जमा न केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही) संख्या १६ (प्र प्रत्र-४) मध्ये असून (रु.३००/- प्रमाणे सभासद १४, रु. ४००/- प्रमाणे सभासद २) त्यांची अनामत रक्कम रु. ५०००/- जमा असुन त्यांनी परत न केलेल्या पुस्तकांची किंमत

रु.४०६०/- होत असल्याने उर्वरीत अनामत रक्कम रु. ९४०/- जप्त करुन सभासदाजवळ असलेले पुस्तके व त्यांचे सभासदत्व कायमस्वरुपी रद्द करण्याची कार्यवाही अपेक्षित आहे.

वाचनालयाचा लाभ न घेणारे सभासदांची **(पुस्तक जमा केलेले परंतु अनामत रक्कम परत घेतली नाही) संख्या** २३२ प्रौढ वाचक (प्रपत्र-५) मध्ये व ५ बालवाचक (प्रपत्र-५+) मध्ये नमुद असुन त्यांची अनामत रक्कम रु. ६९,८५० /- आजतागयात मनपा फंडात जमा आहे.

सबब उक्त नमूद प्रपत्र -५ मधील अनामत रक्कम रु.९४० व प्रपत्र-४ मधील रु.६९,८५०/- एकूण अनामत रु. ७०,७९० /- रक्कम **महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंकेत १९७१ मधील नियम १९०(३) अन्वये अनामत व्यपगत करुन मनपा फंडात जमा संकीर्ण -इतर बाबी -व्यपगत ठेवी** सन २०२१-२२ च्या लेखासंकेतांक ०४३-३६२१-३६२० मध्ये जमा करुन मनपा फंडात तशीच जमा ठेवून त्यांचे फक्त सभासदत्व कायमचे रद्द करावे याबाबतच्या निर्णयार्थ सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वरिल विषयावर मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेशी त्यांच्या दालनात सविस्तर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक वाचनालय, विरार वाचनालयात आजमितीस एकूण एकूण सभासद ३०६ इतके असून त्यापैकी पुस्तके परत केलेली परंतु अनामत रक्कम परत न घेतलेले वाचनालयाचा नियमित लाभ न घेणारे सभासद २३८ असून त्यापैकी १ सभासद क्रमांक रिक्त आहेत.त्यामुळे उर्वरित २३७ सभासदांची अनामत रक्कम रू. ६९,८५०/- इतकी आहे. तसेच पुस्तके परत न केलेली आणि अनामत रक्कम परत न घेतलेले वाचनालयाचा नियमित लाभ न घेणारे सभासद १६ सभासदांची अनामत रक्कम रू.रू.५,000/- इतकी आहे. परत न केलेल्या पुस्तकांची किंमत रू.४,0६0/- इतकी होत आहे. एकूण २५३ सभासदांची एकूण अनामत रक्कम रू.७४,८५0/- इतक्या रक्कमेतून पुस्तकांची किंमत रू.४,0६0/- मनपाचे येणे समायोजित करून उर्वरित रक्कम रूपये ७0,७९0/- महानगरपालिका फंडात जमा करून सदर सभासदांजवळ असलेली पुस्तके व त्यांचे सभासदत्व कायमस्वरूपी रद्द करण्यास तसेच भविष्यात सार्वजनिक वाचनालयात येणा-या कोणत्याही वाचकाने ३ वर्षापेक्षा अधिक कालावधित वाचनालयाचा लाभ न घेतल्यास अशा वाचकांचे सभासदत्व रद्द करून त्याने भरलेली अनामत जप्त करून मनपा फंडात जमा करणेकामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी देण्यात येत आहे.

16/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. १३१३ विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :१७/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी ५ अतिरिक्त तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) पॅनलवर नियुक्ती करुन सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेस, करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बऱ्याच जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती अस्तित्वात आहेत. सदर इमारती निष्कसीत करणेचे काम सहा. आयुक्तांमार्फत सुरु आहे. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे, त्यांना निष्कसन करणेबाबत मा. आयुक्त महोदय ह्यांनी सुचना दिलेल्या आहेत.

सदर इमारतींचे संरचनात्मक संरक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणे करीता इमारतींचे सर्वेक्षण करुन स्टॅबिलिटी सर्टिफिकेट देणेकरीता रु.०.९०/- प्रति चौ. फुट तसेच इमारत नादुरुस्त आढळल्यास त्यात दुरुस्त्या सुचवून दुरुस्त्या नुसार केलेल्या अंमलबजावणीची पहाणी करुन स्टॅबिलीटी सर्टीफिकेट सादर करणे इ. सर्व रु. ३,०००/- प्रती ५०० चौ. फुट या निम्नत्तम दराने काम करणेस तयार असणाऱ्या स्थापत्य अभियंत्यांचे पॅनल नियुक्त करणेस **मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १०६५ दि. २६/११/२०१३** अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदर कामी महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दरानूसार काम करणेस **१) मे. ड्रापलेट कंन्स्टंल्ट (प्रो. श्री. विनय त्रिलोकी सिंग)** ह्यांनी आपल्या **दि. १६/०७/२०२१** रोजीच्या लेखी पत्राद्वारे काम करणेस इच्छुक असल्याबाबत कळविले आहे.

मे. ड्रापलेट कंन्स्टंल्ट (प्रो. श्री. विनय त्रिलोकी सिंग) ह्यांनी **डिसेंबर २००१ ह्या वर्षी मुंबई विद्यापिठ मधुन अभियात्रिकी पदवी** प्राप्त केलेली असून त्यांचेकडे मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. १८/०८/२०२१ ते दि. १७/०८/२०२४** पर्यंतच्या कालावधीकरीता नोंदणी प्रमाणपत्राची मुदत असुन सदरील कागदपत्रे सादर केलेली आहेत.

त्यांना **सुमारे २ वर्षाचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) केल्याबाबतचे अनुभव आहे तसेच त्यांनी सदर प्रकारचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

सदर कामासंदर्भात त्यांनी **रक्कम रु. १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र व रक्कम रु. ५००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर सत्य प्रतिज्ञापत्र** सादर केलेले आहे.

२) **मे. अर्च मास्टर्स (प्रो. आशिष अरविंद आंबेकर)** ह्यांनी आपल्या **दि. १४/१२/२०२१** रोजीच्या लेखी पत्राद्वारे काम करणेस इच्छुक असल्याबाबत कळविले आहे.

मे. अर्च मास्टर्स (प्रो. आशिष अरविंद आंबेकर) ह्यांनी **सन २००६ साली जगन्नाथ इन्स्टीट्युट ॲण्ड टेक्नॉलॉजी, दिल्ली येथून अभियात्रिकी पदवी** प्राप्त केलेली असून त्यांचेकडे **बृन्हमुंबई महानगरपालिका** येथील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ पर्यंतच्या** कालावधीकरीता नोंदणी पर्यंतचे प्रमाणपत्र, **कुलगाव बदलापुर**

म्युनिसिपल कॉन्सिल येथील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ३१/१२/२०२३** पर्यंतचे प्रमाणपत्र, **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. १३/१०/२०२१ ते दि. १२/१०/२०२२** पर्यंतचे प्रमाणपत्र, **ठाणे महानगरपालिकेचे** इमारतीचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ पर्यंतचे** प्रमाणपत्र व **नवी मुंबई महानगरपालिकेचे इमारतींचे** संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) **करण्याचे दि. ३१/१२/२०२३ पर्यंतचे** प्रमाणपत्र **पनवेल महानगरपालिकेचे इमारतींचे** संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ३१/१२/२०२३ पर्यंतचे** प्रमाणपत्र **पेन नगरपरिषदेचे इमारतींचे** संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ३१/१२/२०२३** पर्यंतच्या कालावधीकरीता नोंदणी प्रमाणपत्राची मुदत असुन सदरील कागदपत्रे सादर केलेली आहेत.

त्यांना **सुमारे ०७ वर्षाचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) केल्याबाबतचे अनुभव आहे तसेच त्यांनी सदर प्रकारचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

सदर कामासंदर्भात त्यांनी **रक्कम रु. १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र व रक्कम रु. ५००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर सत्य प्रतिज्ञापत्र** सादर केलेले आहे.

३) **मे. मधु एन. मिश्रा कंन्स्टंल्ट (प्रो. श्रीमती मधु नवनीत मिश्रा)** ह्यांनी आपल्या **दि. १८/०१/२०२२** रोजीच्या लेखी पत्राद्वारे काम करणेस इच्छुक असल्याबाबत कळविले आहे.

मे. मधु एन. मिश्रा कंन्स्टंल्ट (प्रो. श्रीमती मधु नवनीत मिश्रा) ह्यांनी **मे २००८** ह्या वर्षी **मुंबई विद्यापिठ मधुन अभियांत्रिकी पदवी** प्राप्त केलेली असून त्यांचेकडे **मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे** इमारतींचे

संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. १३/०१/२०२१ ते दि. १२/०१/२०२४** पर्यंतचे कालावधीकरीता नोंदणी प्रमाणपत्र व **ठाणे महानगरपालिकेचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३** पर्यंतच्या कालावधीकरीता नोंदणी प्रमाणपत्राची मुदत असुन सदरील कागदपत्रे सादर केलेली आहेत.

त्यांना **सुमारे ३ वर्षाचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) केल्याबाबतचे अनुभव आहे तसेच त्यांनी सदर प्रकारचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

सदर कामासंदर्भात त्यांनी **रक्कम रु. १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र व रक्कम रु. ५००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर सत्य प्रतिज्ञापत्र** सादर केलेले आहे.

४) **मे. आन कंन्स्ट्रक्शन सर्विसेस. (प्रो. श्रीमती प्रियंका पी. राजाने)** ह्यांनी आपल्या **दि. ०१/०२/२०२२** रोजीच्या लेखी पत्राद्वारे काम करणेस इच्छुक असल्याबाबत कळविले आहे.

मे. आन कंन्स्ट्रक्शन सर्विसेस. (प्रो. श्रीमती प्रियंका पी. राजाने) ह्यांनी **डिसेंबर २०१२** ह्या **महाराजा सयाजीराव विद्यापिठातून मधुन अभियात्रिकी पदवी** प्राप्त केलेली असून त्यांचेकडे **कुलगाव बदलापुर म्युनिसिपल कॉन्सिल** येथील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ३१/१२/२०२२** पर्यंतचे प्रमाणपत्र, **कल्याण डोंबिवली महानगरपालिका** येथील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३** पर्यंतचे प्रमाणपत्र, **भिवंडी निजामपुर महानगरपालिका** येथील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३** पर्यंतचे

प्रमाणपत्र, **ठाणे महानगरपालिकेचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३** पर्यंतचे प्रमाणपत्र व **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे इमारतींचे** संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. १६/११/२०२१ ते दि. १५/११/२०२२** पर्यंतच्या कालावधीकरीता नोंदणी प्रमाणपत्राची मुदत असुन सदरील कागदपत्रे सादर केलेली आहेत.

त्यांना **सुमारे ११ वर्षाचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) केल्याबाबतचे अनुभव आहे तसेच त्यांनी सदर प्रकारचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

सदर कामासंदर्भात त्यांनी **रक्कम रु. १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र व रक्कम रु. ५००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर सत्य प्रतिज्ञापत्र** सादर केलेले आहे.

५) **मे. एम. पी. प्राईम स्ट्रक्चर्स प्रा.लि. (प्रो. श्री. मिलींद पिंताबर पाटील)** ह्यांनी आपल्या **दि. ०८/०२/२०२२** रोजीच्या लेखी पत्राद्वारे काम करणेस इच्छुक असल्याबाबत कळविले आहे.

मे. एम. पी. प्राईम स्ट्रक्चर्स प्रा.लि. (प्रो. श्री. मिलींद पिंताबर पाटील) ह्यांनी **एप्रिल १९८८** ह्या वर्षी **पुणे विद्यापिठ मधुन अभियात्रिकी पदवी** तसेच **जुलै १९९१** साली **दक्षिण गुजरात विद्यापिठातून पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण** केलेली असून त्यांचेकडे **बृन्हमुंबई महानगरपालिकेचे इमारतींचे** संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे **दि. २६/०८/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२** पर्यंतच्या कालावधीकरीता नोंदणी प्रमाणपत्राची मुदत असुन सदरील कागदपत्रे सादर केलेली आहेत.

त्यांना **सुमारे ३० वर्षाचे** इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) केल्याबाबतचे अनुभव आहे तसेच त्यांनी सदर प्रकारचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

सदर कामासंदर्भात त्यांनी **रक्कम रु. १००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र व रक्कम रु. ५००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर सत्य प्रतिज्ञापत्र** सादर केलेले आहे.

तरी सदर दराने काम करणेस इच्छुक अनुभवी पदवीधर ५ तज्ञ स्थापत्य अभियंता/सल्लागार (कंन्सल्टन्ट) **१) मे. ड्रापलेट कंन्स्टंल्ट (प्रो. श्री. विनय त्रिलोकी सिंग) २) मे. अर्च मास्टर्स (प्रो. आशिष अरविंद आंबेकर) ३) मे. मधु एन. मिश्रा कंन्स्टंल्ट (प्रो.श्रीमती मधु नवनीत मिश्रा) ४) मे. आन कंन्सट्रक्शन सर्विसेस (प्रो. श्रीमती प्रियंका पी. राजाने) ५) मे. एम. पी. प्राईम स्ट्रक्चर्स प्रा.लि. (प्रो. श्री. मिलींद पिंताबर पाटील)** यांना मंजूर दरानुसार स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी पॅनलवर समाविष्ट करुन घेणेकामी व त्यांच्याकडून सुरक्षा अनामत रक्कम भरणा करुन घेणे, विहीत नमून्यात करारनामा करुन घेणे व कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव **मा. आयुक्त तथा प्रशासक** ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी ५ अतिरिक्त इच्छुक अनुभवी पदवीधर तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांच्याकडून मंजूर दरानुसार पॅनलवर स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी **१) मे. ड्रापलेट कंन्स्टंल्ट (प्रो. श्री. विनय त्रिलोकी सिंग) २) मे. अर्च मास्टर्स (प्रो. आशिष अरविंद आंबेकर) ३) मे. मधु एन. मिश्रा कंन्स्टंल्ट (प्रो.श्रीमती मधु नवनीत मिश्रा) ४) मे. आन कंन्सट्रक्शन सर्विसेस (प्रो. श्रीमती प्रियंका पी. राजाने) ५) मे. एम. पी. प्राईम स्ट्रक्चर्स प्रा.लि. (प्रो. श्री. मिलींद पिंताबर पाटील)** असे एकूण ५ स्थापत्य

अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांची पॅनलवर नियुक्ती करण्यात येत असून त्यांच्याकडून सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेस, करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

17/03/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

F/35

प्रशासकिय ठराव क्र. 1314

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 17 /03/2022

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन भवन तथा प्रशासकिय इमारती करिता वीज पुरवठा करणे कामी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीस अंदाजपत्रकिय रक्कम भरणा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील म्हाडा संकुल, विरार (पश्चिम) येथे महानगरपालिका परिवहन भवन तथा प्रशासकिय इमारत बांधणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रशासकिय इमारतीकरिता 4 MVA व बस चार्जिंग स्टेशनकरिता 2 MVA असा एकुण 6 MVA वीज भार आवश्यक आहे.

शहरात महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करणेंत येतो. याकरिता, दि.01/02/2022 रोजी मा.आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकितील चर्चेनुसार प्रशासकिय इमारतीकरिता आवश्यक असणारा 6 MVA वीज भार वसई सब-स्टेशन मधुन उपलब्ध होऊ शकतो. परंतु, त्याकरिता वसई सब-स्टेशन ते प्रशासकिय इमारतीपर्यंत स्वतंत्र फिडरची उभारणी करणेंची बाब निदर्शनास आणुन दिली. त्यानुसार मा.आयुक्त सो., यांनी वीज पुरवठा फिडर उभरणीचे काम महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीने करणे बाबत निर्देश दिले. त्यानुसार, महानगरपालिका व वीज कंपनीचे अभियंता यांचेसमवेत संयुक्त पाहणी करण्यात आली.

त्याअनुषंगाने 100% डी.डी.एफ योजनेन्तर्गत कमीत कमी खर्चाचे अंदाजपत्रक महानगरपालिकेस सादर करणेंबाबत संदर्भिय क्र.2 चे पत्रान्वये महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीस कळविण्यात आले.

सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीने प्रशासकिय इमारत तथा परिवहन भवन करिता सद्यस्थितीत आवश्यक असणारा 4 MVA वीज भार व 100% डी.डी.एफ योजनेन्तर्गत स्वतंत्र फिडर उभारणी करण्याचे दि.23/02/2022 रोजीचे जा.क्र:-SE/VC/Tech/VSI/Con/000697 अन्वये रक्कम 4,26,10,533/- रुपयेचे अंदाजपत्रक महापालिकेस सादर केले आहे.

तरी, सदर अंदाजपत्रकिय रक्कम महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीस आगाऊ स्वरुपात भरणा करणे आवश्यक असल्याने सदर कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन भवन तथा प्रशासकिय इमारतीकरिता 4 MVA वीज भार व 100% डी.डी.एफ योजनेन्तर्गत स्वतंत्र फिडर उभारणी करणे कामी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे **दि.23/02/2022 रोजीचे जा.क्र:-SE/VC/Tech/VSI/Con/000697 चे अंदाजपत्रकानुसार रक्कम 4,26,10,533/- रुपये** म.रा.वि.वि.कंपनीस आगाऊ स्वरुपात भरणा करणेंस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

17/03
(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 1315 विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 17/03/2022

प्रस्तावाचा विषय :- नालासोपारा (प) प्रभाग समिती (ई) कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील हायटेन्शन पोल स्थलांतर करणेंबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :- प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील बांधकाम विभागामार्फत तपस्या ते चौथा रस्ता पर्यंत नाला रुंदिकरणाचे काम करण्यात येत आहे. सद्यस्थितीत नाला रुंदीकरणाच्या जागेवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उच्च दाबाचे विद्युत पोल आहेत. नाला रुंदीकरणामध्ये उच्चदाबाचे विद्युत पोल अडथळा निर्माण करत आहेत. सदरचे उच्चदाबाचे पोल स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. त्याकरिता म.रा.वि.वि कंपनीच्या स्थलांतरीत करणेंबाबत जा.क्र./वविशम/नासो/विवि /2656/21-22, दि.30/11/2021 रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदर ठिकाणी उच्चदाबाचे विद्युत पोल स्थलांतरीत करणे करिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे 100% DDF (ना-परतावा करणे योग्य) योजने अंतर्गत रक्कम रु.11,70,786/- अक्षरी (अकरा लक्ष सत्तर हजार सातशे श्याऐंशीरुपये मात्र) रुपयाचे अंदाजपत्रक क्रमांक CE/KLNZ/TECH/DDF/SANCTION/NO.00549, दि.08/03/2022 रोजी प्राप्त झाले आहे. सदरचे अंदाजपत्रकीय रक्कम म.रा.वि.वि कंपनीस भरणा केलेस उच्चदाबाबचे पोल स्थलांतरीत करणे शक्य होईल. तरी सदर खर्च म.रा.वि.वि कंपनीस भरणा करणे आवश्यक आहे.

उच्चदाबाचे पोल स्थलांतर करणेंकरीता होणारा खर्च सन 2021-22 या वित्तीय वर्षातील "पोल स्थलांतर आणि सर्किट लाईट व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम रु.44,00,000/- या तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उच्च दाबाचे विद्युत पोल स्थलांतरीत करणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम 11,70,789/- अक्षरी (अकरा लक्ष सत्तर हजार सातशे श्याऐंशी रुपये मात्र) रुपये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस आगाऊ स्वरुपात भरणा करणे आवश्यक असल्याने सदर कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- नालासोपारा (प) प्रभाग समिती (ई) कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील हायटेन्शन पोल स्थलांतर करणें महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे **दि.08/03/2022 रोजीचे जा.क्र:-CE/KLNZ/TECH/DDF/SANCTION/NO.00549 चे अंदाजपत्रकानुसार रक्कम 11,70,789/- रुपये** म.रा.वि.वि.कंपनीस आगाऊ स्वरुपात भरणा करणेंस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

17/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ३३१६ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-१७/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता वॉटर टॉवर फायर टेंडर, वॉटर ब्राऊजर, रॅपीड इंटरव्हेंशन व्हेईकल वाहने खरेदी करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे, २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व), ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवानमान, वसई (प.) ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गांव ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई (पूर्व) अशी एकुण सात अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत तसेच १) पेल्हार, २) उमेळाफाटा, ३) जुचंद्र, ४) वालीव या ठिकाणी अग्निशमन केंद्रे प्रस्तावीत आहेत तसेच योग्य जागा उपलब्ध झाल्यानंतर आवश्यक ठिकाणी अग्निशमन केंद्रे उभारावयाची आहेत.

महानगरपालिका क्षेत्रालगत वाडा, भिवंडी, मिरा-भाईंदर, तारापूर, पालघर, बोईसर इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. त्या भागातील आगीच्या वर्दी आल्यास अग्निशमन वाहने तातडीने पाठवायी लागतात. महानगरपालिका हद्दीत ७ रेल्वे स्टेशन (नायगाव, वसई रोड, नालासोपारा, विरार, वैतरना, जूचंद्र, कामण) आहेत. नदी, नाले, खाडी, समुद्र डोंगराळ प्रदेश जंगल इत्यादी असल्याने कुठल्याही स्वरुपाची नैसर्गिक आपत्ती किंवा मानव निर्मित आपत्ती निर्माण झाल्यास तत्काळ मदत कार्य उपलब्ध करुन देणे करीता अग्निशमन दल अत्याधुनिक आपत्कालीन यंत्रसामुग्रीने सुसज्ज असणे गरजेचे आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शहराचा विकास झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. नवघर (पूर्व), वालीव, गोखिवरे, गौराईपाडा, पेल्हार, कामण, विरार व पापडी हया भागात मोठया औद्योगिक वसाहती असुन आग लागण्याच्या दुर्घटना सातत्याने होत असतात तसेच महानगरपालिका हद्दीमधून मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग जात असुन मोठया प्रमाणात वाहनाची वर्दळ असते. वाहन अपघात किंवा वायु / रसायन गळतीच्या दुर्घटना घडल्यास अग्निशमन विभागाकडे वॉटर टॉवर फायर टेंडर या प्रकारचे एक नग वाहन असणे आवश्यक वाटते.

आपल्या शहरात पाणीपुरवठा हा मर्यादित वेळेतच होतो महानगरपालिकेची फायर हायड्रंन्ट कुठेही उभारलेली नाही म्हणुन अग्निशमन दलाला पाणीपुरवठा करण्याकरिता वॉटर ब्राऊजर पाठवावा लागतो. सध्या सात उपकेंद्रात मिळुन केवळ दोन वॉटर ब्राऊजर असल्याने तीन नग नविन वॉटर ब्राऊजर खरेदी करणे संयुक्तीक वाटते.

तसेच रॅपीड इंटरव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन) अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसीत असे आधुनिक यंत्र सामुग्रीने सुसज्ज असलेले तसेच प्रवाहित विद्युत दुर्घटना घडल्यास तातडीचे कामासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असे रॅपीड इंटरव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन) दोन नग अग्निशमन वाहन खरेदी करणे संयुक्तीक राहील.

उपरोक्त बाबींचा सर्वंकश विचार करुन खालील प्रकारची वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	वाहनांचा तपशील	प्रती नग अंदाजीत दर	खरेदीची संख्या	अंदाजित एकुण रक्कम
१	वॉटर टॉवर फायर टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	४,९८,६६,४९९/-	१	४,९८,६६,४९९/-
२	वॉटर बाऊजर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	१,६०,००,०००/-	३	७,१७,७५,६००/-
३	रॅपिड इंटरव्हेंशन व्हेईकल (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	१,३०,४०,६००/-	२	२,६०,८१,२००/-
		एकुण रक्कम		१४,७७,२३,२९९/-

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगतचा परिसर तसेच भविष्यातील होणारी लोकसंख्या वाढ याबाबींचा विचार केल्यास महानगरपालिकेस उपरोक्त वाहने खरेदी करणे आवश्यक असुन त्याकरिता अंदाजित रक्कम रुपये १४,७७,२३,२९९/- खर्च अपेक्षित आहे.

सदरची वाहने खरेदी करणे करीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित अर्थसंकल्प २०२०-२०२१ सह सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान नं. १०२ वरील ८ नंबरचे लेखाशिर्ष "**विकास निधीअंतर्गत अग्निशमन वाहन व अग्निशमन यंत्रणा असलेली मोटारसायकल व उंच शिडीसह इतर साहित्य खरेदी**" यामध्ये रक्कम रुपये ४० कोटी तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन विभागासाठी उपरोक्त अग्निशमन वाहने ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणेस व येणा-या अंदाजित रक्कम रुपये १४,७७,२३,२९९/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रस्तावित केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगतचा परिसर तसेच भविष्यातील होणारी लोकसंख्या वाढ याबाबींचा विचार केल्यास अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता पुढीलप्रमाणे -

१. वॉटर टॉवर फायर टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - १ नग
२. वॉटर ब्राऊझर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - ३ नग
३. रॅपीड इंटव्हेंशन व्हेईकल (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - २ नग

इत्यादी अधयावत अग्निशमन वाहने ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. १४,७७,२३,२९९/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

30/03/2022

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

परिमंडळ -3 कार्यालय, दिवाणमान, जि - पालघर , पिन नं. 401202

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1317

विभाग :- बांधकाम

दिनांक : 17/03/2022

प्रस्तावाचा विषय :- वॉर्ड नं . ८५ मध्ये ओमनगर येथे राम रहीम बिल्डींग जवळ स्लॅब दुरूस्ती करणे कामी सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुर करून संविदा करणे .

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकिय रक्कम :- रू . २८८०८१ .00

प्रशासकिय मंजुरी :- मा . उप आयुक्त, परिमंडळ - ३ ठराव क्र . १०८७ दिनांक 03 .02 .2022

तांत्रिक मंजुरी :- मा . उप अभियंता पृ .क्र . 09 दि .0८ .02 .2022

निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/२१३/२१-२२/ दि .0४ /03/2022 उप आयुक्त, परिमंडळ - ३ वसई विरार शहर महानगरपालिका

निविदा प्रसिध्दी दिनांक दि .0४ .03 .2022 प्रभाग समिती 'एच' कार्यालय नोटीस बोर्ड

निवीदा फॉर्म विक्री दिनांक :- दि .0४ .03 .2022 ते दि .१0 .03 .2022

ई निविदा स्विकारण्याची तारीख :- दि . ११ .03 .2022

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त ई निविदा :- 0५

ई निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- ११ .03 .2022 सायं .४ .00

ई निविदा उघडण्याची दिनांक (दुसरा लखोटा) :- ११ .03 .2022 प्राप्त ई निविदा निविदा समितीपुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत .

अ . क्र .	निविदाधारकाचे नांव	निविदेतील दर	शेरा
१ .	मे . निलकंठ एन्टरप्रायझेस	५ .00% जादा	
२ .	मे . जे .डी .कंस्ट्रक्शन	अंदाजपत्रकिय दराने	
३ .	मे .सागर कंस्ट्रक्शन	३ .00% जादा	

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे . जे .डी .कंस्ट्रक्शन यांच्या निविदेतील अंदाजपत्रकिय दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे . त्यामुळे सदर कामासाठी प्राप्त निवीदाधारकांपैकी मे . जे .डी .कंस्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकिय दराच्या निविदा मंजुरीस दि .११ .03 .2022 रोजी निविदा समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे .

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये मा. आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.वविशम/आस्था/ ४४/२१ दि.२८/०६/२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने मा.उप आयुक्त व मा.अति. आयुक्त यांना काम वाटप केलेले आहे. त्यामध्ये मा.उप आयुक्त, परिमंडळ रू.५.00 लक्षा खालील कामावावत अधिकार प्रदान केलेले आहेत. महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(अ) अन्वये सदर कामी आलेल्या निविदापैकी मे. जे.डी.कंस्ट्रकशन यांची सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुरी व संविदा करणेस मा. उप आयुक्त परिमंडळ – ३ यांचे मंजुरीसाठी सविनय सादर.

ठराव :-

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. जे.डी.कंस्ट्रकशन यांच्या निविदेतील अंदाजपत्रकिय दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी क्र.वविशम / आस्था / ४४ / २१ दि.२८/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उप आयुक्त (परिमंडळ - 3) यांना प्रदान केलेल्या त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच इतर नामंजुर निविदाधारकांची इसारा रक्कम परतावा करणेस व याकामी होणा-या इतर अनुषंगीग खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त (परिमंडळ - 3)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. 1318

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : 17/03/2022

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने मधील कामांनाप्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस व प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांस सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की , महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२१/प्र.क्र.१३०(१२) /न.वि.-१६ दि.०३ नोव्हेंबर २०२१ अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत चार कामांना ४००.०० लक्ष इतका निधी मंजुर झालेला आहे. शासन निर्णयानूसार २५% हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

तरी मंजूर कामांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

अ.क्र	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५%हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती 'ए' मधील कै. भास्कर ठाकूर मंडई येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे.	रु. १,००,०० ,०००	रु. १०,२३,४८,३८३	रु. ११,२३,४८,३८३
२.	प्रभाग समिती 'सी' मधील नारिंगी बर्ड पार्क/बॉटनिकल गार्डन बांधणे व विकसीत करणे.	रु. १,००,०० ,०००	रु. ९६,३३,६३५	रु. १,९६,३३,६३५
३.	प्रभाग समिती 'सी' मधील शिरगांव तलाव विकसीत करणे.	रु. १,००,००,०००	रु. ५५,८०,४७०	रु. १,५५,८०,४७०
४.	प्रभाग समिती 'बी' मध्ये सर्वोदय वसाहत येथे हॉस्पीटल इमारत बांधणे.	रु. १,००,००,०००	रु. ८,६०,९६,३९०	रु. ९,६०,९६,३९०
एकूण		रु. ४,००,००,०००	रु.२०,३६,५८,८७८	रु.२४,३६,५८,८७८

सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन संदर्भिय शासन निर्णयामधिल अट क्र ३ अन्वये मा.शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे.

याकामी मनपा फंडातून २५% पेक्षा जास्त रक्कम खर्च करायची असल्याने त्यास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची प्रशासकिय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावांना मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी व सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करणेकामी मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२१/प्र.क्र.१३०(११) /न.वि.-१६ दि.०३ नोव्हेंबर २०२१ अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे चार कामांना रु. ४००.०० लक्ष इतका निधी मंजुर केलेला आहे. २५% पेक्षा जास्त हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

अ.क्र	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५%हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती 'ए' मधील के. भास्कर ठाकूर मंडई येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे.	रु. १,००,०० ,०००	रु. १०,२३,४८,३८३	रु. ११,२३,४८,३८३
२.	प्रभाग समिती 'सी' मधील नारिंगी बर्ड पार्क/बॉटनिकल गार्डन बांधणे व विकसीत करणे.	रु. १,००,०० ,०००	रु. ९६,३३,६३५	रु. १,९६,३३,६३५
३.	प्रभाग समिती 'सी' मधील शिरगांव तलाव विकसीत करणे.	रु. १,००,००,०००	रु. ५५,८०,४७०	रु. १,५५,८०,४७०
४.	प्रभाग समिती 'बी' मध्ये सर्वोदय वसाहत येथे हॉस्पीटल इमारत बांधणे.	रु. १,००,००,०००	रु. ८,६०,९६,३९०	रु. ९,६०,९६,३९०
एकूण		रु. ४,००,००,०००	रु.२०,३६,५८,८७८	रु.२४,३६,५८,८७८

वरील ४ कामांपैकी अ.क्र.१ व ४ ह्या कामांना ह्यापुर्वी प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. तरी सदर कामांना मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

तरी ४ कामे मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्राप्त निधीतून करणेस तसेच उर्वरित खर्च महानगरपालिका फंडातून (२५% पेक्षा जास्त हिस्सा) करणेसाठी महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

17/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. 1319

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : 17/03/2022

प्रस्तावाचा विषय :- **महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने मधील कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस व प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांस सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२१/प्र.क्र.१३०(१२) /न.वि.-१६ दि.०३ नोव्हेंबर २०२१ अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत चार कामांना ३००.५० लक्ष इतका निधी मंजुर झालेला आहे. शासन निर्णयानूसार २५% हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

तरी मंजूर कामांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

अ.क्र	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५%हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती 'एच' अंतर्गत कौल सिटी उद्यान विकसीत करणे.	रु. १,००,०० ,०००	रु.२,५२,३६,५०४	रु.३,५२,३६,५०४
२.	प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील तामतलाव मार्केट इमारत विकसीत करणे.	रु. १,००,०० ,०००	रु. ७२,१७,०५५	रु. १,७२,१७,०५५
३.	प्रभाग समिती 'ए' अंतर्गत आगाशी धोबीतलाव विकसीत करणे व लगत समाज मंदिर बांधणे.	रु. १,००,००,०००	रु. ५५,८०,४७०	रु. १,५५,८०,४७०
४.	प्रभाग समिती 'जी' मधील जुचंद्र येथील गांधी तलाव विकसीत करणे.	रु. ५०,०००	रु. १,२९,२२,३००	रु. १,२९,७२,३००
एकूण		रु. ३००५००००	रु. ५०९५६३२९	रु. ८१००६३२९

सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन संदर्भिय शासन निर्णयामधिल अट क्र ३ अन्वये मा.शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे.

याकामी मनपा फंडातून २५% हिस्स्याची रक्कम खर्च करायची असल्याने त्यास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची प्रशासकिय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावांना मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी व सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करणेकामी मंजूरीस्तव सादर. सदर कामांची प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस सादर .

प्रस्तावाचा निर्णय :- महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२१/प्र.क्र.१३०(१३) /न.वि.-१६ दि.०३ नोव्हेंबर २०२१ अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे चार कामांना ३००.५० लक्ष इतका निधी मंजुर केलेला आहे. २५% हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

अ.क्र	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५%हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती 'एच' अंतर्गत कौल सिटी उद्यान विकसीत करणे.	रु. १,००,००,०००	रु.२,५२,३६,५०४	रु.३,५२,३६,५०४
२.	प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील तामतलाव मार्केट इमारत विकसीत करणे.	रु. १,००,०० ,०००	रु. ७२,१७,०५५	रु. १,७२,१७,०५५
३.	प्रभाग समिती 'ए' अंतर्गत आगाशी धोबीतलाव विकसीत करणे व लगत समाज मंदिर बांधणे.	रु. १,००,००,०००	रु. ५५,८०,४७०	रु. १,५५,८०,४७०
४.	प्रभाग समिती 'जी' मधील जुचंद्र येथील गांधी तलाव विकसीत करणे.	रु. ५०,०००	रु. १,२९,२२,३००	रु. १,२९,७२,३००
एकूण		रु. ३००५००००	रु. ५०९५६३२९	रु. ८१००६३२९

वरील ४ कामांपैकी अ.क्र.२ व ३ ह्या कामांना ह्यापुर्वी प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. तरी सदर कामांना मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

तरी ४ कामे मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्राप्त निधीतून करणेस तसेच उर्वरित खर्च महानगरपालिका फंडातून (२५% पेक्षा जास्त हिस्सा) करणेसाठी महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

17/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

परिमंडळ -3 कार्यालय, दिवाणमान, जि - पालघर , पिन नं. 401202

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1200

विभाग :- बांधकाम

दिनांक : 03/03/2022

प्रस्तावाचा विषय :-

वॉर्ड नं.१०१ मध्ये स्लॅब टाकणे व उद्यान दुरूस्ती करणे कामी सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुर करून संविदा करणे .

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकिय रक्कम :- रू.१९३६९०/-

प्रशासकिय मंजुरी :- मा. उप आयुक्त, परिमंडळ - ३ ठराव क्र.८९८ दि. १७.१२.२०२१

तांत्रिक मंजुरी :- मा. उप अभियंता पृ.क्र. ०१/०७ दि.३०.१२.२०२१

निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/१०१२/२१-२२/दि.१२/०१/२०२२ प्र.उप आयुक्त, परिमंडळ - ३ वसई विरार शहर महानगरपालिका

निविदा प्रसिध्दी दिनांक :- दि.१४.०१.२०२२ प्रभाग समिती 'एच' कार्यालय नोटीस बोर्ड

निवीदा फॉर्म विक्री दिनांक :- दि.१४.०१.२०२२ ते दि.२१.०१.२०२२

निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. २४.०१.२०२२

निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- २४.०२.२०२२ सायं.४.००

निविदा उघडण्याची दिनांक (दुसरा लखोटा) :- १७.०२.२०२२

प्राप्त निविदा निविदा समितीपुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नांव	निविदेतील दर	शेरा
१.	मे. जे.डी.कंस्ट्रक्शन	३.००% जादा	
२.	मे. जेरॉल्ड एन्टरप्रायझेस	अंदाजपत्रकीय दराने	
३.	मे. निलकंठ एन्टरप्रायझेस	५.००% जादा	

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. जेरॉल्ड एन्टरप्रायझेस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे सदर कामासाठी प्राप्त निवीदाधारकांपैकी मे. जेरॉल्ड एन्टरप्रायझेस यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस दि.१७.०२.२०२२ रोजी निविदा समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये मा. आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.वविशम/आस्था/ ४४/२१

दि.२८/०६/२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने मा.उप आयुक्त व मा.अति. आयुक्त यांना काम वाटप केलेले आहे. त्यामध्ये मा.उप आयुक्त, परिमंडळ रू.५.00 लक्षा खालील कामाबाबत अधिकार प्रदान केलेले आहेत. महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(अ) अन्वये सदर कामी आलेल्या निविदांपैकी मे. जेरॉल्ड एन्टरप्रायझेस यांची सर्वात कमी व योग्य दराची निविदा मंजुरी व संविदा करणेस मा. उप आयुक्त परिमंडळ - ३ यांचे मंजुरीसाठी सविनय सादर.

ठराव :-

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. जेरॉल्ड एन्टरप्रायझेस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराने हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व वाजवी आहे.त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक सौ. यांनी क्र.वविशम / आस्था / ४४ / २१ दि.२८/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उप आयुक्त (परिमंडळ - 3) यांना प्रदान केलेल्या त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच इतर नामंजुर निविदाधारकांची इसारा रक्कम परतावा करणेस व याकामी होणा-या इतर अनुषंगीग खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

(P.D Salunj)
By. Engg.

उप आयुक्त (परिमंडळ - 3)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

परिमंडळ -3 कार्यालय, दिवाणमान, जि - पालघर , पिन नं. 401202
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1201

विभाग :- बांधकाम
दिनांक : 03/02/2022

ठराव :- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे ग्रीन प्रॉडक्ट्स इंडस्ट्री ते सुजान इंडस्ट्री व हॉटेल साई रेसिडेन्सी ते एस जी फार्मा पर्यंत पथदीप पोल उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९६,००८/-इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत .त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
परिमंडळ ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं.- ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. १३६६

विभाग :- विद्युत विभाग
दिनांक :-२५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे सातिवली मेन रोड ते लुसि इंडस्ट्री,एस जी फार्मा ते प्रेसटेक इंडिया पर्यंत पथदीप पोल उभारणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **कामाचा खर्च** :- रु. ५,००,०००/-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४,९४,४८०/-((सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता :-** मा . सभापती यांचे मागणीपत्र . प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे सातिवली मेन रोड ते लुसि इंडस्ट्री,एस जी फार्मा ते प्रेसटेक इंडिया पर्यंत पथदीप पोल नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असून येथे पथदीप पोल बसविणे आवश्यक.आहे . सदर जागेची पाहणी केली असता 13 पथदीप पथदीप पोल बसविणे आवश्यक आहे.

३) **जागेची मालकी** :- व.वि.श. महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- ट्यूबलर पोल ९ मीटर -१३ नग, LED-१०० W-१३ नग

५) **लेखाशिर्षक** :- विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे " या लेखाशिर्षकातील तरतुदी मधून भागविण्यात येईल.

मा आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र.व.वि.श.म /आका /४८/२०२१/ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उपयुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ नुसार मा.उपायुक्त परिमंडळ -३ ह्यांचा मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे सातिवली मेन रोड ते लुसि इंडस्ट्री,एस जी फार्मा ते प्रेसटेक इंडिया पर्यंत पथदीप पोल उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,९४,४८० इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत .त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
परिमंडळ ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं.- ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३३६७

विभाग :- विद्युत विभाग
दिनांक :- २५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक. ९० कोल्ही खुताडीपाडा,आशानगर परिसरात पथदीप पोल उभारणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **कामाचा खर्च** :- रु. ५,००,०००/-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४,९६,२४५/-(सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता :-** मा.सभापती यांची लेखी मागणी. कोल्ही खुताडीपाडा,आशानगर येथे पथदीप नसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होते.सदर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली असता 21 पथदीप पथदीप पोल उभारणी करण्याची आवश्यकता आहे.

३) **जागेची मालकी** :- व.वि.श. महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- ६ मी. पोल - २१ नग,LED-६० W-२१ नग,ओव्हरहेड वायर

५) **लेखाशिर्षक** :- विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे " या लेखाशिर्षकातील तरतुदी मधून भागविण्यात येईल.

मा आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र.व.वि.श.म /आका /४८/२०२१/ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उपयुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ नुसार मा.उपायुक्त परिमंडळ -३ ह्यांचा मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक. ९० कोल्ही खुताडीपाडा,आशानगर परिसरात पथदीप पोल उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९६,२४५/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
परिमंडळ ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं.- ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ७३६८ विभाग :- विद्युत विभाग
दिनांक :- २५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक ७४ मध्ये धुमाळनगर नाका येथे हायमास्ट उभारणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **कामाचा खर्च** :- रु. ५,००,०००/-
१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४,३०,७९३/-((सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता :-** नागरिकांची मागणी. प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक ७४ मध्ये धुमाळनगर नाका येथे दिवाबत्ती व्यवस्था नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असून येथे प्रत्यक्ष पाहणी केली असता धुमाळनगर नाका येथे 12.5 m हायमास्ट आवश्यक.आहे .

३) **जागेची मालकी** :- व.वि.श. महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- 12.5 m हायमास्ट - १ नग.

५) **लेखाशिर्षक** :- विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे " या लेखाशिर्षकातील तरतुदी मधून भागविण्यात येईल.

मा आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र.व.वि.श.म /आका /४८/२०२१/ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उपयुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ नुसार मा.उपायुक्त परिमंडळ -३ ह्यांचा मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक ७४ मध्ये धुमाळनगर नाका येथे हायमास्ट उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,३०,७९३/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत .त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
परिमंडळ ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं.- ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ९३६८ विभाग :- विद्युत विभाग
दिनांक :- २५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक. ७ ५ येथील पलाटपाडा आदिवासी पाडा ते स्वामी नारायण चाळ मुख्य रस्त्यापर्यंत पथदीप पोल उभारणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **कामाचा खर्च** :- रु. ५,००,०००/-
१) अंदाजपत्रकीय रक्कम :- **४,९६,०४०/-**(सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता :-** मा.नगरसेवक यांचे मागणीपत्र ,नागरिकांची मागणी .सदर परिसरात पाहणी केली असता सार्वजनिक रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे . तरी सदर परिसरात 23 पथदीप पोल बसविण्याची आवश्यकता आहे.

३) **जागेची मालकी** :- व.वि.श. महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- ६ मी. पोल - १६ नग,LED-६० W-१६ नग

५) **लेखाशिर्षक** :- विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे " या लेखाशिर्षकातील तरतुदी मधून भागविण्यात येईल.

मा आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र.व.वि.श.म /आका /४८/२०२१/ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उपयुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ नुसार मा.उपायुक्त परिमंडळ -३ ह्यांचा मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्रमांक. ७ ५ येथील पलाटपाडा आदिवासी पाडा ते स्वामी नारायण चाळ मुख्य रस्त्यापर्यंत पथदीप पोल उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. **४,९६,०४०/-** इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत .त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
परिमंडळ ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं.- ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ७३७०

विभाग :- विद्युत विभाग
दिनांक :- २५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे प्राईम इंडस्ट्रियल इस्टेट ते डोंगरी पर्यंत पथदीप पोल उभारणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **कामाचा खर्च** :- रु. ५,००,०००/-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- ४,९७,८२३/-(सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता :-** मा .सभापती यांचे मागणीपत्र . प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे प्राईम इंडस्ट्रियल इस्टेट ते डोंगरी पर्यंत पथदीप पोल उभारणे आवश्यक.आहे . सदर जागेची पाहणी केली असता १५ पथदीप पथदीप पोल बसविणे आवश्यक आहे.

३) **जागेची मालकी** :- व.वि.श. महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- ट्यूबलर पोल ९ मीटर -८ नग, LED-१०० W-८ नग, पाईप पोल ६ मीटर -७ नग, LED-६० W-७ नग

५) **लेखाशिर्षक** :- विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील " विकासनिधी अंतर्गत नवीन पोल उभारणे " या लेखाशिर्षकातील तरतुदी मधून भागविण्यात येईल.

मा आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र.व.वि.श.म /आका /४८/२०२१/ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उपयुक्त परिमंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदरचा प्रस्ताव महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ नुसार मा.उपायुक्त परिमंडळ -३ ह्यांचा मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती जी मधील प्रभाग क्र.९० येथे प्राईम इंडस्ट्रियल इस्टेट ते डोंगरी पर्यंत पथदीप पोल उभारणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९७,८२३/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत .त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
परिमंडळ ३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३३७७ विभाग : बांधकाम
दिनांक : २५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११० मधील खोपवाडी येथील स्टॅनी घोन्सालविस यांचे घराजवळील रस्ता कॉक्रीटीकरण करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ४,३९,५८९/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. उपायुक्त, परिमंडळ-३ यांचा ठ.क्र. ४९६ दि. २४/०८/२०२१
तांत्रिक मंजुरी	:-	मा. उप अभियंता पा.क्र. ०४ अ.क्र. २२ दि. ३०/०८/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	दि. २२/१०/२०२१
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. १७/११/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	उप अभियंता
निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)	:-	दि. १७/०२/२०२२

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१.	मे. फरहान एंटर	२०.७९% कमी दराने	धनाकर्ष क्र. ०००९९६ दि. १७/०३/२०२२ पावती क्र. ४४८२ दि. २१/०३/२०२२
२.	मे. आरझी धोत्रे कंस्ट्रक्शन	१८.०८% कमी दराने	-
३.	मे. प्रभात एंटर.	२३.००% कमी दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे. प्रभात एंटरप्रायजेस यांची २३.००% कमी दराची निविदा प्राप्त निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदेची तुलना केली असता मे. प्रभात एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील २३.००% कमी दराची निविदा ही तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तथापी मे. प्रभात एंटरप्रायजेस यांनी निविदा दराचा लखोटा दि. १७/०२/२०२२ रोजी उघडल्यानंतर आठ दिवसांच्या आत परफॉमर्न्स डी.डी. देणे अपेक्षित होते. परंतु मे. प्रभात एंटरप्रायजेस यांनी सदर परफॉमर्न्स डी.डी. विहित मुदतीत सादर न केल्याने उर्वरीत प्राप्त निविदांमधील द्वितीय लघुत्तम निविदा धारक मे. फरहान एंटरप्रायजेस यांना जा.क्र. वविशम/वसई/बांध/९८६८/२१-२२ दि. १७/०३/२०२२ अन्वये २३.००% कमी दराने किंवा त्यापेक्षा जास्त कमी दराने काम करणेस तयार असल्यास परफॉमर्न्स सिक्युरिटीचा धनाकर्ष सादर करणेबाबत कळविणेत आले. त्या अनुषंगाने मे. फरहान एंटरप्रायजेस यांनी सदरचे काम २३.००% कमी दराने करणेस तयार असलेबाबत दि. १७/०३/२०२२ च्या पत्रान्वये लेखी संमती दिली असुन परफॉमर्न्स अनामत रक्कम रु. ९६,८००/- रक्कमेचा भरणा पावती क्र. ४४८२ दि. २१/०३/२०२२ अन्वये केला असुन रक्कम महानगरपालिकेच्या फंडात जमा केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन मे. फरहान एंटरप्रायजेस यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. फरहान एंटरप्रायजेस ह्यांची २३.००% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/१३/२०२२ दि. १०/०२/२०२२ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुपंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उपायुक्त परिमंडळ-३
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. १३७२ विभाग : सार्व.बांधकाम

दिनांक :२५/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'ई' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ५३ मधील फनफिस्टा जवळ आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट बांधणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रशासकिय मान्यता :- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५१९ दि. २१/०१/२०२०

प्रस्तावित कामाची मुळ रक्कम :- रु. ५०,७५,३६०/-

तांत्रिक मान्यता :- मा. शहर अभियंता, दि. २१/०१/२०२०

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ५०,७५,३६०/-

जाहिर ई-निविदा सुचना :-

१) दै. प्रहार	दि. ०३/०२/२०२०
२) दै. लोकमत	दि. ०३/०२/२०२०
३) दै. जागरुक टाईम्स	दि. ०३/०२/२०२०
४) दै. फ्रि प्रेस जर्नल	दि. ०३/०२/२०२०
५) मिड-डे	दि. ०३/०२/२०२०
६) बितंबातमी	दि. ०३/०२/२०२०

जाहिर फेर ई- निविदा सुचना :-

१) दै. फ्रि प्रेस जर्नल	दि. ०५/०३/२०२१
२) दै. हमारा महानगर	दि. ०५/०३/२०२१
३) दै. मुंबई केसरी टाईम्स	दि. ०५/०३/२०२१
४) दै. आपल महानगर	दि. ०५/०३/२०२१
५) मिड-डे	दि. ०५/०३/२०२१
६) वृत्तमानस	दि. ०५/०३/२०२१
७) प्रहार	दि. ०५/०३/२०२१

प्रिपरेशन दिनांक :- दि. ०५/०३/२०२१

ई निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि. २२/०३/२०२१

प्राप्त निविदांची संख्या :- ०६

द्वितीय लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि. २७/०८/२०२१

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा
१.	मे. निळकंठ एंटरप्रायजेस	१४.९९% कमी दराने
२.	मे. शशिकांत राजहंस	९.९०% जादा दराने
३.	मे. संजय कंन्स्ट्रक्शन	११.११% जादा दराने
४.	मे. रवी भुसाठे	१३.०१% जादा दराने
५.	मे. श्रध्दा सुनिल कदम	५.४०% कमी दराने
६.	मे. अन्स कंन्स्ट्रक्शन	१५.००% कमी दराने

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचे अभ्यास करता **मे. अन्स कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराची** निविदा प्राप्त निविदाधारकांमधील लघुत्तम दराने आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. अन्स कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराची** निविदा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी **मे. अन्स कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराच्या** निविदेस मा. निविदा समिती सभेने दि. ०२/०३/२०२२ रोजी मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क)/(ड) नुसार संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'ई' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ५३ मधील फनफिस्टा जवळ आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट बांधणेकामी **मे. अन्स कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराची** निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% कमी दराच्या** निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

२५/०३

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३३७३ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :- २८/०३/ २०२२

प्रस्तावाचा विषय :- मा. आ. श्री. हितेंद्रजी ठाकूर ह्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ करीता कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, मा. आ. श्री. हितेंद्रजी ठाकूर ह्यांच्या आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ करीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पुढील कामे प्रस्तावित आहेत.

अ.क्र.	कामांची नावे	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती ए वॉर्ड क्र. ३४ मध्ये मोठा महालपाडा नवापुर येथे समाजमंदीर बांधणे. (१३ मी. ७ मी. तळमजला + पहिला मजला)	रु. ५४,००,८२५/-
२.	प्रभाग समिती ई वॉर्ड क्र. ८४ मध्ये गास मोठा तलाव लगत संरक्षक भिंत बांधणे.	रु. ८२,४३,६७०/-
३.	मौजे धोवली येथे आरक्षण क्र. ७०७ विकसीत करणे. (संरक्षक भिंत + मैदान)	रु. २५,०५,५६५/-
४.	प्रभाग समिती एच वॉर्ड क्र. ९६ मध्ये सनसिटी मधील विना वोलो सिटी अपार्टमेंट जवळ गार्डन विकसीत करणे. (संरक्षक भिंत + वॉटर टँक + पाथवे)	रु. ३९,७२,६२५/-
५.	वॉर्ड क्र. ८४ मध्ये वाझा मोहल्ला ते भातलेपाडा पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.	रु. २,४२,५०,२२६/-
६.	सुरुची बाग येथील आरक्षण क्र. ६७१ विकसीत करणे.	रु. ५४,२८,९२५/-
७.	वॉर्ड क्र. ११५ मध्ये बापाणे विभागीय कार्यालय इमारतीची डागडुजी करणे.	रु. १४,७०,४९५/-
८.	वॉर्ड क्र. ८९ मध्ये सागपाडा येथे ४ बी इंडस्ट्रीज इस्टेट ते वुड पायलट गोडाऊन पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे.	रु. १,०१,२२,८५४/-

९.	प्रभाग समिती आय मधील टोकपाडा तलावाचे सुशोभिकरण करणे.	रु. १,०९,७१,७८०/-
१०.	मौजे माणिकपूर आरक्षण क्र. ६०५ येथे गार्डन विकसीत करणे.	रु. ७४,४७,६५२/-
११.	मौजे जुचंद्र आरक्षण क्र. ८१६ येथे गार्डन विकसीत करणे.	रु. १,५५,०९,२९१/-
१२.	वॉर्ड क्र. १०५ व ११५ मध्ये नायगांव बापाणे मेनरोड ते हसोबा नगर पर्यंत बॉक्स कल्व्हर्ट (७ ठिकाणी)	रु. ४८,२६,५८१/-
१३.	मौजे चोबारे आरक्षण क्र. ७१९ येथे गार्डन विकसीत करणे.	रु. ३,६९,३८,३०७/-
१४.	वॉर्ड क्र. १०७ मध्ये लोहिया नगर ते घाटाळ नगर पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.	रु. ३,१९,९२,७३६/-

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त ह्यांच्या अधिकार व कर्तव्यानूसार वरील कामांचा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मिळणेकरीता व फंडाव्यतिरिक्त होणारा खर्च महानगरपालिका फंडातुन करणेसाठी मान्यतेस्तव सादर. तसेच प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी व मंजूरी घेऊन ई-कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सन २०२१-२२ ह्या वर्षात मा. आ. श्री. हितेंद्रजी ठाकूर ह्यांच्या फंडाअंतर्गत कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता व फंडाव्यतिरिक्त होणारा खर्च महानगरपालिका फंडातुन करणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

28/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. १२०४ विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :२८/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ, जी,एच,आय मधील विविध विकास कामे व प्रकल्प विकसीत करण्यासाठी अतिरिक्त तांत्रिक सल्लागारांची नेमणूक करणेकामी मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेने सन २०२२-२३ या अर्थसंकल्पात विविध विकास कामांसाठी उदा. तलाव, मोठे प्रकल्प, उद्याने, विकास स्मशानभुमी, विकास नाले बांधकाम, समाजमंदीर, इमारती बांधकाम आरक्षणाचा विकास इत्यादी कामांसाठी तरतूद केलेली आहे. तसेच महापालिकेस केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेअंतर्गत विविध विकास कामे प्रस्तावित करावयाची आहेत.

सद्याच्या व प्रकल्पीत लोकसंख्येनुसार विविध पायाभूत संविधांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व सदर सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र /राज्य शासनाच्या विविध कार्यक्रम/अभियान/योजनांतर्गत सादर करुन महानगरपालिकेस अनुदान उपलब्ध करुन देणे तसेच सदर प्रकल्पाचे प्रकल्प नियोजन सल्लागार म्हणून काम पाहणे यासाठी सक्षम व अनुभवी तांत्रिक सल्लागारा महानगरपालिकेकडे असणे आवश्यक आहे.

सदर कामांचे नकाशे आराखडे तयार करणे त्यानुसार अंदाजपत्रके तयार करणे व अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजूरी घेणे तसेच अनुदानांतर्गत विकास कामांना संबधीत विभागाची मंजूरी आणून निधी प्राप्त करुन देणे कामी खालील कामांसाठी विविध क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांची /वास्तु शिल्पकारांची पॅनलवर नेमणूक

मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचेकडील ठराव क्र. ३९९ दि. २९/०१/२०२१ अन्वये केली असून त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	कामाचे नाव	मंजूर दर
१.	वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध विकास कामे करणेकामी तांत्रिक सल्लागाराची पॅनलवर नियुक्ती करणे.	अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (+) १.९९% जास्त दराने

वरील मंजूर दराप्रमाणे श्री. मिलींद पिंताबर पाटील यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अशा पायाभुत प्रकल्पांसाठी सल्लागार म्हणून काम करण्यास इच्छुक असल्याचे दि. २१/०२/२०२२ रोजीच्या पत्राने कळविलेले आहे.

श्री. मिलींद पिंताबर पाटील यांना रस्ते विकसीत करणे, शहरी रस्ते डिझाईन प्रकल्प, स्मार्ट सिटी प्रकल्प, पाणीपुरवठा योजना, स्ट्रॉर्म वॉटर ड्रेनेज, ब्रिज इत्यादी कामांबाबतचे नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक इत्यादी तयार करण्याबाबतचा अनुभव असून त्यांनी सदर प्रकारची कामे केलेली आहेत.

सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिकेअंतर्गत नागरी पायाभूत सुविधा ह्या अपुऱ्या असून या भागाची वाढती लोकसंख्या व वाढते नागरीकरण विचारात घेऊन नियोजनबध्द पायाभुत नागरी सुविधांचा विकास राज्य/केंद्र शासनाच्या अनुदानातून हाती घेणे आवश्यक असल्याने श्री. मिलींद पिंताबर पाटील यांच्यासारख्या सक्षम व अनुभवी अभियंता तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केल्यास निश्चितच कामांना गती प्राप्त होणार आहे.

तरी निविदेअंतर्गत एक विशेष बाब म्हणून श्री. मिलींद पिंताबर पाटील यांच्याकडून निविदेनुसार मागणी केलेली इसारा रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी रु. दोन लक्ष मात्र) भरणा करुन घेतल्यानंतर पॅनलवर नियुक्ती करणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेपुढे सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध विकास कामे व प्रकल्प विकसीत करण्यासाठी अतिरिक्त तांत्रिक सल्लागार

श्री. मिलींद पिंताबर पाटील यांच्याकडून निविदेनुसार मागणी केलेली इसारा रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी रु. दोन लक्ष मात्र) भरणा केल्यानंतर पॅनलवर समाविष्ट करुन घेणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

28/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १३७५ विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- ३०/०३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील ऑक्सिजन प्लांट, जनरेटर व वरुण इंडस्ट्रीज विलगीकरन कक्ष, वालीव येथे सि.सि.टि.व्ही यंत्रणा तातडीने खरेदी करुन बसविणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- कोरोना (covid १९) विषाणूच्या नियंत्रणाकरीता व त्याचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथे कोव्हीड केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर ठिकाणी वसई विरार शहरातील कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांना ठेवण्यात येत आहे. त्यांची सि.सि.टि.व्ही तर्फे निगराणी करणे आवश्यक असून सदर बाब अत्यावश्यक असल्याने कोव्हीड केंद्रा अंतर्गत जावक.क्र.व.वि.श.म/मा.तं/५१/२०-२१ दि. १०/०९/२०२०अन्वये सि.सि.टि.व्ही बसविले आहेत.

सद्यस्थितीत चंदनसार कोव्हीड केंद्रा अंतर्गत नव्याने ऑक्सिजन प्लांट स्थापन करण्यात आला आहे. सदर ऑक्सिजन प्लांट मधून रुग्णांना ऑक्सिजन पुरविण्यात येतो. सदर बाब अत्यावश्यक असल्याने सि.सि.टि.व्ही यंत्रणेने निगराणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामधील ऑक्सिजन प्लांट व जनरेटर परिसरात सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	साहित्याचे नाव	नग	प्रति नग अंदाजित रक्कम रुपये (सर्व करांसहीत)	एकुणअंदाजित रक्कम रुपये
१	Bullet Camera	८	३,३५६/-	२६,८४८/-
२	DVR-८ PORT	१	१२,५००/-	१२,५००/-
३	२ TB HDD	१	८,४०० /-	८,४००/-
४	WIRING PVC Casing (meter)	१७६०mtr	६५/-	१,१४,४००/-
५	४U Rack	१	४,५७८/-	४,५७८/-
६	Power Supply	२	३,७२२/-	७,४४४/-
७	VGA Switcher	१	७५०/-	७५०/-
८	BNC/DC Connector	२४	८२/-	१,९६८/-
९	Spike Guard	१	४००/-	४००/-
१०	Installation and Fitting Charges	८	३५४/-	२,८३२/-
	Total			१,८०,१२०/-

तसेच वरुण इंडस्ट्रीज वालीव येथे कोव्हीड रुग्णांवर उपचार होत असून सदर ठिकाणी सुद्धा ऑक्सिजन प्लांट व जनरेटर बसविण्यात आले आहे. या ठिकाणी सि.सि.टि.व्ही द्वारे निगराणी करणे आवश्यक असून सदर ठिकाणी सि.सि.टि.व्ही यंत्रणा बसविणे कामीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	साहित्याचे नाव	नग	प्रति नग अंदाजित रक्कम रुपये (सर्व करांसहीत)	एकुणअंदाजित रक्कम रुपये
१	Bullet Camera	१४	३,३५६/-	४६,९८४/-
२	No.Of NVR/DVR-३२ PORT NVR	१	३१,५००/-	३१,५००/-
३	४TB HDD	२	११,८००/-	२३,६००/-
४	WIRING PVC Casing (meter)	२७५० mtr	६५/-	१,७८,७५०/-
५	4U Rack	१	४,५७८/-	४,५७८/-
६	Power Supply	२	३,७२२/-	७,४४४/-
७	१९ inch Monitor	१	६,५००/-	६,५००/-
८	BNC Connector	६८	८२/-	५,५७६/-
९	Spike Guard	१	४००/-	४००/-
१०	Installation and Fitting Charges	२२ (Including old cameras)	३५४/-	७,७८८/-
	Total			३,१३,१२०/-

उपरोक्त प्रमाणे चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये ऑक्सिजन प्लांट व वरुण इंडस्ट्री विलगीकरन कक्ष, वालीव येथील ऑक्सिजन प्लांट व जनरेटर परिसरात तसेच कक्षात सि.सि.टि.व्ही यंत्रणा खरेदी करुन बसविणे कामी एकूण अंदाजित रक्कम रु.४,९३,२४०/-इतका खर्च अपेक्षीत असुन सदर खर्च लेखासांकेतांक क्र.०४१-४१७२-२ **"संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्किट कॅमेरे नियंत्रण कक्ष"** या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल.

तरी दरपत्रके मागवून प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील कोव्हीड केंद्रामध्ये ऑक्सिजन प्लांट व वरुण इंडस्ट्री विलगीकरन कक्ष, वालीव येथील ऑक्सिजन प्लांट व जनरेटर परिसरात तसेच कक्षात सि.सि.टि.व्ही यंत्रणा खरेदी करुन बसविणे कामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मंजुरीस्तव सादर.

ठराव/ निर्णय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' मधील चंदनसार येथील ऑक्सिजन प्लांट, जनरेटर व वरुण इंडस्ट्रीज विलगीकरन कक्ष, वालीव येथील ऑक्सिजन प्लांट, जनरेटर परिसरात व कक्षात सि.सि.टि.व्ही यंत्रणा तातडीने खरेदी करुन बसविणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७३७६ विभाग: भांडार विभाग
दिनांक : ३०/३/२०२२

प्रस्तावाचा विषय:- :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन २०२२/२३ व २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी स्टेशनरी छपाई करुन पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेची ९ प्रभाग समिती कार्यालये, मुख्यालय व वैद्यकीय आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग इ. कार्यालयांना प्रशासनाच्या कामकाजासाठी तसेच प्रसिध्दीसाठी विविध प्रकारची स्टेशनरी छपाई करावी लागते. तसेच साहित्य व हिशोबाच्या नोंदीसाठी विविध प्रकारचे नमुने रजिस्टर वेळोवेळी छपाई करावी लागतात. सदरचे काम हे वर्षभर करावे लागत असल्याने प्रत्येक वेळी निविदा मागवुन खरेदी करणे अडचणीचे होते, व कामाचा खोळंबा होतो. सदरची कामे वेळेत करणेकरीत वार्षिक दर करार केल्यास छपाई काम सुरळीतरित्या सुरु राहते. याकामासाठी महापालिकेचा स्वत:चा छापखाना नसल्याने ई-निविदा मागवुन छपाई काम केल्यास कार्यालयीन दैनंदिन कामकाज सुरळीत राहते.

यापूर्वी स्टेशनरी छपाई करण्यांचे कामाच्या ३ वर्षाच्या निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु ३ वर्षाच्या दर वाढीचा विचार करुन निविदाकार दर जास्त भरतात त्यामुळे बाजार भावाची तपासणी करुन प्रत्यक्ष असणा-या दराची खातरजमा करुन, वाटाघाटी करुन दर कमी करुन घ्यावे लागतात. व त्यामध्ये बरासचा वेळ वाया जातो. याकरीता २ (दोन) वर्षाच्या ई-निविदा मागविल्यास प्राप्त होणारे दर योग्य येतील.

सद्यस्थितीत स्टेशनरी छपाई कामाच्या ई-निविदाची मुदत ३१ मार्च २०२२ आहे. त्यापुढील कालावधीकरिता दोन वर्षाचे दर करार करावे लागणार आहेत. त्याकरीता ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे.

महापालिकेची ९ प्रभाग समिती कार्यालये, वैद्यकीय आरोग्य विभाग, महिला बालकल्याण विभाग व मुख्यालयातील इतर विविध विभागाकरिता स्टेशनरी छपाई या कामासाठी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.क्र.	तपशील	०१ एप्रिल २०२१ ते ३१ जानेवारी २०२२ पर्यंत
१	वैद्यकीय आरोग्य विभाग,आरोग्य विभाग	३९९९९८६
२	सामान्य प्रशासन विभाग, मुख्यालय व प्रभाग समिती कार्यालये	२३३२१४७
एकूण		६३,३२,१३३/-

वरील प्रमाणे सन २०१९-२० मधील खर्च हा माहे मार्च २०२० पासून मोठया प्रमाणात कोविड-१९ साथ पसरल्याने दैनंदिन कार्यालयीन कामकाज पुर्णत: बंद असल्याने सदरचा खर्च हा कमी झालेला आहे. परंतु आता सुरळीतरित्या कामकाज सुरू झाल्याने सन २०२२/२३ व २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता प्रति वर्ष सुमारे १ कोटी प्रमाणे पुढील २ वर्षाकरिता २ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समिती कार्यालये, मुख्यालय व वैद्यकीय आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग इ. कार्यालयांना प्रशासनाच्या कामकाजासाठी तसेच प्रसिध्दीसाठी विविध प्रकारची स्टेशनरी छपाई साहित्य व हिशोबाच्या नोंदीसाठी विविध प्रकारचे नमुने रजिस्टर इ. स्टेशनरी छपाई करणेस सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरीता प्रति वर्ष १ कोटी प्रमाणे २ वर्षाकरिता ई-निविदा मागवुन वार्षिक दरकरार करुन स्टेशनरी छपाई करणेस येणा-या रु. २ कोटी पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस सविनय सादर.

ठराव :- :- वसई-विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यालय व मुख्यकार्यालयातील विविध विभागांना दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी तसेच मनपाच्या विविध योजना,कार्यक्रम इ.बाबत माहितीस्तव विविध प्रकारची स्टेशनरी छपाई करणेकामी तसेच कार्यालयीन आवश्यक नोंदी ठेवणेकामी विविध प्रकारचे नमुने,रजिस्टर,पावती पुस्तके इ.स्टेशनरी छपाई वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार करणेकामी ई-निविदा मागवून वार्षिक दरकरार करण्यास व सन २०२२/२३ व सन २०२३/२४ या वित्तीय वर्षाकरिता प्रति वर्ष रक्कम रू.१ कोटी प्रमाणे २ वर्षाकरिता रक्कम रुपये रु. २ कोटी पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सन २०२०/२१ व सन २०२१/२२ च्या स्टेशनरी छपाई या ई- निविदेस दि.३०/०६/२०२२ पावेतो अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. तत्पूर्वी ई-निविदा प्रक्रिया सबंधित विभागाने पूर्ण करावी.

(अनिलकुमार पवार) २१/०३/२२
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७३७७ विभाग: बांधकाम

दिनांक: ३०/०३/२०२२

1) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिटी येथे हॉली फॅमिली शाळा ते कोलंबो अपा., पर्यंत गटार बांधणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

2) अंदाजपत्रकीय रक्कम :- ८१,३८,३५३/-

3) प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मध्ये एव्हरशाईन सिटी येथे हॉली फॅमिली शाळा ते कोलंबो अपा., पर्यंत अरुंद नाली अस्तित्वात आहे. सदर नालीलगत मोठ्या प्रमाणात रहिवासी इमारती तसेच शाळा आहेत. व त्या इमारतीतील सांडपाण्याचा निचरा प्रस्तावित केलेल्या नाल्यामार्फत होत असतो. अशा परिस्थितीमुळे नाल्याची दुर्गंधी परीसरात पसरत असून नागरीकांना व रहिवाशांना त्रासाचे होत आहे. त्याचप्रमाणे पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास नाल्याशेजारील परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी जमा होते व नाल्यातील सांडपाणी लगतच्या इमारतीमध्ये शिरते अशा वेळेस इमारतीमधील रहिवाश्यांना दुषित पाण्यामधून रहदारी करावी लागते. परिणामी इमारतीच्या आवारात दुर्गंधी पसरत असून साथिचे आजार होतात. त्यामुळे सदर ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे बंदिस्त गटार बांधण्यासाठी स्थानिक रहिवाशी तसेच माजी महापौर यांनी मागणी केली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी जाऊन पाहाणी करुन वसंत नगरी येथे हॉली फॅमिली शाळा ते कोलंबो अपा., पर्यंत गटार बांधण्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

4. कामाचे स्वरुप :- पाईप गटार लांबी ४५० मी X रुंदी १.५० मी.
१२०० मीमी, व्यासाचा पाईप

5. यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर जागी यापुर्वी कोणतेही काम झालेले नाही.

6. जागेची मालकी :- व.वि.श.म.

7. विकास आराखडयातील आरक्षण :- अस्तित्वातील नाला

8. अर्थसंकल्पीय तरतुद :- अ) लेखाशिर्ष :- रस्ता बांधकाम

9. स्थावर मालमत्ता नोंदवही क्र.३५ पृष्ठ क्र.२१ अ.क्र.२८१ वर नोंद

तरी सदरची प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (अ) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिटी येथे हॉली फॅमिली शाळा ते कोलंबो अपा., पर्यंत गटार बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ८१,३८,३५३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक 28/03

वसई विरार शहर महानगरपालिका

प्र.०/23.

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १३७८

विभाग: बांधकाम
दिनांक: ३०/०३/२०२२

1) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७८ आंबेडकर नगर आदिवासी पाडा येथे जगदिश गिराणे यांचे घर ते साई हाईट्स बिल्डींग पर्यंत पाईप गटार व पेव्हर बसविणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

2) अंदाजपत्रकीय रक्कम :- ५४,७३,१५०/-

3) प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मध्ये वॉर्ड क्र. ७८ मध्ये आंबेडकर नगर आदिवासी पाडा येथील जगदिश गिराणे यांचे घर ते साई हाईट्स बिल्डींग पर्यंत निमुळते गटार अस्तित्वात आहे. सदर परिसरात मोठया प्रमाणात वस्ती व रहिवासी इमारती आहेत. व त्या वस्तीतील व इमारतीमधीलपावसाळयात सद्यस्थितीत सदरचे गटार निमुळते असल्याकरणाने सांडपाण्याचा निचरा सुस्थितीत होत नाही. परिणामी इमारतीच्या आवारात दुर्गंधी पसरत असून साथिचे आजार होतात. त्यामुळे सदर ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे व रुंद बंदिस्त गटार बांधण्यासाठी स्थानिक रहिवाशी यांनी मागणी केली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी जाऊन पाहाणी करुन गटार बांधण्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

4. कामाचे स्वरुप :- पाईप गटार लांबी २५० मी X रुंदी १.५० मी.
९०० मीमी. व्यासाचा पाईप
रस्त्याची लांबी २२५ मी. रुंदी ४ मी., ८० मी.मी. जाडीचे पेव्हर ब्लॉक इ.

5. यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर जागी यापुर्वी कोणतेही काम झालेले नाही.

6. जागेची मालकी :- व.वि.श.म.

7. विकास आराखडयातील आरक्षण :- अस्तित्वातील गटार

8. अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष :- रस्ता बांधकाम

9. स्थावर मालमत्ता नोंदवही क्र.२२ पृष्ठ क्र.२८ अ.क्र.२५ वर नोंद

तरी सदरची प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (अ) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७८ आंबेडकर नगर आदिवासी पाडा येथे जगदिश गिराणे यांचे घर ते साई हाईट्स बिल्डींग पर्यंत पाईप गटार व पेव्हर बसविणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ५४,७३,१५०/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तात्रिंक मंजूरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

28/03

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

d:\prabhag d\bhandhikam 2016\priya\mayur\big work\jagdish girane to sai heights\tipani & tharav.docx

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७

ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ९३७९ विभाग :- परिवहन

दिनांक :- ३०/०३/२०२२

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- **<u>वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जेष्ठ नागरिक, दिव्यांग, कॅन्सर पिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना परिवहन सेवेत मोफत बस पास योजनेस मुदतवाढ मिळणेबाबत.</u>**

<u>प्रस्तावाचा मजकूर</u> :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेअंतर्गत जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विनामुल्य बसपास योजना पुन:श्च सुरु करणेबाबत मा. परिवहन समिती सभा ठराव क्र.०६, दि.२९/०७/२०२१ व मा.प्रशासकिय ठराव क्र.४१६, दि. ३०/०७/२०२१ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे.

प्राप्त मंजूरीनुसार जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना आपले प्रभाग समिती अंतर्गत देण्यात आलेल्या बस पासची मुदत दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत वाढविणेची कार्यवाही करणेबाबत सहा.आयुक्तांना कळविलेले होते.

त्यानुसार प्रभाग समितीमार्फत जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना सवलतीपोटी फेब्रुवारी २०२२ पर्यंत देण्यात आलेल्या पासच्या संख्येची विगतवारी खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	लाभार्थी	प्रभाग समिती									एकुण
		ए	बी	सी	डी	ई	एफ	जी	एच	आय	
१	जेष्ठ नागरीक	११०९	१८८७	२७८२	१४०	१३०८	७९०	३६२	११९८	१२८१	११२७७
२	दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिक	१४	३२३	३६४	८८	१०१	८७	५१	८९	७४	१२७१
एकुण		१२०३	२२१०	२७४६	१०२८	१४०९	८७७	४१३	१२८७	१३५५	१३५४८

उपरोक्तप्रमाणे लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या पासची मुदत दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत आहे.

दरम्यानच्या कालावधीत मा. परिवहन समितीचे सदस्य पदाची मुदत दि. ३१/१२/२०२१ रोजी संपुष्टात आली असून सभापती पद जानेवारी २०२२ पासून रिक्त आहे. तसेच परिवहन समिती मधील १२ सदस्यांपैकी ६ सदस्यांचा कार्यकाळ संपल्यामुळे केवळ ६ सदस्य कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे दि.२९/०६/२०२० रोजी पासून महानगरपालिकेनचे कामकाजाचे अधिकार आयुक्त तथा प्रशासक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सबब विलंब टाळावा करिता पास नुतनीकरण अर्जामधील पदाधिकारी ह्यांच्या शिफारसची अट काढून नुतनीकरण अर्जाचे पुन:श्च नव्याने छपाई करणेची कार्यवाही चालू आहे.

त्याकरिता बस पास नुतनीकरणाचे फॉर्म नागरिकांपर्यंत पोहचवण्यास व जेष्ठ नागरीक पासचे नुतनीकरण करणेकरिता हयातीचा दाखला महापालिकेच्या वैद्यकिय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र यांचेमार्फत उपलब्ध करुन घेणेस किमान १ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर कालावधीत लाभार्थ्यांना बस पास योजनेचा लाभ दि. १ एप्रिल २०२२ पासून देणेदेखील तितकेच महत्वाचे आहे.

सदर योजना येत्या वर्षात राबविणेकामी "परिवहन उपक्रमाच्या सन २०२२-२३ चे अर्थसंकल्प अंदाजपत्रक "ब" मध्ये **विनातिकिट प्रवास सवलत (दिव्यांग, जेष्ठ नागरिक व विद्यार्थी)**" या लेखाशिर्षांतर्गत **६ कोटी ५० लक्षची** तरतुद केलेली आहे.

त्याकरिता लाभार्थ्यांना १ एप्रिल, २०२२ पासून लाभ देणेकरिता त्याच पासावर दि. ३० एप्रिल, २०२२ पर्यंत मुदतवाढ देणेस त्याचप्रमाणे पुढील वित्तीय वर्ष दि.१ एप्रिल २०२२ ते दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत बसपास नुतनीकरण करणे, नवीन बसपास लाभार्थ्यांना देणेची कार्यवाही प्रभाग समितीमार्फत करणेचे आदेश सहा. आयुक्त, प्रभाग समिती यांना बजावणेस व त्याकामी होणारा खर्च "परिवहन उपक्रमाच्या सन २०२२-२३ चे अर्थसंकल्प अंदाजपत्रक "ब" मध्ये **विनातिकिट प्रवास सवलत (दिव्यांग, जेष्ठ नागरिक व विद्यार्थी)**" या लेखाशिर्षांतर्गत करणेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरीस्तव सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेअंतर्गत जेष्ठ नागरीक, दिव्यांग, कर्करोगपिडीत व रक्तशुध्दीकरण (डायलेसिस) करुन घेणारे नागरिकांना दि. १ एप्रिल, २०२२ पासून लाभ देणेकरिता त्याच पासावर दि. ३० एप्रिल, २०२२ पर्यंत मुदतवाढ देणेस त्याचप्रमाणे पुढील वित्तीय वर्ष दि. १ एप्रिल २०२२ ते दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत बसपास नुतनीकरण करणे व नवीन बसपास लाभार्थ्यांना देणेची कार्यवाही प्रभाग समितीमार्फत करणे तसेच त्याकामी होणारा खर्च "परिवहन उपक्रमाच्या सन २०२२-२३ चे अर्थसंकल्प अंदाजपत्रक "ब" मध्ये **विनातिकिट प्रवास सवलत (दिव्यांग, जेष्ठ नागरिक व विद्यार्थी)**" या लेखाशिर्षांतर्गत करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

30/03

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १३८०

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ३० / ०३ / २०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.९० मध्ये सातिवली महात्माफुलेनगर येथे कमलाकर गायकवाड यांचे घर ते मुख्य नाल्यापर्यंत सी.सी. गटर बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.९० मध्ये सातिवली महात्माफुलेनगर येथे कमलाकर गायकवाड यांचे घर ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटर अस्तीत्वात असून सद्यस्तिथीत पाईप गटर माती व गाळाने भरलेले असल्याने सांडपाण्याचा निचरा त्वरीत होत नाही.त्यामुळे सांडपाणी साचून परिसरामध्ये साथीचे रोग पसरत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याच्या तकारी या कार्यालयामध्ये येत असून स्थानिक नागरिक व लोकप्रतिनीधी सदर ठिकाणी असलेले पाईप गटर काढून नव्याने सी. सी. गटर बांधण्याची मागणी केलेली असल्याने सदर ठिकाणी सी. सी. गटर बांधणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पाहणी करून सी. सी. गटर बांधण्यासाठी रक्कम रु.४९२१६१/- चे सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.९० मध्ये सातिवली महात्माफुलेनगर येथे कमलाकर गायकवाड यांचे घर ते मुख्य नाल्यापर्यंत सी.सी. गटर बांधणे.	रु.४९२१६१/-

ठराव : उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्याअनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो.ह्यांचे कडील दि.१०/०२/२०२२ रोजीच्या जा.क्र. व.वि.श.म/आ का/१३/२०२२ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(किशोर गवस)
उप आयुक्त
सार्वजनिक बांधकाम
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७२८७

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ३० / ०३ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.८९ मधील चिंचोटी वीज येथे जी.आय. पाईप रेलिंग बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.८९ मधील चिंचोटी वीज येथे दोन्ही बाजूस कुठल्याही प्रकारची संरक्षक भींत नसल्याने वाहतूकीस धोका निर्माण झालेला आहे. सदर वीज वरील रस्ता हा चिंचोटी विभागाला जोडणारा ऐकमेव रस्ता असल्याने सदर ठिकाणी वाहतूकीचे प्रमाण जास्त असल्याने मोठी दुर्घटना होऊन जिवीत व वित्तीय हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी वीजच्या दोन्ही बाजूस संरक्षणासाठी जी. आय .पाईप रेलिंग बसविणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी संरक्षणासाठी तातडीने उपाययोजनेसाठी स्थानिक लोकप्रतिनीधी व नागरीक यांनी मागणी केली आहे.त्याकरीता जागेची पाहणी करून जी.आय.पाईप रेलिंग बांधण्यासाठी रक्कम रू.२९६२६८/- चे सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.८९ मधील चिंचोटी वीज येथे जी.आय. पाईप रेलिंग बांधणे.	रू.२९६२६८/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्याअनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो.ह्यांचे कडील दि.१०/०२/२०२२ रोजीच्या जा.क्र. व.वि.अ.म/आ का/१३/२०२२ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(किशोर गावस)
उप आयुक्त
सार्वजनिक बांधकाम
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९३८२

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ३० / ०३ / २०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.९० मधील सातिवली नाका येथे हायमास्टसाठी आर.सी.सी.सर्कल बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.९० मधील सातिवली नाका येथे हायमास्टसाठी असलेली वीटबांधकामाची संरक्षक भींत नादुरुस्त झालेली आसल्याने हायमास्टसाठी धोका निर्माण झालेला आहे. सातिवली येथे मोठया प्रमाणात औद्योगीक वसाहत असल्याने अवजड वहनांची वाहतूक दिवसरात्र सुरु असते. त्यामुळे सदर ठिकाणी मोठी दुर्घटना होऊन जीवित व वित्तीयहानी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदर ठिकाणी आर.सी.सी.सर्कल बांधण्यासाठी मा.माजी सभापती व स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी मागणी केली आहे.त्याकरीता जागेची पाहणी करुन हायमास्टसाठी आर.सी.सी.सर्कल बांधण्यासाठी रक्कम रु.१,०३,२३७/- चे सन २०१९-२० च्या विलीय वर्षांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गाज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचा अंदाजित खर्च
१	वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड नं.९० मधील सातिवली नाका येथे हायमास्टसाठी आर.सी.सी.सर्कल बांधणे.	रु.१,०३,२३७/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन २०१९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्याअनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त सो.ह्यांचे कडील दि.२०/०२/२०२२ रोजीच्या जा.क्र. व.वि.श.म/आ का/१३/२०२२ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(किशोर पवार)
उप आयुक्त
सार्वजनिक बांधकाम
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पुर्व), जि. पालघर पिन नं 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 1383

विभाग : मुख्यालय लेखा विभाग
दि. 30 /03/2022

ठरावाचा विषय :- 15 व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधीतून खर्च करण्याची कार्यपद्धती.

ठरावाचा मजकूर/प्रस्तावना :-

15 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून सन 2020-21 या आर्थिक वर्षासाठी मिलीयन प्लस सिटीज गटासाठी एअर क्वालिटी साठीच्या बंधनकारक (tied) अनुदानासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेला आतापर्यंत पहिला व दुसरा हप्ता मिळून रु.32 कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. तसेच पाणीपुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी पहिला व दुसरा हप्ता मिळून रु.32 कोटी इतके अनुदान प्राप्त झाले आहे.

सदर अनुदानातून खर्च करताना शासन निर्गमित करेल अशा शासन निर्णयातील तरतूदीनुसार तसेच वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार सदर खर्च बंधनकारक राहील. सदरचे अनुदान "सशर्त" म्हणून वितरीत करण्यात येत आहे. असे शासनाच्या अनुदान वितरण आदेशात नमूद करण्यात आले आहे.

त्सास अनुसरुन 15 व्या वित्त आयोगाच्या निधी व मनपाच्या स्वनिधी यातून हाती घ्यावयाच्या विविध कामांचे अंमलबजावणी व सदर कामांवर करण्यात येणारा खर्च याबाबतची प्रमाणीत कार्यपद्धती (SOP) विहीत करण्याची बाब विचारधीन होती. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

ठरावाचा निर्णय :-

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एफएफसी 2020/प्र.क्र.56/नवि-4 दि.03 मे 2021, अन्वये 15 व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील मिलीयन प्लस सिटीज गटातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाची कार्यपद्धती निश्चीत करण्यात आलेली आहे. ती थोडक्यात खालीलप्रमाणे .

1) वातावरणातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी बंधनकारक अनुदान (tied grant for air quality)
2) पाणीपुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन यासाठी बंधनकारक अनुदान (tied grant for improving conservation supply and management of water including waste water & sewarage)
3) एअर क्वालिटी साठी प्राप्त झालेल्या अनुदानाचे वितरण व विनियोग कार्यपद्धती स्वतंत्रपणे शासनाकडून निश्चीत करण्यात येईल.
4) पाणीपुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवथापन यासाठी प्राप्त अनुदानातून हाती घ्यावयाची कामे खालीलप्रमाणे.

i) पाणीपुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा (सांडपाणी व मलनि:सारण)
ii) प्रभावी घनकचरा व्यवस्थापन
iii) प्राप्त निधीपैकी वरील (i) व (ii) या दोन्ही घटकासाठी प्रत्येकी 50% (प्रत्येकी रु. 16 कोटी) याप्रमाणे निधीचा विनियोग करता येईल.
iv) कोणत्याही एका घटकासाठी गरज पूर्ण झाली असेल तर उर्वरित निधी दुसऱ्या घटकासाठी वापरता येईल.

v) वरील (i) व (ii) या दोन्ही घटकामध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा उभारण्यासाठी देखील निधीचा वापर करता येईल.

उपरोक्त शासन निर्णयातील (v) येथील तरतूदीस अनुसरुन नमूद करण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये एकूण 996 लेखाशिर्ष असून त्यापैकी पाणीपुरवठा, सांडपाणी व मलनि:सारण, तसेच प्रभावी घनकचरा व्यवस्थापन या बाबींशी संबंधित असलेली लेखाशिर्ष व तरतूदी व त्यातून नोव्हेंबर 2020-21 व 2021-22 मध्ये झालेला खर्च याबाबतचा तपशिल सोबत प्रपत्रामध्ये जोडला आहे.

तसेच यावर झालेल्या खर्चाच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेची यादी तसेच कार्यादेशाची यादी नस्तीवर ठेवली आहे.

शासन आदेशात नमूद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा, सांडपणी, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन इ. बाबींवर नमूद केलेल्या लेखाशिर्षामधून/मनपा निधीतून जो खर्च करण्यात आला आहे तो पुन्हा उभारण्यासाठी 15 व्या वित्त आयोग निधीचा वापर करण्यास व त्याप्रमाणे 15 व्या वित्त आयोगाच्या निधीतून आवश्यकतेएवढी रक्कम उपरोक्त लेखाशिर्षाशी संबंधीत मनपा निधीत वर्ग करण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

एखाद्या प्रकल्पावर / बाबीवर झालेल्या खर्चासाठी लेखाशिर्ष उपलब्ध नसेल तर असा खर्च/देयके थेट 15 व्या वित्त आयोगाच्या लेखाशिर्षातून / निधीतून खर्ची टाकण्यास व विनियोजन करण्यास देखील या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

